# वऱ्हाडसमाचार

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख ५ माहे सप्टेंबर १९१० इ० [ अंक ३३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सुचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७३

## मुलास प्रिय झालेलें मासिक पुस्तक

वर्षारंभ आगष्ट १९ **आनंद** वार्षिक वर्गणी ट. ह.सह १ रु.

यांत मौजेच्या गोष्टी, गमतीचे खेळ, मनोहर व सोपी गाणीं, मुलांचे लेख, मुलांनीं विचारलेले प्रश्न व त्यांचीं उत्तरें, उत्कृष्ट चित्रें, विनोदी चुटके अशी गंमतच गंमत दरमहिन्यास येते. या मासिक पुस्तकासंबंधानें पुढील अभिप्राय पहा:—

न्या. सर नारायणराव गणेश चंदावरकर—"आनंदाचे अंक वाचून आनंद झाला. विषयांची मांडणी, व भाषा शैली दोन्ही संबंधानें माझें अनुकूल मत झालें आहे. मुलांना फार उपयुक्त होईल. प्रयत्न अल्प पण प्रशंसनीय आहे.'

डा० डॉ० रा० गो० भांडारकर सी. आय. ई.—'आमचीं मुलें प्रत्येक अंकाची वाट मोठ्या उत्सुकतेनें पाहत असतात. भाषा लहान मुलांस समजण्या इतकी सोपी असून संभावित प्रकारची आहे. आपलें मासिक मुलांचीच केवळ करमणूक करतें असें नाहीं तर मोठ्यांचीही करतें. यांत बऱ्याच गोष्टी उपदेशपर असून उपदेश उत्तम रीतीनें मनांत ठसेल अशा प्रकारें सांगितल्या असतात."

यंदाच्या वर्गणीदारांस 'वीरांच्या कथा' हें सुंदर पुस्तक भेटादाखल देण्यांत येईल.

पत्ता:-- म्यानेजर 'आनंद'—
शनिवार पेठ पुणें

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** — ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, धूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें; अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी] असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदरहू औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसाचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणें करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालेपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. धारपुरे. पोष्ट- अलिबाग.
मुंबई.

## नोटीस.

सेंगाई मर्द जानुजी निखाडे जात फुलमाळी रा० आलेगांव ता० बाळापुर हिसः—

सखाराम नारु, निंबाजी वल्द हरी निखाडे रा० आलेगांव ता० बाळापुर याचे कडून देण्यांत व सर्व लोकास प्रसिद्ध करण्यांत येतें कीं सेंगाई ही आमची साक्षांत भावजई असून हिचा नवरा ह्मणजे आमचा बंधू जानु हा गेल्या आषाढ मासीं मयत झाला. त्याजपाशीं असलेली व तो ज्याचा उपभोग घेत होता ती मिळकत वडिलार्जित आणि अविभागीत कुटुंबांतील होती. बायको मध्यें जमेनासें झाल्यामुळें तो आपले बायकोसह वेगळा राहून जेवणखाण करीत असे, तरी शेती एकत्रच होती. त्याचे सोयी साठीं त्यास एकत्र कुटुंबांतील पैशांनीं घर हिश्यानें नांव घेऊन दिलें गेलें होतें. त्याचे मरणानंतर त्याजपाशीं असलेल्या स्थावरजंगम मिळकतीचे आह्मी त्रिवर्ग बंधू मालक आहोंत. सेंगाई ही चांगले चालीनें राही व दुसरा घरठांव करी पर्यंत तिला अन्नवस्त्रा वांचून जिनगी संबंधानें कोणतीच मालकी नाहीं. ती आपले माहेरचे आप्त वगैरेंचे नादीं लागून कांहीं शेताचा भाग व घर, भांडी, चीजवस्त वगैरे विकणें व अफरातफर करण्याचे विचारांत असल्याचें कळतें या साठीं या द्वारें कळविलें जातें कीं या मिळकती संबंधानें कोणी गहाण, खरेदी किंवा अन्य रीतीचा कोणताच व्यवहार करूं नये. केल्यास तो रद्द समजून त्याची जोखीम त्यास सोसावी लागेल. सेंगाई हिस आह्मी अन्नवस्त्र व जानु यास जें लोकांचें वाजवी देणें असेल तें आह्मी देण्यास तयार आहों. यासाठीं त्या विरुद्ध वर्तन न होण्यास सेंगाई हिस कळवून सर्वांस प्रसिद्ध केलें जात आहे. कळावें. तारीख २६।८।१० इ०

सह्या

सखाराम वा॥ हरी याची नि० खु०
नारू वा॥ हरी याची नि० खु०
निंबाजी वा॥ हरी याची नि० खु०

नो० नं० ढ ३९

## नोटीस

मी खालीं सही करणार रा० मौजे वरदडी प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें इजकडून नारायण वल्द गोविंदा जात ठाकुर रा० मौजे मोप प्र० रिसोड ता० वाशीम जि० आकोला

यांसः—

या नोटीशीनें कळवितें कीं, तुह्मी माझें लग्नाचें नवरें असून मजला पांच वर्षांपासून वागवित नाहीं. मी आप होऊन तुमचें घरीं नांदत असतां तुह्मी नपुसक आहांत, तुमच्यानें माझा संसार होत नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली आहे. मी नवतरणी असून हल्लीं मजला नवऱ्यावांचून राहवत नाहीं, करितां ही नोटीस पावल्या दिवसांपासून आठ दिवसांचें आंत तुह्मी फारकती देऊन मोकळीक देणें न दिल्यास ही दिलेली नोटीस हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन, मग तुमचा मजवर व माझ्याशीं गंधर्व करणाऱ्यावर कोणतेच प्रकारचा दावा चालणार नाहीं. करितां अगाऊ या नोटीशीनें तुह्मांस कळविलें आहे. कळावें. तारीख १९ माहे आगष्ट सन १९१० इ०

सही

निशाणी झिंगी मर्द नारायण ठाकूर हिचे हातची बांगडी.

नो. नं. ढ ३६

## आकोला बाजारभाव

—:०:*:०:—

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १।०८= |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर ताळ्यास | | २४८४ |
| चांदी | | ७३ |
| जवस | | १९९ |
| जवारी नवी | २३ | ६० |
| गहूं काठे | | १०० |
| गहूं खांडवा पीवडा | १२० | १२९ |
| गहूं बनशी | | १२९ |
| चणे | ३॥। | ४ |
| तुरी | ३॥ | ३॥। |
| उडीद | ४ | ४। |
| मुग | | ४। |
| टोळी मोहाचे बीज | | २९ |
| तेल | | ७॥। |
| सरकी | | ११—११। |
| तुप | १३ | १३॥ |
| कापूस | ६० | ६९ |
| आकोला रुई जीन | | ८९ |

# वर्तमानसार.

टिपेरा जिल्ह्यांतील 'नसीरनगर गांवाहून दरवडेखोरांनीं ६०,००० रु. लुटून नेल्याची बातमी आली आहे. पैकीं १०,००० रुपये परत मिळाले. अजून कोणास पकडलें नाहीं. पोलिसतपास चालू आहे.

निमसराई स्टेशनजवळ इ. बी. एस. रेल्वेची एक गाडी उलथून पाडण्याचा प्रयत्न करण्यांत आला. गाडी वेगानें जात असतां तिला धक्का बसल्याचें ड्रायव्हरच्या लक्षांत आलें. तेव्हां त्यानें गाडी उभी केली. शोध करितां एक मोठा दगड रुळावर ठेवलेला आढळून आला. दगड एकीकडे केल्यानंतर गाडी पुढें नेण्यांत आली.

ता. २७ रोजीं पोलीस मंडळी रहमतपूर गांवीं गेली व त्यांनीं चिंताहरण बानरजी, ललित बानरजी, यदु मुकरजी, नकारि कर्मकर आणि कालीचरण कर्मकर यांच्या घरांच्या झडत्या घेतल्या.

कमरखाल येथील दरोडा घालणारे अदमीरगंज येथील रहिवासी असून त्यांचा धंदा कोळ्यांचा व चांचेपणाचा आहे असें समजतें. या जातीच्या २० किंवा ३० लोकांनीं गेल्या १९ व्या तारखेस तिपेरा–सिलहट हद्दीवरील बारीसाल गांवीं दरोडा घातला होता. या दरोड्यांत त्यांनीं पन्नास हजार रुपयांचा माल चोरून नेला. ते लोक होडक्यांत बसून आले होते घरच्या मालकानें त्यांना आडकाठी केली नाहीं ह्मणून त्यांनीं कोणासही इजा न करितां लूट करून चालते झाले. बारीसाल येथील दरोड्यानंतर त्यांनीं कमरखाल येथें दरोडा घातला. या गांवीं ता. १८ रोजीं त्यांनीं एका जमीनदाराचें आणि एका व्यापाराचें घर लुटलें. या चोरींत ३००० रु. चा माल त्यांच्या हातीं लागला. चोरांनीं वंदे मातरमच्या आरोळ्या ठोकल्या आणि बांब फेकण्याची दहशत घातली या खोट्या बातम्या आहेत. हल्लीं सिलहट जिल्ह्यांत चोहोंकडे नदीनाल्यांना पाणी आल्यानें ते लहान वाटेनें येऊन चोऱ्या करतात. चोरांचा पत्ता लावणें पोलिसांना फार कठिण झालें आहे. बारिसाल येथील चोरीपैकीं १०००० रु. चा ऐवज पोलिसांना मिळाला आहे, पोलिसतपास चालू आहे.

जपान सरकारानें कोरिया देश आपल्या राज्यास जोडण्याचें नक्की केलें आहे तरी चीन सरकार कांहींच चळवळ करीत नाहीं. यापासून मोंगोलिया आणि तिबेट या संबंधीं चीन सरकारचे धोरणांत फरक व्हावयाचा नाहीं. जपान सरकारनें कोरिया देश खालसा केला तरी तेथील व्यापारविषयक कायदे आहेत तसेच कांहीं वर्षें राहावयाचे आहेत आणि हा विचार इंग्रज सरकारास पसंत आहे.

गेल्या ता० २७ रोजीं इंग्लंड देशाच्या किनाऱ्यावर एक मोठें तुफान झालें. क्लाइड खाडींत दोन मोठमोठ्या आगबोटी वाहून आल्या. मर्सी येथें एक मोठें गलबत उलथें होऊन २ मनुष्यें मरण पावलीं. स्कॉटलंड आणि आयर्लंड देशांत जोराची पर्जन्यवृष्टि होऊन पिकांची नुकसानी झाली आहे. अल्स्टर जिल्ह्यांतील पिकें वाहून गेलीं. शानन नदीला महापूर येऊन २० ठिकाणचे पूल वाहून गेले. धानेराल येथील एका शेतकऱ्यानें शेत वाहून गेलेलें पाहून आपल्या मानेस गळफास लावून घेऊन जीव दिला.

ता० ३० रोजीं न्या० हॅरिंगटन, होपवुड व दास यांनीं खुलना येथील कटाच्या खटल्याचा निकाल दिला. या खटल्यांत अवनिभूषण चक्रवर्ती व दुसरे बारा असामी यांच्यांवर पीनल कोडच्या १२१ अ कलमाखालीं आरोप ठेवण्यांत आले होते. न्या० नीं सरकारतर्फें आलेल्या पुराव्याचें समालोचन केलें त्यावर पुराव्यांत सांपडलेल्या 'मुक्ति कोन पंथे' या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. हें पुस्तक ह्मणजे युगांतर नांवाच्या राजद्रोही पत्रांतील लेखांची पुस्तकावृत्ति आहे. लोकमत तयार करून आणि बळजबरीनें व हत्यारें जमवून राज्यक्रांति करावी, असें त्या पुस्तकात प्रतिपादिलेलें आहे. चोऱ्या दरवडे वगैरे साधनांनीं पैसे मिळवावे व त्या पैशांनीं हत्यारें खरेदी करावीं बाँब तयार करावे आणि सरकारची सत्ता उलथून पाडण्याकरितां शारीरिक बल संपादन करावें असेंही त्यांत ह्मटलेलें आहे. हें पुस्तक व बाँब तयार करण्यसंबंधाचीं कित्येक गुप्त कागदपत्रें कित्येक आरोपींपाशीं सांपडलीं. पोलिसचा हेर जोतिन राय यानें हे कागद मुद्दाम ठेविले नसून ते खरे आहेत. आरोप केल्याप्रमाणें उद्देश बाळगणारा कट होता यांत संशय नाहीं. अवनीभूषण याची जबानी आपखुषीनें दिलेली होती. असें ह्मणून न्यायमूर्तींनीं खालील प्रमाणें आरोपीस शिक्षा दिल्या:– अवनीभूषण चक्रवर्ती, विधुभूषण दे, अश्विनीकुमार घोस, नगेंद्रचंद्र, कालीदास घोष व शचींद्र लाल मित्र यांना प्रत्येकीं सात वर्षें काळें पाणी आणि व्रजेंद्र कुमार नाथ सरकार, सुधीर कुमार देबाकिनु पई यांना प्रत्येकीं पांच वर्षें काळें पाणी आणि ब्रजेंद्र दत्त व सतीशचंद्र चतरजी यांना प्रत्येकीं तीन वर्षें काळें पाणी. मोहिनीमोहन मित्र व मन्मथ मित्र यांच्या विरुद्ध भरपूर पुरावा नसल्यामुळें त्यांना सोडून देण्यांत आलें.

नॉर्थवेस्ट फ्रँटियर प्रांताच्या चीफ कमिशनरनीं, इंग्रजी, बंगाली अथवा कोणत्याही भाषेंत प्रसिद्ध झालेला 'संध्या' पुस्तकाचा (भाग पहिला वर्ष ४ थें) सरकारजमा करण्याचा हुकुम केला आहे. या पुस्तकावर कर्त्याचें नांव नाहीं.

एक विद्वान् युरोपियन बाई हिंदुस्थानांत आली असून ती एका शहरांतील मठांत उतरली आहे. बाईचें नांव कांहीं कारणास्तव उघड करून सांगता येत नाहीं एके दिवशीं ही बाई रस्त्यांतून जात असतां एक मोठे युरोपियन अधिकारी गाडींत बसून जात होते. साहेबांनीं बाईचा बैराग्या सारखा वेष पाहून ती हिंदी असावी असें वाटलें व त्यांनीं तिजवर कोरडे ओढले भयंकर चळवळ उडाली आहे व बाईनें तडजोड करण्याचें मनांत न आणल्यास प्रकरण फार विकोपास जाईलसें दिसतें- असें 'बंगाली' पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

## पान, सुपारी, कात, चुना.

सध्या विड्याच्या पानांतल्या विषानें कांहीं माणसें मेल्याचीं उदाहरणें बंगाल प्रांतीं घडल्यापासून या विषयाकडे लोकांचें लक्ष लागलें आहे. विडा अथवा तांबूल खाण्याचा प्रघात आपल्या देशांत किती जुना आहे याचा कांहीं अंदाज करवत नाहीं. आमच्या प्रत्येक हिंदुपूजेंत व संस्कारांत तांबूल हा लागतोच. कोणत्याही धर्मकृत्याच्या आरंभीं गणपतीच्या ऐवजीं सुपारी ठेवण्याची चाल आहे. हा प्रघात अगदीं अनादि आहे अशी भाविक हिंदूंची समजूत आहे. परदेशी प्रवाशांनीं लिहून ठेविलेल्या प्रवासवर्णनांवरून पाहिलें तरी तांबूलाचें प्राचीनत्व सिद्ध होतें. तेराव्या शतकांत झालेल्या मार्कोपोलोच्या किंवा पंधराव्या शतकांतल्या अबदुलरज्जक नांवाच्या मुसलमान प्रवाशाच्या प्रवासवर्णनांत हिंदुस्थानांत विडा खाण्याचा सर्वत्र प्रचार होता असा उल्लेख आहे. यावरून या काळाच्या पुष्कळच अगोदरचीं ही चाल असावी असें दिसतें. बुद्धानें भिक्षूंना ज्या गोष्टींचा निषेध करून ठेविला आहे त्यांत तांबूलविहार ही एक गोष्ट आहे; आणि बुद्ध इ. स. पूर्वीं ५०० वर्षें होऊन गेला. यावरून कमींत कमी अडीच हजार वर्षें तरी विडा खाण्याचा प्रघात आमच्यांत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ज्या घरांत पान किंवा निदान सुपारी यांचा खाण्यांत उपयोग होत नाहीं असें घर हिंदुस्थानांत क्वचितूच सांपडेल. इतका सार्वत्रिक प्रचार ज्याचा आहे असा दुसरा पदार्थ- अलीकडे राकेल खेरीजकरून बहुधा नाहीं. असें असतां विड्याच्या पानासंबंधानें किंवा सुपारीच्या उत्पत्ती संबंधानें आह्मा सुशिक्षित लोकांत सुद्धा केवढें अज्ञान आहे! पानाच्या निरनिराळ्या जातींचीं नांवें सुद्धां फारशीं कोणास सांगतां येत नाहींत किंवा सुपारी हा मूळ आफ्रिकेंतून आली कीं जाव्हा बेटांतून आली हें सांगण्याची मुष्कील पडते! मुंबई इलाख्यांत पुष्कळ पानमळे आहेत, तथापि नामांकित असे पानमळे नाहींत. आमच्या मध्यप्रांतांत रामटेकच्या पानाची प्रसिद्धी आहे. माळवा प्रांतांत माळवी पान लोकांना जितकें आवडतें, तितकें 'कपूरी' पान आवडत नाहीं. बंगाल प्रांतीं होणाऱ्या 'बंगला' पानाला एक प्रकारचा सुगंध असतो. मद्रासी पान तोंडाला चरचट करणारें असतें, तथापि तें फार स्वस्त असल्यामुळें अर्धें हिंदुस्थान त्यानें पादाक्रांत केलें आहे.

विड्यांत पानाच्या बरोबरीनें महत्वाचा पदार्थ ह्मटला ह्मणजे सुपारी हा होय. हा पदार्थ कित्येकांच्या मतें जाव्हा बेटांतून आमच्या इकडे आला- हें खरें असेल तर बुद्धाच्याही अगोदर कित्येक वर्षें ह्मणजे आज निदान तीन हजार वर्षें तरी जाव्हा बेटाशीं आमच्या देशाचें दळणवळण होतें असें ह्मटलें पाहिजे. आपल्या देशांत कोंकण, मलबार व बंगाल, हे प्रांत सुपारीच्या उत्पत्तीसाठीं प्रसिद्ध आहेत. कोंकणांत पांढरी सुपारी होतें. चिकण सुपारी मलबारांतून येतें, व दगडी आणि बरडी सुपारी देशावर होते. सगळ्याच सुपारींत कमजास्त मानानें अरेकोलाईन नांवाचा एक आल्कलाइड पदार्थ असतो. पण ताज्या काढलेल्या सुपारींत (पोफळांत) तो ज्यास्त असतो. ह्मणून पोफळ एका वेळीं पुष्कळ खाण्यांत आलें असतां त्याचा परिणाम कित्येकांच्या काळजावर तावडतोब घडून त्यांचा जीव कासावीस झाल्याचीं उदाहरणें घडलीं आहेत. बंगालप्रांतांत विडा खाल्ल्यापासून मृत्यु घडल्याचीं जीं कित्येक उदाहरणें घडलीं आहेत त्यांचें कारण विड्याच्या पानावर बारीक विषारी जंतु असतील असा कित्येकांचा समज झालेला दिसतो. पण तो चुकीचा आहे असें रसायनशास्त्रज्ञांनीं पानांचें रासायनिक परीक्षण करून ठरविलें आहे. रसायनाच्या कोर्टापुढें [illegible] होऊन पान निर्दोषी ठरलें आहे, [illegible] नांडीला आतां आरोपीच्या पिंजऱ्यांत उभें करण्यांत आलें आहे. या चौकशीचा अखेर निकाल काय होतो तें पहावें. तूर्त तरी अरेकोलाइन नांवाच्या तत्वामुळें ज्याचें काळीज मजबूत नसेल अशांनीं सुपारी खाऊं नये असें अनुभवी लोक सांगतात तें खरें दिसतें. चिकणसुपारी शिजवून तयार करतांना हा अल्कलाईड पदार्थ तींतून निघून जातो तेव्हां तो खाण्यास हरकत नाहीं.

तिसरा पदार्थ ह्मणजे कात. हा वनस्पतिजन्य पदार्थ आहे. कात खैर, आंवळी, सुपारी, पळस वगैरे पासून होतो. कित्येक वेळां कातांत गनचोरी, पतंग, मोहडा, मंजिष्ट, गुळवेल, चिराटा, कडुनिंब, लिंबोनी वगैरे पदार्थांची ही भेसळ घातलेली असते. ही भेसळ प्रामाणिकपणाची तरी असते. पण कांहीं पदार्थ अप्रामाणिकपणानेंही मिसळतात. उदाहरणार्थ– शाडू, चिनीमाती, नाचण्याचें पीठ, लांकडाचे तुकडे, वगैरे. हे पदार्थ विडाखातांना माणसाचे पोटांत जावयाचे असतात, या गोष्टीचा विचार केला ह्मणजे या भेसळीच्या पदार्थांचा प्रकृतीवर काय परिणाम होत असेल तें पाहावें लागतें. काताचा उपयोग नुसत्या विड्यांतच होतो असें नाहीं. जखम भरण्यास, व खोकल्यावर औषध ह्मणूनही तो देतात. कातांत मुख्य पदार्थ ह्मणजे टॅनोकॅटच्यु ॲसिड हा आहे. पण हा मनुष्याचे शरीराला अपायकरणारा नाहीं. इतकेंच नाहीं तर कातांत सामान्यतः ज्या पदार्थांची भेसळ असते ह्मणून वर सांगितलें त्यांतही प्राणाला विघातक असा कोणताही पदार्थ दिसत नाहीं.

आतां राहिला चुना. हा पदार्थ सुप्रसिद्धच आहे. विड्याचा चुना चुनकळ्यापासून तयार करतात. यांत मुख्य द्रव्य ह्मणजे कॅलशियम हें आहे. याच्या अंगीं इतकी उष्णता असते कीं कोणतेही विषारी जंतु यांत राहूं शकत नाहींत. पण विडातंबाखू खाणारे नेहमीं चांगलाच चुना वापरतात असें नाहीं. चंचींत चुना नाहीं. आणि तलफ तर पान किंवा तंबाखू खाण्याची लागली आहे अशा वेळीं इमारतीचा चुना खरवडून पानाला किंवा तंबाखूला लावणारे शोकी लोक क्वचित् दृष्टीस पडतात. कांहीं असलें तरी हें द्रव्य खाण्यांत कमजास्त प्रमाणानें आल्यास फार तर तोंडाला व जिभेला फोड येतील. पण प्राणाची हानि व्हावयाची नाहीं.

वरील विवेचनावरून हें दिसून येईल कीं पान, सुपारी, कात, व चुना या विड्याच्या चार द्रव्यांपैकीं पहिलें द्रव्य ह्मणजे पान हें रसायनशास्त्रज्ञांनीं नीट परीक्षा करून जर निर्दोष ठरविलें आहे, तर बंगाल्यांत विडाखाल्ल्यामुळें झालेल्या अपघाताचा सगळा दोष सुपारीकडे येतो हें उघड आहे. कारण सुपारीचे अंगीं काळजावर अनिष्टपरिणाम करण्याचा गुण आहे हें वर सांगितलेंच आहे. असो. या गोष्टीचा पूर्ण तपास करण्यासाठीं नुकतीच एक शास्त्रज्ञांची कमिटीही सरकारनें नेमिली असल्याची खबर आली आहे. त्या कमिटीचा रिपोर्ट येईपर्यंत विडाखाणारांनीं दम धरावा हें योग्य आहे.

---

## ऐतिहासिक गोष्टी

—*—*—*—*—

१ **खेळोजी भोसले**— हे शहाजीचे चुलतभाऊ प्रथम निजामशाहींत व नंतर मोगलापाशीं पंचहजारी होते. पुढें मोगलांचाही पक्ष सोडून ते विजापुरकरातर्फे मोंगलांशीं अनेक वेळां लढले. एकदां त्यांची बायको गोदावरीच्या स्नानाला गेली असतां मोगल सुभेदारानें पकडून कैद केली, व चार लक्ष रुपये खंडणी घेतल्याशिवाय तिची सुटका करीना; उलट खंडणी न दिल्यास तिची अब्रू घेईन अशी धमकी तो देऊं लागला. तेव्हां निरुपास्तव चार लाख रुपये देऊन तिला सोडवून आणिली. खेळोजी वैतागून पुढें आपलें वतनाचें गांव वेरूळ येथें येऊन राहिला, आणि आसपासच्या मुलुखांत लुटालूट करून राहूं लागला. औरंगजेबानें मालिक हुसेन सरदारास त्याच्यावर पाठविलें. त्यानें खेळोजीवर छापा घालून त्याला ठार केलें.

---

२ **गंगाधर शास्त्री पटवर्धन**— हे गृहस्थ गायकवाडाकडून दुसऱ्या बाजीरावाचे वेळीं पुण्याचे दरबारीं वकीलीस आले होते. हे ब्रिटिश सरकारच्या मध्यस्थीनें व त्यांची हमी घेऊन पुण्यास आले होते. त्यामुळें त्यांचा व इंग्रज रेसिडेंट मि० एलफिन्स्टनसाहेब यांचा चांगला परिचय होता. यांच्या विषयीं एलफिन्स्टनसाहेब लिहितात :— हे ( गंगाधर शास्त्री ) मोठे धूर्त व बुद्धिमान असून बडोदें संस्थानचा बंदोबस्त यांनीं चांगला राखला आहे. येथें लोकांचें लक्ष वेधून घेण्यासाठीं ते उधळपट्टीनें खर्च करून आपल्या स्वारीचा थाटमाट ठेवीत असतात. ते विद्वान् शास्त्री आहेत तरी इंग्रजाप्रमाणें राहण्याला पाहतात. त्यांचें चालणें बोलणें जलद असून दुसरे बोलत असतां त्यांना मध्येंच थांबवावयाची व उलट बोलायची त्यांना खोड आहे. पेशव्याला ते ओल्ड फुल ( जुनीं मुर्दाड खोडें ) व डाम रास्कल ( ! ) ह्मणतात. बोलतांना मध्येंच इंग्रजी शब्द घुसडावयाची त्यांना सवय आहे, आणि एखाद्या विषयीं ( उदाहरणार्थ होळकरांविषयीं ) बोलतांना 'बहोत ट्रिकवाला था, लेकिन् बडा अकलमंद, काकआय ( काकचक्षु ) था' अशी घेडगुजरी भाषा ते वापरतात.

---

# वऱ्हाडसमाचार.

भाद्रपद शुद्ध ८ शके १८३२ दुर्मतीनामसंवत्सरे

## धर्मपंथाचें अस्तित्व आणि मरण.

( प्रेषित. )

लंडन टाइम्सच्या खास बातमीदाराचीं हिंदुस्थानांतल्या अस्वस्थतेच्या मीमांसे संबंधानें जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांचा खोडसाळपणा आपण गेल्या अंकीं व्यक्त केलाच आहे. त्याच्या विधानाच्या असत्यतेचें आणखी एक उदाहरण ह्मणून प्रार्थनासमाजाबद्दलचा त्यानें केलेला उल्लेख येथें देतों. सदर बातमीदार ह्मणतो कीं ब्राह्मसमाज व प्रार्थनासमाज हे कधींच मरण पावले आहेत ! हें विधान वाचून तें करणाराच्या धाडसाचें किंवा विचारशून्यतेचें कौतुक करावें तेवढें थोडें आहे. कोणत्या अर्थानें लेखकानें प्रार्थनासमाजाला मृत ठरविलें आहे तें त्यानें सांगितलें असतें तर त्या दृष्टीनें त्याच्या विधानाचें परीक्षण करण्यास कांहीं मार्ग झाला असता पण त्यानें तसें कांहीं एक केलें नाहीं. प्रार्थनासमाजाच्या सभासदांची संख्या कमी झाली आहे काय ? त्याच्या मताविषयीं लोकांत तिटकारा उत्पन्न झाला आहे काय ? शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारानें किंवा अन्य कांहीं बलवत्तर कारणानें त्या समाजाच्या मतांचें खंडन केलें आहे काय ? त्या समाजाचा बहुजनसमाजावर कांहींच परिणाम होत नाहीं. असें आहे काय ? वगैरे प्रश्न या विधानाच्या परीक्षणाचे वेळीं विचारी मनुष्याला सुचतात, आणि या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे प्रार्थनासमाज खरोखर मृत झाला नाहीं असें ह्मणावें लागतें. प्रस्तुत लेखक स्वतः प्रार्थना समाजिष्ट नाहीं. तेव्हां उगाच अभिमानाला पेटून सत्यापलाप करण्याचा आरोप त्याचेवर लादतां यावयाचा नाहीं. प्रार्थनासमाजाचीं मतें चांगलीं असोत कीं वाईट असोत त्यांचा प्रसार उघडरीतीनें नसला तरी प्रच्छन्न रीतीनें फार जारीनें होत आहे असें त्याच्या अनुभवास आलेलें आहे आणि तें स्पष्टपणें सांगणें त्याचें कर्तव्य आहे. ईश्वर एक आहे व तोच सगळ्या सृष्टीचा उत्पत्तिस्थितिलयकर्ता आहे याविषयीं कोणास संशय आहे काय ? जसे हिंदूंचे वेद, तसेंच मुसलमानांचें कुराण, ख्रिस्त्यांचें बायबल, व इतर धर्मातले दुसरदुसरे ग्रंथ सरसकट प्रमाण मानून मधुमक्षिके प्रमाणें सर्वांतल्या उत्कृष्ट भागांचा संग्रह करावा या मतांत आक्षेप घेण्यासारखें कोणास वाटतें काय? मूर्तिपूजेचा त्याग मतानें जरी नसला तरी आचरणानें हजारों जणांनीं आज कित्येक वर्षें केलेला नाहीं काय? जातिभेद आज हिंदुसमाजांत फक्त विवाहा पुरताच राहिला आहे हें खरें आहे कीं नाहीं? रोटीव्यवहार व बेटीव्यवहार यां पैकीं पहिला हॉटेलांतून, व चहाकाफीच्या आणि फराळाच्या दुकानांतून राजरोसपणें होत असतो कीं नाहीं? बंधुप्रेमाची कल्पना आजच्या काळांत कोणाला मान्य नाहीं? शूद्र व स्त्रिया या वेदाध्ययनासारख्या गोष्टीला अनधिकारी आहेत असें मानण्याचे दिवस गेले असें आतां प्रत्येक जण ह्मणत नाहीं काय ? या सगळ्या प्रश्नांचीं जीं कांहीं उत्तरें सरळपणें देण्यांत येतील तीं प्रार्थनासमाजाच्या मतांशीं जुळवून पाहिलीं तर हल्लींचा सुशिक्षित हिंदुसमाज बहुतांशीं प्रार्थनासमाजिष्ट झाला आहे असें कबूल करावें लागेल. असें असतां टाइम्सचे बातमीदार लेखक मि. चिरोल ह्मणतात कीं प्रार्थनासमाज मृत आहे, आणि मि. चिरोल हे सत्यवादी लेखक आहेत !

प्रार्थना समाजाच्या रविवारच्या सभेला, व्याख्यानाला, कीर्तनाला, प्रीतिभोजनाला किंवा स्त्रीपुरुषांच्या मेळ्याला गेले, सर्वांनीं बरोबर डोळे मिटून प्रार्थना केली, किंवा त्यांच्या समाजाच्या पटांत नांव नोंदविलें तरच मनुष्य त्या समाजाचा सभासद समजावयाचा ही अर्थात व्यावहारिक दृष्टि आहे पण इतर संस्थांचें परीक्षण जसें या व्यावहारिक दृष्टीनें करावयाचें तसें प्रार्थनासमाजासारख्या धार्मिक संस्थेचें किंवा धर्मपंथाचें परीक्षण करतां यावयाचें नाहीं. तसें करणें न्यायाचें ही नाहीं. याचें कारण धार्मिक संस्थेचे परिणाम मनुष्याच्या अंतःकरणावर घडावयाचे असतात, व अंतःकरणाचें माप घेण्याचें साधन अद्याप कोणाला सांपडलेलें नाहीं. मनुष्याच्या कृतीवरूनच त्याच्या अंतःकरणाची परीक्षा करावी लागते. पुष्कळ मनुष्यें अंतःकरणांत एक असून समाजाच्या भीतीवारा अन्य प्रकारचीं मतें प्रतिपादितात. त्यांचीं मतें व आचरण यांत त्यामुळें मेळ राहत नाहीं. कोणत्याही समाजाची शक्ति अजमावण्यांत पुष्कळ वेळां चूक होते ती यामुळेंच होत असते, ह्मणून प्रार्थनासमाजाच्या पटावरील संख्येवरून किंवा त्याच्या सभेला जाणाऱ्या लोकांच्या संख्येवरून त्या समाजाचें जीवित किंवा मरण ठरविणें हें रास्त नाहीं. त्या समाजाचीं मतें लोकांना दिवसेंदिवस जास्त मान्य होऊं लागलीं आहेत कीं नाहींत ? व त्यांचा परिणाम बहुजनसमाजावर घडत आहे कीं नाहीं ? याच गोष्टी फार महत्वाच्या आहेत. आणि जों पर्यंत या दोन्ही प्रश्नांस 'होय' असा जबाब प्रार्थनासमाजांत नसलेल्या पण शांत व विचारी तिऱ्हाइत माणसांकडून प्रार्थनासमाजाला अनुकूळ अशा रीतीनें मिळत आहे, तों पर्यंत तो समाज मृत झाला आहे कीं काय असा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. उद्यां प्रार्थनासमाजाचीं द्वारें अजिबात बंद झालीं असें समजलें तरी त्या समाजानें सुशिक्षित लोकांच्या मनांत उत्पन्न केलेली विचारजागृति जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत तो समाज कायम आहे असेंच ह्मणावें लागेल.

---

## असली श्रद्धा काय कामाची ?

अलीकडे कित्येक वर्तमानपत्रांतून पुरीच्या जगन्नाथासंबंधानें तिकडील लोकांची जी श्रद्धा आहे तिच्या विचित्रपणाचे कांहीं मासले प्रसिद्ध होत असतात. ते वाचले ह्मणजे धर्मासंबंधानें गंभीरपणें विचार करणारासमुद्धां हंसूं लोटल्यावांचून राहत नाहीं. जो भक्तांना जन्ममरणाच्या उपाधींतून तारणारा, त्याच्या कपाळीं भक्तांनीं जन्ममरण आणि तें सालोसाल लावलेलें पाहून कोणालाही त्या बिचाऱ्या देवाची करुणा येईल. पण जगन्नाथाचें भक्त इतके निष्ठुर दिसतात कीं त्यांना मात्र आपल्या उपास्य देवतेची करुणा येत नाहीं ! लोक देवाच्या जयंत्या जागोजाग करित असतात; धुळ्यास एकदां एका बुवानें रामाची मुंज लाविलेली आम्हांस माहीत आहे. तुळशीचें लग्न दर साल होत असतें. सारांश, प्रपंचांतल्या कित्येक गोष्टी देवासाठीं करतांना पाहून निर्गुणभक्ति करणाराला कसेंसेंच वाटतें. पण जगन्नाथाचे भक्त याच्याही पुढें जाऊन ते देवाला आजारी ह्मणून निजवितात. [illegible] त्याची नाडी पाहत [illegible] समजून त्यांचें सुतक [illegible] न्नाथ लक्ष्मीला आपल्या [illegible] ह्मणून एखाद्या खट्या [illegible] प्रमाणें त्याला चोप [illegible] श्रद्धा मुर्तिपुजकांच्यासुद्धां उपहासास पात्र होते असें ह्मणावें लागतें. रथयात्रा, व उत्सव वगैरे लोकांची धर्मश्रद्धा दृढ करण्यासाठीं असतात. वरच्या सारखे प्रकार पाहून भाविकांच्या मनांत असलेली श्रद्धासुद्धां ऱ्हास पावण्याचा संभव आहे. ज्या तीर्थक्षेत्रीं असले प्रकार घडतात त्या तीर्थाविषयीं सुद्धां माणसाच्या मनांत अप्रीति उत्पन्न होते. तुकाराम, रामदास, वगैरे साधूंच्या कवितेंत अनेक ठिकाणीं तीर्थांवर कोरडे ओढलेले दिसतात ते अशा प्रकारामुळेंच ! मुक्तेश्वरांनीं ही एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

मन इंद्रिय निग्रहकारी।
तो गृहीं असूनी जान्हवी तीरीं।
तीर्थीं असोनी अनाचारी।
तो कीटकवासी जाणावा।
मत्सर, नैष्ठुर्य, भूतद्वेष।
भजन मार्गींचा उपहास।
तीर्थें त्याचा घेती त्रास।
कीटक देशीं त्या वसती।

---

## शिक्षणासंबंधाची माहिती,

सध्या शिक्षण विषयाकडे सरकारि अधिकाऱ्यांचें व लोकांचेंही सारखें लक्ष लागलें असल्यामुळें गेल्या सालचे शिक्षणविषयक आंकडे येथें देतों. ज्या कोणाला या विषयावर लिहावयाचें किंवा बोलावयाचें असेल त्याला हे आंकडे आधारभूत धरतां येतील. सध्या सरकारि व खाजगी शाळांतून सुमारें ६० लक्ष विद्यार्थी शिकत आहेत. मागच्या दहा वर्षांतल्यापेक्षां ही संख्या शेंकडा ३४ याप्रमाणानें मोठी आहे. पैकीं मुलाच्या संख्येंत ५ारशी वाढ झालेली नाहीं; पण मुलींची संख्या ८४ नें वाढली आहे ! वर सांगितलेल्या ६० लक्ष विद्यार्थ्यांपैकीं फक्त १० लक्ष विद्यार्थी हायस्कुलें, इंग्रजी शाळा, व कॉलेजें यांतून शिकणारे आणि सुमारें ५० लक्ष प्राथमिक शिक्षण घेणारे आहेत. शिकणाऱ्या मुलींचें शिकणाऱ्या मुलांशीं प्रमाण ख्रिस्ती लोकांत, पारशांत व ब्राह्मणांत १:२, व मुसल्मान आणि ब्राह्मणेतर वर्गांत १:८ या प्रमाणें आहे. विशेष विषयांचें शिक्षण घेणारे एकंदर विद्यार्थी १६०९२ आहेत. पैकीं धंदेशिक्षणांत शिरलेले सगळे १९८८ आहेत

आणि यांतले निंमेहून आधिक ह्मणजे ८९४ विद्यार्थी युरोपियन किंवा ख्रिस्ती आहेत ! ६४८ हिंदु आहेत. मुसलमान अगदींच थोडे ५६ आहेत व ८ बौद्धधर्मी आहेत. शिक्षणाप्रीत्यर्थ झालेल्या खर्चापैकीं शें. ५४ येवढा खर्च सरकार व लोकलबोर्डें यांनीं सोसला. शें. २६ फीच्या उत्पन्नांतून भागला; आणि शें. २० वर्गण्या, देणग्या वगैरेनीं भागविला. आर्टस कॉलेजांत प्रत्येक विद्यार्थ्यामागें वर्षास १८२ रु., ट्रेनिंग कॉलेजांत २४० रु. व ट्रेनिंग स्कुलांत ११३ रु. या प्रमाणें आला. एकंदर सरसकट विद्यार्थ्यांसाठीं प्रत्येक विद्यार्थ्यामागें सुमारें ९ रुपये या प्रमाणें खर्चाचें प्रमाण पडलें. सगळ्या प्रांतांतर्ली कॉलेजें व शाळा मिळून २२४१ बोर्डिंगें होतीं व त्यांत ८७००० विद्यार्थी राहणारे होते. पैकीं ३९९ बोर्डिंगें विद्यार्थिनींचीं होतीं. या बोर्डिंगांचा खर्च ४६ लक्ष रु. झाला; पैकीं सुमारें ६॥। लक्ष रु. सरकारनें दिले.

## लेडी सालरजंग यांचा मृत्यु,

निजाम सरकारचे माजी सुप्रसिद्ध दिवाण सर सालरजंग यांची पत्नी लेडी सालरजंग यांस गेल्या आठवड्यांत हैद्राबाद येथें देवाज्ञा झाल्याची खबर आली आहे. सर सालरजंग यांची तीव्र बुद्धि, मुत्सद्देगिरी, व राजकार्यधुरंधरता सुप्रसिद्धच आहे. या कामांत त्यांना शोभण्यासारख्याच त्यांच्या पत्नी होत्या व सरकारी कामांत त्यांच्या सल्लामसलतीचा पुष्कळ उपयोग सर साहेबांना होत असे असें सांगतात. वऱ्हाड प्रांत परत मिळविण्यासाठीं सर सालरजंग यांनीं जंगी प्रयत्न केले, त्यांत ही त्यांच्या पत्नीचें त्यांना पूर्ण साह्य होतें. आपल्या पतीच्या मागें पंचवीस वर्षें त्यांनीं धर्माचरणांत व परलोकचिंतनांत घालविलीं. यांचे और्ध्वदेहिक संस्कारास बडीबडी सरदार मंडळी गेली होती. यांचें वय मरणसमयीं ७८ वर्षांचें होतें. वैभव आणि विरक्तता या दोन्ही गोष्टींचा समवाय यांचे ठायीं होता.

## कौंसिलांत उडालेला गोंधळ

ना. मि. जेन्किन्स यांनीं वरिष्ठ कौंसिलांत राजद्रोही सभाबंदीच्या कायद्यावरील चर्चेच्या वेळीं लोकनियुक्त सभासदावर जो वाग्बाणांचा वर्षाव केला, त्याच्या योगानें कौंसिलांतील वातावरण इतकें क्षुब्ध करून सोडलें होतें कीं त्याचा परिणाम लोकनियुक्त सभासदांवर तर झालाच, पण खुद्द व्हाइसराय साहेबांवर ही तो झाल्यावांचून राहिला नाहीं. कौन्सिलांतले सभासद ह्मणजे शांत डोक्याचे असावयाचे, तशांत ते सिमल्याच्या थंडगार हवेंत जमले होते. तथापि मि० जेंकिन्स यांच्या भाषणानें सर्वांचीं डोकीं इतकीं तापलीं कीं त्या संतापाच्या भरांत सगळेच आपापलीं कर्तव्यें व स्वभावसुद्धां विसरून गेले. ना० मि० गोखले यांचीं भाषणें प्रतिपक्षाविषयीं नेहमीं सौम्य, उदारपणाचीं, आणि आदरयुक्त असतात; पण या खेपेस त्यांनीं दहापांचच मिनिटें पण सणसणीत, आणि सडेतोड भाषण केलें. लॉर्ड मिंटो साहेबांच्या कारकीर्दीतली ही शेवटची कौंसिलची बैठक असल्यामुळें लोकनियुक्त सभासदांकडून त्यांना कौंसिल सुधारणेबद्दल धन्यवादही मिळणें अवश्य होतें. पण येवढाही शिष्टाचार करण्याचें भान कोणास राहिलें नाहीं; आणि बिलावर मतें घेऊन मग बहुमत कोणत्या बाजूचें आहे तें पाहून बिल मंजूर कीं नामंजूर तें व्हाइसरायसाहेबांनीं जाहिर करावयाचें; पण गडबडींत लॉर्ड मिंटोसाहेब मतें न घेतांच बिल पास झालें ह्मणून सांगितलें ! मि० जेंकिन्स यानीं कौन्सिलांत पाय ठेवल्याबरोबर येवढा प्रताप गाजविला. तेव्हां आतां पुढें आणखी काय काय गमती करतात तें पाहणें आहे.

## कस्य केन संबंध ?

सध्यां हिंदुस्थानांत आतिशय महागाई झाल्याविषयींची ओरड चालली ऐकून 'औरंगजेबाच्या कारकीर्दीचें लोकांस स्मरण देणारे' असा ज्यांचा नांवलौकिक आहे अशा सर बॅ० फुलर साहेबांच्यानें स्वस्थ बसवलें नाहीं. या महागाईच्या वादावर आपला कांहीं तरी छाप पाहिजे ह्मणून त्यांनीं युनायटेड एंपायर पत्रांत एक लेख लिहून असें प्रतिपादलें आहे कीं या महर्घतेचा आणि टांकसाळी बंद करण्याचा किंवा सोन्याचें नाणें सुरु करण्याचा संबंध जोडणारे लोक मूर्ख आहेत. तसेंच हिंदुस्थानांत धान्य वगैरे जिन्नस बाहेर देशीं जातात, किंवा प्लेग वगैरे कारणांमुळें मजूर मिळेनासे झाले व त्यामुळें मालाच्या उत्पत्तीचा खर्च वाढला वगैरे अर्थशास्त्रविषयक कारणें सांगणारेही मूर्खच आहेत. या महर्घतेचें खरें कारण राजद्रोह हें आहे! हिंदुस्थानांत गेल्या पांच चार वर्षांत राजद्रोहाचा प्रसार जसजसा होत गेला, त्या त्या मानानें महागाईचें प्रमाण ही वाढलें आहे, आणि जोंपर्यंत या राजद्रोहाचा नायनाट हिंदुस्थानांतून होणार नाहीं तोंपर्यंत हें असेंच व्हावयाचें ! प्रजा आपापल्या धर्माप्रमाणें वागली नाहीं ह्मणजे देवता रुष्ट होतात, व पर्जन्य पडावा तसा पडत नाहीं, व त्या मुळें महागाई होते हें तत्व हिंदुधर्मशास्त्रांत फार जुनें आहे तेंच सरफुलर साहेबांनीं पुढें आणिलें आहे. अर्थशास्त्रापेक्षां मनुस्मृतीवर सरसाहेबांची श्रद्धा जास्त दिसते हें पाहून हिंदुलोकांना समाधान वाटेल. पण सर साहेबांच्या मुसलमान पत्नीस सवतीमत्सर बाटणार नाहीं ना? याची त्यांनीं खबरदारी घ्यावी. नाहीं तर ती आपल्या गोरकाय पतीच्या झिंजोट्या ओढून त्याला बेजार करील व लोकांना आपल्या प्रेमाचा तमाशा दाखवीत फिरेल. सरसाहेबांचें वरच्या सारखे विक्षिप्तपणाचे लेख पाहून त्यांचें डोकें फिरलें नाहीं ना ? अशी शंका येणें साहजिक आहे.

## दोन ज्युबिली-- उत्सव

गेल्या महिन्यांत दोन महत्वाचे ज्युबिली उत्सव झाले. पहिला कलकत्याचा 'इंडियन मिरर' पत्रास ६० वर्षें पूर्ण झाल्या बद्दलचा, व दुसरा त्रावणकोरच्या महाराजांच्या वयास ५० वर्षें झाल्या बद्दलचा. दोन्ही उत्सव प्रथम दर्शनीं व्यक्तिविषयक वाटतात. पण सूक्ष्म दृष्टीनें पाहणारांस दोहोंत ही फार गूढ तत्वें दिसल्या वांचून राहणार नाहींत. 'इंडियन मिरर' ची ज्युबिली ह्मणजे एक प्रकारें त्याचें पत्रास वर्षें सतत संपादकाचें काम करणारे राय नरेंद्रनाथ सेन बहादुर यांचा उत्सव खरा, पण त्याला राष्ट्रीय महत्वही आहे. हिंदुस्थानांत वर्तमानपत्रांचा धंदा ह्मणजे मोठासा किफायतशीर किंवा बहुमानाचा आहे असें मुळींच नसतां त्याला चिकटून राहून सतत पंनास वर्षें आपलें कर्तव्य चोखपणानें बजावणारीं कर्तृत्ववान् माणसें आमच्या देशांत आहेत हें दाखविणारा हा उत्सव आहे. त्याच प्रमाणें राजकीय वातावरणाचें स्वरूप किती ही पालटलें तरी 'इंडियन मिरर' च्या कर्णधारानें आपली दिशाभूल न होऊं देतां सुविचाराच्या मार्गानें आपली नौका मोठमोठ्या वादळांतून मोठ्या धैर्यानें आणि धिमेपणानें सुरक्षितपणें पार नेली ही गोष्ट एकटी रायबहादुर सेन यांसच नव्हे तर एकंदर बंगाल्ला किंबहुना हिंदुस्थानाला भूषणावह आहे. त्रावणकोरच्या महाराजांच्या आजपर्यंतच्या कारकीर्दीचा विशेष अभिनंदनीय भाग ह्मणजे त्या राज्याची गेल्या ५० वर्षांत एकसारखी होत गेलेली प्रगति हा आहे. राजा स्वतः हुशार, दक्ष, व कर्तृत्ववान् असला ह्मणजे त्याचे व दिवाणाचें बहुधा पटत नाहीं. दिवाणानें नुसती आपल्या हुकूमाची बजावणी करावी आणि नामधारी दिवाण राहावें अशी राजाची इच्छा असते बरें, राजापेक्षां दिवाणाची बुद्धि तीव्र असली ह्मणजे तो राजाला बाहुलें करून ठेवितो. अशा स्थितींत योग्य हुशार दिवाणाची निवड करणें, व त्याच्याकडून योग्य दिशेनें राजकीय सुधारणा घडवून आणणें, त्याचें व्यक्तिस्वातंत्र्य कायम राखून आपलें स्वत्व न गमावणें वगैरे अतिशय नाजूक काम राजांना करावें लागतें. तें त्रावणकोरच्या महाराजांनीं आजपर्यंत केल्यामुळें त्या संस्थानाची एक सारखी प्रगति होत गेली. तेव्हां त्या महाराजांचा ज्युबली उत्सव ह्मणजे या श्रेष्ठ तत्त्वाच्या विजयाचा उत्सव अथवा इतर राजेरजवाड्यांनीं धडा घेण्याची आणून दिलेली संधी या दृष्टीनें या उत्सवाचा विचार केला ह्मणजे दोन्ही उत्सवाबद्दल हिंदुस्थानांतल्या विचारी लोकांना पूर्ण सहानुभूति वाटेल अशी आमची खात्री आहे.

## दुसरी बाजू कळली पाहिजे.

गेल्या आठवड्यात हातीं आलेल्या 'इंडिया' पत्राच्या अकांत 'प्लॅनेट' नांवाच्या पत्रांतला एक उतारा घेतला आहे. या उताऱ्यांत असें ह्मटलें आहे कीं सिव्हिल सर्विसमधल्या एखाद्या अधिकाऱ्यानें लोकांशीं मिळून मिसळून राहण्याचा व त्यांच्याशीं सहानुभूति ठेवण्याचा क्रम ठेविला ह्मणजे जसजशी त्याची लोकप्रियता वाढत जाते, तसतसा सरकारच्या रोषास तो पात्र होत जातो, व त्याला बढती मिळण्याचे मार्ग खुंटत जातात; आणि या विधानाच्या पुष्टीकरणार्थ त्या पत्रकारानें नासिक येथें माथेफिरु राजद्रोही तरुणांच्या अत्याचारास बळी पडलेले लोकप्रिय कलेक्टर मि० जॅक्सन यांचें उदाहरण दिलें आहे. सदर पत्रकार ह्मणतो कीं, मि० जॅक्सन साहेबांचा खून होण्याचे किंचित् अगोदर तुह्मांला यापुढें बढती मिळणार नाहीं असें वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कळविण्यांत आलें होतें. ही निवळ गप्प नसून ज्यानें मि० जॅक्सन यांचे जवळ बसून प्रत्यक्ष तें पत्र पाहिलें अशा एका अधिकाऱ्याकडून ही बातमी आह्मांस कळली आहे असेंही या पत्रानें ठासून सांगितलें असल्यामुळें पुष्कळांचा भरंवसा तिच्यावर बसण्याचा संभव आहे. सरकारी अधिकारी लोकांना प्रिय असलेल्या अधिकाऱ्यावर रोष धरतात असा लोकांचा ग्रह होऊं देणें हें सरकारास व प्रजेस दोहोंसही सारखेंच अनिष्ट असल्यामुळें ही बातमी खोटी ठरावी असें आह्मी मनापासून इच्छितों, आणि खोटी असल्यास मुंबई सरकारानें तावडतोब प्रेसनोट काढून तिचें खंडन करावें असें आग्रहपूर्वक सुचवितों. यापेक्षां कमी महत्वाच्या अशा पुष्कळ गोष्टीं संबंधानें त्या सरकारानें प्रेसनोटा काढल्या आहेत. तेव्हां अशा महत्वाच्या आणि लोकांचा भलताच ग्रह करून देणाऱ्या बातमी संबंधानें खरा प्रकार सरकार लवकरच प्रसिद्ध करील अशी आह्मी आशा करतों.

## सिमला विरुद्ध व्हाइटहॉल.

हिंदुस्थानावर अंमल कोण करतो ? व्हाइसराय कीं स्टेट सेक्रेटरी ? असा एक गमतीचा वाद मि० मॅांटेग्यु यांच्या भाषणामुळें सध्यां उपस्थित झाला आहे. मि० मांटेग्यु यांचें ह्मणणें आहे कीं स्टेट सेक्रेटरीवर हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची एकंदर जोखीम आहे व हिंदुस्थान सरकार ह्मणजे स्टेट सेक्रेटरीचे हुकुम अंमलांत आणण्यापुरते एजंट आहेत. व्हाइट हॉलमधलें हें राजकीय तत्त्व सिमल्याला अर्थातच कबूल नाहीं. कारण कीं नुकत्याच कौंसिलाच्या वगैरे राजकीय सुधारणा बाहेर पडल्या त्या वेळीं त्या घडवून आणण्यास आपण कारण आहों असें हिंदुस्थान सरकारानें मोठ्या आढ्यतेनें सांगितलें होतें. तें डोलणें आतां वायां गेल्या सारखें होईल. तेव्हां मि. मांटेग्यु यांच्या भाषणानें सिमल्याला मान खंडना झाल्यासारखें वाटणें साहजीक आहे. हिंदुस्थानसरकार एजंट नाहीं ह्मणावें तर हिंदुस्थानांत एक्साइज ड्युटी बसविण्यांत आली ती हिंदुस्थानसरकारच्या मर्जी विरुद्ध वरून तसा हुकूम आला येवढ्याच कारणासाठीं ही ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. याच्या उलट लॉर्ड कर्झन साहेबाच्या कारकीर्दीकडे पाहावें तर बंगालच्या फाळणीचे वेळीं स्टेट सेक्रेटरी मि० ब्रॉडरिक हे त्या गोष्टीला विरुद्ध असतां लॉर्ड कर्झन यांनीं त्यांना मान वागविण्यास आणि फाळणी कबूल करण्यास लाविल्याचें खुद्द मि० ब्रॉडारिक यांनीं सांगितलें. तेव्हां कोण कोणाचा एजंट हें ठरविणें मोठें कठीण झालें आहे. आह्मांला वाटतें कीं हा प्रश्न तत्त्वाचा नसून व्यक्तीचा आहे. ज्याच्या अंगीं जितकी आकर्षण शक्ति असेल तितक्या मानानें तो दुसऱ्याला आपला एजंट बनवितो. कायदा सेक्रेटरीच्या बाजूचा असला तरी व्यक्तिगत शक्ति कायद्याच्या तत्त्वाला बाजूला सारून आपलें ह्मणणें खरें करीत असतें हें लार्ड लॅन्सडाऊन व लॉर्ड कर्झन, मि० ब्राडारिक, व लॉर्ड मॉर्ले यांच्या चारित्रावरून स्पष्ट होतें.

## वऱ्हाडवृत्त

हवामान-- पावसानें अगदीं मंडावून सोडलें आहे. एकंदर पर्जन्य २९ इंचापर्यंत झाला. पीकें जोमांत येण्याला सूर्यप्रकाश व रुक्ष हवाही अगत्य पाहिजे आहेत. प्लेगाचा उद्भव कांहीं कांहीं खेडेगांवांतून आढळतो,

मूर्तिजापूर-- इलिचपूर व मूर्तिजापूर पिसगांव या दोन रेलवेचीं कामें चालू करण्याचा रेलवे बोर्डानें ठराव केला आहे.

## जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीं निराशा होत, तेंव्हां सुद्धा सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्या संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी (कालरा) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वांत्या, मळमळ, दांत दाढ व दाढ दुखणे, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि खोकला वगैरेस गुण येतो किंमत प्रत्येक बाटलीस ॥० आणे. सर्व औषधे विकणारा जवळ मिळते. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथे च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वास फुकट मिळेल लवकर मागवा ही एजंट पाहिजेत, नियम मागवून पहावे.

मागविण्याचा पत्ताः—

**क्षेत्रपाल शर्मा मालक**

**सुख संचारक कंपनी मथुरा**



**गुण न आल्यास पैसे परत !**

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्तगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती म्हणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफळार्कमधु" यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड व सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते-रतिकाळीं स्त्रीपुरुषांत फार वेळ टिकणारी कामस्थिति अनुभवास येतो. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजूं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. अंगांतील नासलेली आणि कारणांखेरीज निघून जाणारी धातू पाऱ्यासारखी तेजस्वी व घट्ट बनून संततीधारणास योग्य अशी होते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रक्त, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेला प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्ताहांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येते. या औषधास पथ्य नाहीं स्त्रीवर्ज करण्याचें कारण नाहीं. कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास २ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १॥८।४, तीन बाटल्यांस २॥८।०, दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; म्हणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही॰ पी॰-नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो॰ नं. ड ९१ श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी. हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

सूचनाः—कोणताही माल गुणकारी ठरला म्हणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं. आमचें येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.


ॐ

## सत्यमेव जयते.

(सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात)

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकारितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, ऋषिव्रत, शमिपूजन, तुळसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायश्चित्ताचा विधि, दिवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिंची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांति, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं म्हणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, सामिप्रविडा, कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा सडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वस्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधि दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया या सर्वच कर्माची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत ज्योतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेली पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें यासमार्ग एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधीं ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोवाडा, देशीचळवळीचा पोवाडा, श्री॰ सयाजीराव महाराजांचा पोवाडा, राष्ट्रीय सभेचा पोवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र. व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेली असून प्रत्येकाचें अक्षरांत असून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्त्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

## सुगंधित धूप.

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधीत वस्तु, केशर, कस्तुरी, इ॰ किंमतीचे पदार्थ हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला म्हणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधांत विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेदविद्येचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रुपरावाचे ता॰ आकोट

नो. नं. ड ७२ जि॰ आकोला प्रांत वऱ्हाड

## विनंती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या सुधारलेल्या लोखंडी नागरांचा खप फारच झपाट्यानें वाढल्यामुळें व विशेषेंकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमचीं आउतें फारच खपल्यामुळें आम्ही आमचा बेळगांव येथील शेतकीचीं आउतें करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्यभागीं म्हणजे सातारा जिल्ह्यांत कुंडलरोड रेल्वे स्टेशनाजवळ किर्लोस्कर वाडीस नेला आहे. सबब आपल्यास एवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं आउतें लागतील तीं खालीं लिहिलेल्या पत्त्यावर मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,

**किर्लोस्कर बंधु,**

किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,

नो॰ नं. ड ६६ जिल्हा सातारा.

## नोटीस

नोटीस बेशमी सावतराम रामप्रसाद मालक ओंकारदास रामप्रसाद साहू दुकान कसबे दहिहांडे ता॰ आकोट जि॰ आकोले यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता॰ ९।७।१० इ॰ रोजीं लक्ष्मी मर्द हिरामण तेली राहणार दहिहांडा ता॰ आकोट जि॰ आकोला हिनें तुम्हास गाहाणखत रुपये ३५०० चें करून दिलें त्यांत स्थावर जिंदगी गाहाण लिहून दिली त्या जिंदगीवर तिचा मुळींच वारसा नसून ती जिंदगी आमचे वडिलोपार्जित असून आम्हांला बुडवावे व कोणतेही प्रकारें त्रास द्यावा या बुद्धीनें तिजला फुसलावून तुम्ही गाहाणखत लिहून घेतलें. ही गोष्ट मजला नुकतीच कळली. सबब तुम्हास कळविण्यांत येतें कीं लक्ष्मी मर्द हिरामण हिजला जिंदगी गाहाण लिहून देण्याचा मुळींच अधिकार नाहीं. तें गहाणखत पोकळ आहे असें समजावें. व त्या जिंदगीवर तुम्ही पुढें दावा केल्यास त्या वडिलोपार्जित जिंदगीवर तुमचा दावा चालणार नाहीं. कळावें. तारीख ३१ माहे आगष्ट सन १९१० इ॰ सही

नो. नं ड २७ तुकाराम व्वल्द हरबाजी द. खु.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील. आनररी, असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें वारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत अहेत त्यांहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हे अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरूपी शत्रु उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हे अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष्य इतर धातुपात उन्हाळें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मी वगैरे मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जबाट परमा, मुष्टीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धि, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होतें व मनाला उत्साह देतात. दुध व तडाख पचूं लागतें त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनूपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें पडस. लाहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगास अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जाताच तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ ।। भार बाटलीस रु० २

३ दंतवज्रवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें पुड्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिवज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये म्हणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध प्रयोक्त रसायनें, भस्म चाटण, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डी सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा करूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्यांचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावा. आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजर्ले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हच की ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें काल्पावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकळ अस्मद्बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे की, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरवी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरि.**

---

**ORIENTAL GOVERNMENT**

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

## FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur.


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No. N. 4

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे सप्टेंबर १९१० इ० [ अंक ३४

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं ७३ } G. A. Phillips. एजंट

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– **खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें; अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदरहू औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- आलिबाग. मुंबई.

## श्रीरामकृष्ण सेवाश्रम. १

### परोपकाराची एक उत्तम संस्था.

हरिद्वारनजीक कनखल या गांवीं श्रीरामकृष्ण सेवाश्रम नांवाची संस्था सन १९०१ सालच्या जून महिन्यांत स्थापन करण्यांत आली. या संस्थेला नुकतीच नऊ वर्षें पुरीं झालीं आहेत. ही संस्था स्थापन होण्यास काय कारणें झालीं त्यांचा इतिहास लक्षांत ठेवण्यासारखा आहे. सन १९०० सालीं जो दुष्काळ पडला त्या वेळीं रामकृष्ण सांप्रदायांतील कांहीं उत्साही स्वयंसेवक बरोबर घेऊन स्वामी कल्याणानंदजी हे राजपुतान्यांत दुष्काळग्रस्तांना साह्य करण्यासाठीं तिकडे गेले. स्वामी कल्याणानंदजी हेच या संस्थेचे संस्थापक व व्यवस्थापक होत. त्या ठिकाणीं दुष्काळानें गांजलेल्या लोकांची जी हृदयद्रावक स्थिति त्यांनीं अवलोकन केली, भुकेनें तळमळणाऱ्या लोकांची जे भयंकर हाल त्यांच्या नजरेस पडले आणि पोटांत उत्पन्न झालेल्या आगीनें राहावेना ह्मणून भाऊ बहिणीला, नवरा बायकोला, आणि आईबाप मुलांना प्रेमाचा पाश तोडून सोडून जातात हें जेव्हा त्यांनीं पाहिलें तेव्हा ह्या सर्व करुणास्पद प्रकाराचा यांच्या मनावर अढळ परिणाम झाला. आणि याउप्पर आपलें आयुष्य, आपलें तनमनधन, आपलें जीवितसर्वस्व गांजलेल्या मानवबंधूंच्या सेवेलाच अर्पण करावयाचें असा स्वामी कल्याणानंदजींनीं आपल्या मनांत निश्चय केला. स्वामींना वैद्यकाची आधींच माहिती होती तिचाही त्यांनीं या कामीं फार उपयोग झाला. श्रीक्षेत्र काशीप्रमाणें पुरातन व पवित्र असें कनखल गांव आपल्या कार्याचा प्रारंभ करण्यास त्यांनीं योग्य क्षेत्र निवडलें. भरतखंडांतून चोहों प्रांतांतून दरसाल हजारों यात्रेकरू या ठिकाणीं जमत असतात. त्यांना आरोग्याविषयक नियमांची यत्किंचितही माहिती नसते आणि दारिद्र्य हें तर त्यांना जन्माचें आंदण मिळालेलें असतें. यामुळें या ठिकाणीं सांथीचा ताप उत्पन्न झाला ह्मणजे शेंकडों लोक त्याला बळी पडतात. हरिद्वार गांव तराईच्या पायथ्यापाशींच असल्यामुळें मलेरिया बहुधा तेथें असतोच. सहा अगर बारा वर्षांनीं ज्या वेळीं कुंभमेळा भरतो त्या वेळीं लाखांनीं यात्रा जमते. याशिवाय कनखल गांव पंजाबाहून येणाऱ्या मोठ्या रहदारीच्या रस्त्यावर असल्यामुळें वर्षांतून कित्येक महिने त्या ठिकाणीं दांडगा व्यापार चालतो. या ठिकाणची व आजुबाजुची लोकवस्ती फार गरीब व अडाणी असल्यामुळें ते आपल्या जुन्या समजुती सोडून देत नाहींत आणि तराईमुळें उत्पन्न होणाऱ्या साथीला बळी पडतात. औषधपाण्याचीही जवळ कांहीं सोय नाहीं. ही सर्व स्थिति पाहून आपली जन्मभूमी बंगाल देश असताही स्वामी कल्याणानंदजींनीं याच लोकांत आपलें कायमचें घर करून राहावयाचें असा निश्चय केला. एका धर्ममूर्ति हिंदु गृहस्थानें स्वामींना लहानशी बागेची जमीन दिली. आणि दुसऱ्या एका गृहस्थाकडून आश्रमांतील नोकरांचा खर्च मिळाला. या देणग्या आपल्या शुभकार्याला आरंभ करण्याकरितां देवानेंच पाठविल्या असें स्वामींस वाटलें आणि १९०१ सालच्या जून महिन्यांत त्यांनीं सेवाश्रमाची संस्थापना केली. या वेळीं आश्रम व त्याला जोडून त्यांनीं जें इस्पितळ उभारलें तें ह्मणजे झोपड्याच होत्या. सन १९०४ सालीं प्रस्तुत लेखक ज्या वेळीं हा आश्रम पाहावयास गेला त्या वेळीं त्या ठिकाणीं सर्व जरी गवती झोपड्याच स्वामींच्या दृष्टीला पडल्या तरी इस्पितळासाठीं एका मोठ्या इमारतीचा पाया घालण्याचें काम त्या वेळीं चाललें होतें. त्या वेळापासून स्वामी कल्याणानंदजी व त्यांच्याबरोबर काम करणारे तीन चार दुसरे गृहस्थ यांचा स्वार्थत्याग हळूहळू लोकांच्या लक्षांत येऊं लागला व लोकांकडून हळूहळू मदत मिळूं लागली. सांप्रत एक भव्य नवीन तऱ्हेची इमारत आश्रमाच्या स्थानाला शोभा आणीत आहे आणि त्या ठिकाणीं रुग्णजनांना ठेवण्याची सोय करण्यांत आली आहे. येथील व आसपासचे लोक अत्यंत गरीब आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांना औषधें विकत घेण्यास पैसे कोठून देतां येणार व पुष्कळ दिवस औषधपाण्याचा खर्च तरी कोठून चालवितां येणार ? त्यामुळें तीस तीस चाळीस चाळीस मैलांवरून लोक या ठिकाणीं येत असतात. सालीना जे रोगी बरे होऊन आश्रमांतून बाहेर पडतात त्यांची संख्या दर साल वाढत चालली आहे आणि या गोष्टीवरून या सेवाश्रमाची उपयुक्तता किती आहे हें सहज ध्यानांत येईल. १९०४ साली १९ शें रोगी बरे होऊन आश्रमांतून बाहेर गेले. १९०८ सालीं ८ हजार २ शें रोगी रोगमुक्त झाले व गेल्या वर्षी ही संख्या १० हजार ३ शें ९० वर गेली. आश्रमांतून मदत करतांना सर्वांना समदृष्टीनें व सढळ हातानें ती करण्यांत येते. त्या ठिकाणीं जाति, धर्म किंवा देश यांचा विचार करण्यांत येत नाहीं. गेल्या वर्षी खुद्द आश्रमांत १२० रोग्यांना ठेऊन घेण्यांत येऊन त्यांची शुश्रूषा करण्यांत आली. त्यांपैकीं, कित्येक रोगी तर तीन तीन महिन्यांपर्यंत आश्रमांत होते. यावरून खरें परोपकाराचें काम स्वामींनीं व त्यांच्या शिष्यांनीं गाजा वाजा न करितां कसें चालविलें आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. सर्व रोगी गरीब यात्रेकरू होते आणि ते निरनिराळ्या ४४० ठिकाणांहून आलेले होते. रोगही कांहीं सामान्य प्रकारचे होते असें नाहीं. १४९ रोग्यांना भयंकर प्रकारचा निमोनिया झाला होता. ७६ कॉलऱ्याचे रोगी होते. १८ क्षयाचे, १९ रक्तपित्तीचे, ११ प्लेगाचे व ६ काळपुळीचे रोगी होते.

गेल्या वर्षी आश्रमाच्या इमारतींत नवीन भर घालण्यांत आली. जास्त रोग्यासाठीं आठ नवीन वार्डें बांधण्यांत आलीं आणि लांबून जे रोगी येतात त्यांच्याकरितां एक गेस्टहाऊस बांधण्यांत आलें. सांसर्गिक रोग्यांची संख्या दिवसेंदिवस वाढूं लागल्यामुळें त्याच्यासाठीं स्वतंत्र वार्डांची आवश्यकता भासूं लागली आहे. कॉलरा, प्लेग, अतिसार वगैरे आणि त्याचप्रमाणें क्षय झालेल्या रोग्यांकरितां स्वतंत्र वार्ड पाहिजे आहेत. क्षयरोग्यांच्या वार्डाकरितां एका उदार गृहस्थानें १९०८सालीं हजार रुपयांची देणगी दिली आहे. याप्रमाणें वार्ड बांधण्यास सुरवात केली, पण जास्त मदतीच्या अभावीं तें काम तसेंच पडून राहिलें आहे. या गोष्टीला आज एक वर्ष झालें, पण त्या कामाचें पाऊल पुढें पडलें नाहीं. ही खोली बांधण्यास आठ नऊ हजार रुपये खर्च येईल, पण एवढी ही मदत मिळूं नये ही दुर्दैवाची गोष्ट होय. धर्मात्म्यांकडून आश्रमाला मदत मिळेल अशी आश्रमानें आशाच बाळगूं नये काय? याशिवाय दुसरीं वार्डें तर बांधावयाचींच आहेत. या सेवाश्रमाची सर्व मदार लोकाश्रयावर अवलंबून आहे हें निराळें सांगावयास नको. लोक मदत करतील तरच आश्रमाचें पाऊल पुढें पडणार आणि तरच अकलेवरचें काम त्याच्याकडून अधिकाधिक होत जाणार. अडल्या वेळीं मदत घ्यावयाला आश्रमापाशीं रिझर्व फंड नाहीं. आणि लोकांकडून मदत मिळेनाशी झाली तर ह्या पवित्र, थोर व पुण्यकारक आश्रमाची, ह्या स्वार्थत्यागानें व स्वसुखनिरभिलाषतेनें उभारलेल्या संस्थेची काय अवस्था होईल! हा खेदजनक विचार लोकांनी आपल्या मनांत करावा. उद्यां सकाळीं काय होईल किंवा काय मिळेल याचा स्वामींनीं गेल्या नऊ वर्षांत एकदाही विचार केला नाहीं. 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान् , या साधुपुरुषाच्या' उक्तीवर पूर्ण भरंवसा ठेवून आश्रमांतील लोक आपलें कर्तव्य अहर्निश परमेश्वरावर निष्ठा ठेऊन करीत आहेत.पैसा मिळो, रुपया मिळो, त्याच्याकरितां त्यांनीं पदर पसरिला आहे, जें मिळेल तें ते संतोषानें घेत असतात. आणि आजवर हजारों लोकांना त्यांनीं साहाय्य केलें आहे. हा आश्रम ह्मणजे केवळ औषधपाण्याचीच मदत देणारा आहे असेंही नाहीं. या आश्रमाच्या द्वारें अप्रत्यक्ष रीतीनें एक प्रकारचें उपयुक्त शिक्षणही मिळत असतें. आश्रमांत जे रोगी येत असतात त्यांत साधु व ब्रह्मचारी बरेच असतात व आश्रमांतील आपल्या बंधूंचा अलौकीक स्वा-

र्थत्याग पाहून त्या गोष्टींचा त्यांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. देशभर लंगोटाचिमटा कांखेंत मारून भटकत फिरावें, मिळेल तें खाऊन ऐदी बनावें हें खरें संन्याशाचें लक्षण नसून आपल्या गांजलेल्या देशबंधूंच्या सेवेला स्वार्थत्यागपूर्वक झटणें हाच खरा संन्यास होय. ही गोष्ट आश्रमांत राहणाऱ्या रोग्यांच्या मनावर बिंबूं लागली आहे. आणि त्याप्रमाणें कित्येक साधु बरे झाल्यावर मोठ्या संतोषानें शुश्रूषेचें काम करीत असतात. आश्रमांत एक लहानशी लायब्ररीही ठेवण्यांत आली असून तिचाही चांगला उपयोग होत असल्याचें रिपोर्टावरून दिसतें. या सेवाश्रमासारख्या उपयुक्त संस्था देशांत जर पुष्कळ ठिकाणीं निर्माण होतील तर आमच्या साधूंचें काय करावें हा प्रश्न सुटणें बरेंच सोपें जाईल. असो. हें वर सांगितलेलें काम खऱ्या स्वार्थत्यागाचें व भूतदयेचें नाहीं, असें कोणी ह्मणेल काय ? रोज जे कांहीं थोडेथोडके पैसे मिळतील त्याच्यावरच कशीबशी गुजरण करून हें काम चालूं राहावें असें लोकांना वाटतें काय ? आमच्या मुंबापुरीचीच गोष्ट घ्या. या ठिकाणीं निरुपयोगी धर्मदायांत लाखों रुपये खर्च होतात. आमचे धर्मभोळे हिंदु धनिक या शहरीं येणाऱ्या साधुसंन्याशांना पोळ्या खाऊं घालून त्यांना ऐदी बनविण्यांत व्यर्थ लाखों रुपये वेंचतात. तोच दानधर्म भक्तिमुक्तीचें खरें शिक्षण ज्या ठिकाणीं मिळेल अशा संस्थेकडे झाला तर आपला पैसा सत्कार्यीं लागल्याचें पुण्य धर्मशील गृहस्थांच्या पदरीं पडणार नाहीं काय ? क्षयरोग्यांसाठीं एक घर बांधण्याचें काम आज एक वर्ष पडून आहे. रोज त्या कामाची अत्यावशकता भासत आहे या सत्कार्यास मदत करण्यास या शहरांतील कोणी हिंदु शेट्या किंवा धनिक गृहस्थ पुढें येऊन आपल्या देशबंधूचे अंतःकरणापासून निघालेले पुण्य व चिरकालिक आशिर्वाद संपादन करील काय ? या आश्रमाला केवळ हिंदूंनींच मदत केली पाहिजे असें नाहीं. आश्रमाकडून होणाऱ्या मदतीच्या बाबतींत जातीधर्माचा भेदभावच नाहीं. गेल्या वर्षाच्या रोग्यांत एक हजार मुसलमान होते. या शहरांतील एक पार्शी औषधांचे व्यापारी दरवर्षी या आश्रमाला १ हजार रुपयांचीं औषधें फुकट पाठवीत असतात. यावरून या आश्रमाची दानपात्रता सुव्यक्त होते. स्वामी विवेकानंदांनीं हा आश्रम पाहून ह्मटलें कीं, 'तुमचें तुमच्या मानवबंधूंवर प्रेम आहे काय ? मग देव शोधावयाला दुसरीकडे कशाला जातां ? सर्व गरीब, दीन, अनाथ, दुर्बळ हे ईश्वरच नव्हेत काय ? त्यांचीच पूजा आधीं करा. गंगेच्या कांठीं विहीर खणण्यानें पुण्य संपादन होणें अगर देव मिळणें शक्य नाहीं."

भूतदया

**ता. क.**—या संस्थेस ज्यांना मदत करावयाची असेल त्यांनीं ती स्वामी कल्याणनंद सुपरिंटेंडंट रामकृष्ण सेवाश्रम कन्हखळ, डिस्ट्रिक्ट सहारनपूर यू. पी. या पत्यावर पाठवावी. देणगी कितीही अत्यंत लहान असली तरी तिचा स्वामी अत्यादरें स्वीकार करतील.

# वर्तमानसार.

संयुक्त प्रांताच्या प्रदर्शनांत पंजाबचे सुप्रसिद्ध मल्ल कीकडासिंग, गामा व हिंदुस्थानांतील इतर मल्लांच्या कुस्त्या होण्याचें नक्की ठरलें आहे. सदर्हू प्रदर्शनाच्या जाहिराती उर्दू आणि हिंदी भाषेंत काढून त्या खेड्यापाड्यांतूनही वाटण्यांत येत आहेत. पंजाब, मध्यप्रांत, वायव्य सरहद, बंगाल व मद्रास या इलाख्यांतून वाटण्याकरितां बंगाली, तामिळी व तेलगू भाषेंत जाहिराती काढल्या आहेत.

बर्लिन येथील रायटरचा बातमीदार कळवितो कीं, अर्धवट सरकारी रीतीनें असें कळतें कीं, केसर बादशहांच्या युवराज साहेबाबरोबर त्यांची पत्नी सिलोनपर्यंत जाणार आहेत व तेथून त्या स्वदेशास परत येतील. त्यानंतर युवराज हे हिंदुस्थान, सयाम, त्सनटू, पेकिंग आणि टोकियो येथें जाऊन सैबीरियाच्या मार्गानें स्वदेशास परत येतील.

डुराडुमिन नांवाची एक नवीन धातु मेसर्स विकर्स, मॅक्सिम आणि कंपनीनें शोधून काढली आहे. ही धातु ॲल्युमिनम धातूपेक्षां किंचित् जड असून पोलादाप्रमाणें कठीण आहे.

लारखाना जिल्ह्यांतील एक सब इन्स्पेक्टर यांजवर दुसऱ्या मनुष्यास गोळी मारल्याचा आरोप होता व त्याबद्दल सेशन कोर्टांत त्याची चौकशी चालू होती. सेशन कडून मि. मर्फी यानीं आरोपीवर गुन्हा शाबीत झाला तरी त्याच्या पोरवयाकडे पाहून पांच वर्षें सक्तमजुरीची शिक्षा सांगितली.

इ. आय. रेल्वेच्या आसनसोल स्टेशनावर हॅरिसन नांवाच्या एका रेल्वे गार्डानें युरोपियन पोलिस सार्जंट मि. हॅरिंगटन यास मारहाण केल्यावर त्याची चौकशी चालू आहे. कांहीं दिवसांपूर्वीं सदर्हू सार्जंट हॅरिसन यास स्टेशनावर तो दंगा करीत होता ह्मणून ती कोंडून ठेविलें होतें. पुढें हॅरिसन याची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यानें सार्जंट याचा सूड घेण्याच्या उद्देशानें तो बसला असतां त्याच्या कपाळांत दगड फेंकून मारला व तो धरावयास आला तेव्हां आणखी बेदम मारलें. हें पाहून इतर पोलिस शिपायांनीं हॅरिसन यास पकडून ठाण्यावर नेलें. हॅरिसन हा हल्लीं अटकेंत असून त्याजवर खून करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. सार्जंट यास औषधोपचार चालू आहेत.

अल्हांबा येथें झालेल्या कुस्तींत हिंदुस्थानांतील मल्ल इमामबक्ष यानें स्विझर्लंडमधील मल्ल लेम याचा पराभव केला. इमामबक्ष यानें पहिल्या खेपेस तीन मिनिटें एक सेकंदांत व दुसऱ्या खेपेस एक मिनिट आठ सेकंदांत आपल्या सामनेवाल्यास चित केलें.

'वेस्टपाइंट' नांवाची एक बोट ग्लासगो येथून चार्लस्टन येथें जात असतां तिला एकाएकीं आग लागली. एक आठवडा पर्यंत आग विझविण्याचें काम चालूं होतें अखेर रेस भुशीरापासून ६०० मैलावर असल्यावर आंतील उतारूंनीं आग विझविण्याचा नाद सोडला. व ते जीव बचावण्याचा विचार करूं लागले. तीन दिवस पर्यंत ते अर्ध्या अन्नावर होते. शेवट 'डेव्होनियन' आगबोट त्यांच्या मदतीस गेली. तिनें सोळा लोकांना बचाविलें. वेस्ट पॉइंट बोटीचा कप्तान व १८ नावाडी ज्या होडीनें गेले तिचा पत्ता नाहीं.

---

# भक्तिवात्सल्य नाटक.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

## अंक पहिला

### प्रवेश ३ रा. स्थल बेदर येथील एक घर.

**दिगंबरपंत.**— पद

मन न धजत धावयास मा सम कुमार यास ॥
गमत खचित यवनजनप क्षुधित व्याघ्र मन्मनास ॥
ब्रह्मतत्व रक्त पिउनि हरिल हा मुजीवितास ॥
भूप—कोप सौख्य—लोप करुनि करूं मजा हताश ॥ १ ॥

**दासोपंत.**— बाबा आपली विनंती बादशहानें मान्य केली ना ?

**दिगंबरपंत.**— बाळा मृगजलानें कोणाची तहान भागली आहे कां ? तर हे लोक स्वार्थाला आळा घालून प्रजाजनांच्या सुखदुःखकडे पहातील. यांची मात्र चंगळ चाललीच पाहिजे. मग प्रजाजन मरो वा दुष्काळानें उपासमार काढो. मुसलमान अमीर उमराव सुखांत असले ह्मणजे सर्व देशाला रोज दिवाळीच आहे; हा त्यांचा ठाम सिद्धांत आहे. या नरकवासांतून आर्यांना काढणारा श्रीदत्तच समर्थ आहे. पण आतां बादशहानें केलेल्या कराराची आठवण झाली कीं, भीतीनें काळजाचें पाणी होतें.

पद

तें वचन नसें नृपतीचें ॥ गुरु तर शर हार्दें टोचे ॥
वा खर गरधर फणिवर तो ॥ मजला जणुं दंशीतो ॥
किंवा दव कीला वमतो ॥ तनु यवना जाळीतों ॥
या व्यसनीं असु-हर जरि हरण करिल असुचें ॥
तरि बरवें साचें ॥ १ ॥

**दासोपंत.**— बाबा असें संकट कोणतें आलें आपल्यावर !

**दिगंबरपंत.**— बाळा या चांडाळाचे उदरीं तूं व्यर्थ जन्म घेतलास. मी आज सर्वस्वी तुझा घात करणार !

**दासोपंत.**— पद

मम ऊर येतसे भरुनी ॥ कोणत्या असा तुह्मि व्यसनीं ॥ मज कथा ॥ कां आश्रु चमकती नयनीं ॥
वदतां कां तुह्मि स्फुंदोनी ॥ मज कथा ॥
कां दीर्घ श्वास सोडोनी ॥ बघतसा मला निरखोनी ॥
कां कथा ॥ हें काय ॥ नुमजतें हाय ॥ यास सदुपाय ॥
कराया ह्मणुनी ॥ प्रार्थितों जोडुनी पाणी ॥
मज कथा ॥ १ ॥

**दिगंबरपंत.**— बाळा बादशहांनीं माझी विनंती मान्य केली नाहीं. वसुला करितां तुला ओलीस घेऊन महिन्याचे आंत वसूल न झाल्यास तुला मुसलमान करण्याचाहि करार करून घेतला आहे त्यानें. आदाई करितां प्रथम तो मला बंदिवान करण्यास तयार झाला. बाळा माझ्या मागें तो यवन तुझी अनन्वित छल करील. व अंतीं तुझें आर्यत्वाचें शुद्ध रक्त शोषण करून तुला आर्य या नांवाला मृतप्राय करील !

पद

ऐसें विदित मला असुनी ॥ टाकिलें तुज व्यसनीं ॥
कंठीं बांधुनि संकटपाश ॥ करुनी तुजला हाय हताश ॥
करितो तात तुझा हा नाश ॥ मायापाश तोडोनी ॥ १ ॥

**दासोपंत.**— इतकेंचना ! पितृसेवा करण्याकरितां श्रीनें हा सुयोगच आणिला. मुदतीच्या आंत तुह्मी माझी सुटका करालच मग संकट तें कोणतें ?

**दिगंबरपंत.**— होय. वसूल न झाल्यास सर्व मालमत्ता विकून मी तुझी सुटका करीन. पण मध्यंतरींच हा क्रूर बादशहा तुझ्यावर एखादें संकट आणणार नाहीं कशावरून ?

**दासोपंत.**— आपला सांभाळ करणार श्री दत्त समर्थ आहे.

**वजीर.**— ( पुढें येऊन ) चलो देसपांडा करार बमूजब आपका लडका हमारे ताबेमे दो. नही तो तुम बंदीखानेमे चलो. खाविंद रहा देखते है. ( दिगंबरपंत साचित होतो. )

**दासोपंत.**— तात कोणतीहि चिंता न करितां मला बादशहाचे स्वाधीन करा.

पद

जयाला दत्तात्रय वाली ॥ तयाला भय न कदाकाळीं ॥
यम वंदी यत्पदकमलीं ॥ तयाला म्लेंच्छ भीति कसली ॥
गरुडपिलाला भक्षायाला व्यालि कधी धजली ॥
ह्मणोनी भीति मला नुरली ॥ १ ॥

**दिगंबरपंत.**— आतां तुझा माझा वियोग होणार ! तुला व्यसनोदधींत लोटणाऱ्या या तुझ्या ताता पेक्षां, तो दयाघन जगतांत श्रीदत्तात्रय तुझें सर्वस्वी रक्षण करील. ह्मणून बाळा.

पद

जड पडतां बहु दत्ता स्मरावें ॥ लीनपणें त्या शरण रिघावें ॥
सगुण चरित्रीं त्या आळवावें ॥ पतीत मी ऐसें भावें वदावें ॥
नतजनपालन श्रीद तयाचें ॥ संकट वारणिं मग तो धांवें ॥ १ ॥

**दासोपंत.**— प्रभु या संकटांतून मला खात्रीनें सोडवील. आपण कांहीं काळजी न करतां गांवीं निघून जावें. परमेश्वर कृपेनें आपली भेट लवकरच होईल. ( वजिरा सह जातो. )

**दिगंबरपंत.**— ( गाहिवरून )

पद

सांभाळा बालका ॥ कुजनीं विपिनीं ॥
जातों मी सोडुनि ॥ ह्मणुनी ॥
करि विनवणि ॥ अष्ट दिशा पालका ॥ १ ॥
तच्छिरिं असुं द्या कृपाव्यजन तें ॥
यवन-दर-शरा वारायाते ॥ धृति ते ॥ शमते ॥
सुख ते ॥ द्या त्याते ॥ विनती ते आइका ॥ १ ॥

**अंक पहिला समाप्त.**

पुढें चालू.

वऱ्हाडसमाचार.

भाद्रपद शुद्ध ८ शके १८३२ दुर्मतीनामसंवत्सरे

## सध्यांचा प्रश्न.

—:+*+:—

हिंदुस्थानांतल्या पुढ्यांपुढें जे अनेक प्रश्न सध्या आहेत त्यांतला अत्यंत महत्वाचा प्रश्न ह्मणजे 'आमच्यांतल्या तरुणाचें वर्तन' हा आहे. या तरुण मंडळींच्या शिक्षणाविषयक यंत्रांतला स्क्रू कोठें तरी ढिला पडला आहे हें दिवसेंदिवस अधिक स्पष्ट होत आहे. गेल्या दोन वर्षांत ज्या कित्येक गोष्टी उघडकीला आल्या आहेत त्यांवरून धर्माविषयींच्या खोट्या कल्पना मनांत भरल्यामुळें तरुणांचीं मनें दूषित होऊन तीं बहकलीं असावींत अशी शंका येते. कलकत्याच्या माणिकतोला क्लबाच्या चौकशीचे वेळीं गीतेचा कसा विपरीत अर्थ त्या क्लबच्या मंडळीच्या डोक्यांत भरला होता तें दिसून आलें. युगांतर पत्रांत तरुणांचें रक्त गरम करण्यासारखे जे उत्तेजनपर लेख येत असत, त्यांत बहुधा गीतेंतल्या श्लोकांचें विपरीत तऱ्हेनें केलेलें विवेचन असे. गीतेंतल्या सुंदर तात्विक उपदेशरत्नांची अशी अवहेलना अथवा विटंबना करण्याकडे तरुणांची ही प्रवृत्ति आजकालची किंवा गेल्या दोन तीन वर्षांतलीच आहे असें नाहीं. १८९६ सालीं पुण्यास दोघा युरोपियनांचे खून करणाऱ्या चाफेकर कंपूनें ही आपल्या पापाचा झाडा या लोकीं देत असतां वधस्तंभावर गीतेचें पुस्तक उराशीं बाळगलें होतें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. एकीकडे पाहावें तर आमच्या लोकांच्या धर्माभिमानाला ऊत आलेला दिसतो. पुण्याचे एक पदवीधर टाळ कुटीत तुकारामबोवाच्या पालखीसमोर नाचण्यांत आणि दुसरे लोक तसे करीत नाहींत ह्मणून त्यांचेवर दुगाण्या झाडण्यांत पुरुषार्थ समजतात व पुराणांना व्याख्यानांत कोणी नांवें ठेविलीं याबद्दल पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेचे पदवीधर सेक्रेटरी सक्षौर प्रायश्चित्त घेण्यास तयार होतात, आणि दुसरीकडे पाहावें तर केशव शास्त्री दामल्या सारखे चतुर्थाश्रमी विद्वान् गीतेंतून राजद्रोही अर्थ काढतात! तेव्हां हा धर्माभिमान कीं धर्माची थट्टा असा प्रश्न अर्थात् उत्पन्न होतो. हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन झाल्याशिवाय हिंदुस्थानची उन्नति व्हावयाची नाहीं असा कित्येक तरुणांचा सिद्धान्त आहे. पण त्याचा आदर्शभूत हिंदुधर्म तरी कोणता? सर्व मनुष्यप्राण्यांना बंधुवत् मानण्यास आणि सर्व बुद्धीचा, ज्ञानाचा व कर्तृत्वशक्तीचा उगम जो सृष्टिनियंता परमेश्वर त्याची अनन्यभावें भक्ति करण्यास शिकविणारा हिंदुधर्म त्यांचा आदर्श आहे काय? ऐहिक वैभव पारमार्थिक वैभवापुढें तुच्छ आहे असें मानण्यास शिकविणारा आणि सदा सर्वकाळ आपला देह चंदनाप्रमाणें परोपकारार्थ झिजविण्यास शिकविणारा जो हिंदुधर्म तो यांना पूज्य वाटतो काय? ज्या हिंदुधर्मावरच्या दृढ श्रद्धेनें एके काळीं हिंदुस्थान देश वैभवाच्या व सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झाला होता तो हिंदुधर्म परत अवतीर्ण व्हावा ही त्यांची इच्छा आहे काय? गेल्या दहापंधरा वर्षांच्या इतिहासाकडे जो विचाराच्या दृष्टीनें पाहील आणि आमच्या धार्मिक ह्मणविला जाणाऱ्या गणपति–उत्सवांतलीं व्याख्यानें व मेळ्यांचीं पदें यांच्याकडे नजर फेंकील त्याला हें सहज दिसून येईल कीं वर दर्शविल्या प्रकारचा हिंदुधर्म पुनः अवतीर्ण व्हावा ही सध्याच्या क्रांतिप्रिय उच्छृंखल तरुणांची इच्छा नाहीं. त्यांचा हिंदुधर्माची कल्पना निराळी आहे, त्या धर्माचें प्रवचन करण्याची उपदेशकांची दिशा ही निराळी आहे, आणि धर्माचा मनावर जो संस्कार अभिप्रेत आहे तो ही निराळ्या प्रकारचा आहे. धर्माचा उद्देश, त्याचें कार्य, व त्या कार्याची दिशा हीं सगळींच जेथें चुकलीं तेथें धार्मिक समजुती आणि समाजसुधारणा यांच्यांत छत्तीसाचा आंकडा पडल्याचें नवल काय? समाजसुधारणेचे अध्वर्यु–बंगाल्यांत पंडित ईश्वरचंद्र, किंवा आपल्या इकडे विष्णु शास्त्री पंडित, माधवराव रानडे, काशिनाथपंत तेलंग वगैरे आजच्या काळीं जर पुनः अवतीर्ण झाले तर त्यांची शेणमार खात्रीने होईल इतका दुरभिमान, स्वतः विषयींचा फाजील श्रद्धा आणि परकीयाविषयींचा द्वेष सध्या बोकाळला आहे. बंगालच्या तरुणांच्या डोक्यांत स्वदेशी दरोडे घालण्याची कल्पना कोणी कोंबली? हिंदुधर्मग्रंथांनीं? छे! त्यांचे विपरीत अर्थ करणारांनीं. गणपति–उत्सवासारखा खरोखर सोज्वळ आणि धर्मपर उत्सव शिमग्यांत ह्मणण्यास देखील अयोग्य अशा प्रकारचीं पदें निर्लज्जपणानें ह्मणून कोणी भ्रष्ट केला? गणेशपुराण रचणारांनीं? नाहीं. तर गणपति–देवतेच्या धडधडीत समोर त्या देवतेचें, स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धिचें, जनतेचें किंवा राजपुरुषांचें यत्किंचितहि भय न बाळगतां अशा ठिकाणीं थोर प्रकारची देशसेवा करणारांची टवाळी करून परकीयाविषयीं द्वेषाचें बीज पेरणारांनीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. पुर्वीच्या व्याकरण, न्याय, मीमांसा वगैरे शास्त्रांत पारंगत असलेल्या शास्त्रीमंडळीला किंवा कृष्ण शास्त्री चिपळूणकर, गोडबोले, तेलंग, रानडे, काथवटे, गुंजीकर वगैरे मंडळीला गीतेचे श्लोक लावण्या इतके सुद्धां संस्कृताचें ज्ञान नव्हतें काय? पण त्यांपैकीं एकालाही गीतेंत खुनाचा उपदेश सांपडूं नये, आणि त्याचा शोध अलीकडे दहापांच वर्षांत लागावा हें केवढें आश्चर्य आहे! आमच्या या तरुण मंडळीच्या मनांत धर्माच्या आवरणाखालीं जें विषाचें बीजारोपण झालें आहे तें इतकें भयंकर आहे कीं हिंदुस्थानचा निःपात या एका गोष्टीमुळें जितका लवकर होईल तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें व्हावयाचा नाहीं, अशी आमची प्रामाणिकपणाची समजूत आहे. हें विषारोपण दहापंधरा वर्षांतच झालेलें आहे खरें; पण तें आतां तरुणांच्या रक्तांत भिनलें असल्यामुळें त्या विषावरचा उतारा लवकर न दिल्यास लवकरच कांहीं मोठा अनर्थ ओढवल्या शिवाय राहणार नाहीं असें सध्यांच्या स्थितीवरून दिसतें. सरकारी अधिकाऱ्यांच्या करड्या नजरेमुळें तरुणांच्या मनाच्या अधार्मिक वृत्ति कांहीं काळ दबल्या राहतील. पण आंतल्या आंत धुमसणाऱ्या ज्वालामुखीप्रमाणें ही स्थिति प्रत्यक्ष स्फोटा पेक्षां ज्यास्त भयंकर आहे. याला आतां उत्तम उपाय ह्मणजे अगदीं मराठी शाळांतल्या उजळणीच्या वर्गापासून खऱ्या धर्मतत्त्वाचें आणि नीतीतत्त्वाचें शिक्षण शाळांतून चांगल्या शिक्षकांचे हातून देण्याची तजवीज केली पाहिजे. या कामीं चागल्या शिक्षकांची निवड होणें हें जितकें अवश्य आहे, तितकीच चांगल्या पुस्तकांची निवड होण्याची ही अवश्यकता आहे. लोकांची रामायण, महाभारत, भागवत, वगैरे ग्रंथांवर पूर्ण श्रद्धा आहे, आणि त्या ग्रंथांत जीं अमूल्य उपदेशतत्त्वें आहेत तीं पाहिलीं असतां या श्रद्धेचा सदुपयोग आपणांस करून घेतां येईल. रामायण, भारत वगैरे ग्रंथांतून मुलांना न सांगण्यासारखा जो भाग आहे तो काढून टाकून त्यांना समजण्यासारखा तेवढा भाग गोष्टीच्या रूपानें सांगणें व त्यांतलें सार त्यांच्या मनावर बिंबविणें हा खऱ्या धर्मशिक्षणाचा पाया आहे. अशा प्रकारचीं पुस्तकें मराठी भाषेंत झालेलीं आहेत. त्यांचा उपयोग शाळांतून सुरू करावयाचें तेवढें राहिलें आहे. रा. आपट्यांचीं बालरामायण, बालभारत, वगैरे पुस्तकें वऱ्हाडच्या शाळातून सुरू करण्याविषयीं हुकूम सुटल्याचीही खबर आहे. ही बातमी खरी असल्यास धर्म व नीति यांच्या शिक्षणाच्या प्रसाराच्या बाबतींत आमचें प्रांतिक सरकार आपल्या कर्तव्यास जागृत आहे हें पाहून आह्मांस संतोषच वाटेल. इतर प्रांतांतूनही हीं व या सारखीं अन्य पुस्तकें असल्यास तीं चालू करून सध्याच्या अधार्मिक प्रवृत्तीच्या प्रसारास व वाढीस अवश्य आळा घातला पाहिजे. रोग बळावला आहे असें ह्मणून निराश होऊन बसण्यांत अर्थ नाहीं. रोग्याच्या नाकाशीं सूत धरलें असलें तरी मात्रा चाटविण्यास वैद्यानें आळस करूं नये. कारण कीं मनुष्याचा जीवितंतु किती लांब आहे तें धन्वंतऱ्यांना सुद्धां कळत नाहीं. पण ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट झाली. जेथें सबंध समाज, देश, किंबहुना राष्ट्र मृत्युपंथाला लागण्याची भीति आहे तेथें तर याच्या पेक्षांही शतपटीनें अधिक खबरदारी घ्यावयास व कार्यतत्परता दाखवावयास पाहिजे आहे. शाळांतून–विशेषतः दुय्यम शिक्षणाच्या शाळांतून–धार्मिक व नीतिशिक्षण देण्याची अवश्यकता आहे ती येवढ्याच साठीं. या शाळांतून बहुतेक तरुण बांड बाहेर पडतात. ते तरी धर्माविषयीं विपरीत कल्पना डोक्यांत भरवून घेऊन बाहेर पडूं नयेत येवढें जरी आज केलें तरी पुरें आहे.

—⸺∞०∞⸺—

## एक नवा लाभ.

हिंदुस्थानानें अल्पलाभाबद्दल कां होईना, पण सरकारचे आभार मानले पाहिजेत, आणि ता० २ च्या ग्याझिट ऑफ इंडियामध्यें हिंदुस्थानच्या लायक लोकांना सिव्हिल सर्विसच्या जागा देण्याचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यामुळें हिंदी लोकांना होणारा लाभ कांहीं सामान्य नाहीं. या ठरावानें प्राव्हिन्शियल सर्विसमधल्या किंवा त्या बाहेरच्या कोणाही लायक हिंदी गृहस्थास आजपर्यंत केवळ सिव्हिल सर्विस मधल्याच लोकांना दिलेल्या अशा जागा देण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास दिला आहे. मात्र अशा जागांची संख्या एकंदर संख्येच्या एक चतुर्थांशापेक्षां ज्यास्त नसावी अशी मर्यादा घालण्यांत आली आहे. या ठरावापासून तात्कालिक फायदा झालेला लार्ड मिंटो यांच्या कारकीर्दींत कदाचित् दिसणार नाहीं. पुढेंही प्रांतिक सरकारास दिलेला हा अधिकार त्यांच्या हातून हिंदुस्थानच्या लोकांना फायदेशीर अशा रीतीनें बजावला जाईलच असेंही खात्रीनें ह्मणवणार नाहीं. पण तूर्त एक तरी फायदा झालेला दिसेल. तो हा कीं सध्यां सिव्हिल सर्वेंटालाच देण्यांत येणारी अशी एखादी असि० कलेक्टर किंवा डि० जजाची जागा रिकामी झाली तर ती बदली ह्मणून देखील एखाद्या प्राव्हिन्शियल सर्विस मधल्या माणसाला देतां येत नाहीं. पण या ठरावानें डेप्युटी कलेक्टराला तीन महिन्यांसाठीं कलेक्टरची किंवा सबजज्जाला जिल्हाजजाची जागा देतां येईल. अकौंटंट जनरलच्या जागेसाठीं तूर्त अंमलांत असलेल्या नियमांतही असाच फेरबदल करण्यांत आला आहे. हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगचे गुण ओळखून त्यांचा उपयोग राज्यकारभाराचे कामीं अधिकाधिक करून घेण्याकडे हिंदुस्थानसरकार व स्टेट सेक्रेटरी या दोघांची जी प्रवृत्ति या ठरावाच्या रूपानें दिसून आली आहे ती सर्वथा प्रशंसनीय असून तिच्याबद्दल हिंदुस्थानचे लोक मोर्ले व लॉर्ड मिंटो या उभयतांचे ऋणी आहेत.

---

## कांग्रेसच्या नेमस्त प्रयत्नाचें एक फळ.

परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांच्या कारकीर्दींतला १८५८ सालचा जाहिरनामा हा कांग्रेसच्या प्रयत्नाचा एक मजबूत आधारस्तंभ आहे. या सनदेच्या आधारावर आजपर्यंत कांग्रेसनें अनेक मागण्या आजपर्यंत केल्या. त्यांपैकींच सरकारी नोकरींतल्या वरिष्ठ प्रतीच्या जागा लायक देशी गृहस्थांना द्याव्या ही एक मागणी आहे. ही मागणी आज उणींपुरीं पंचवीस वर्षें कांग्रेस करीत आहे, पण यंदा तिच्या मागणीला दृश्य फळ आलें. कायदेशीर चळवळीचा हा एक महत्वाचा विजयच ह्मटला पाहिजे. सरकारी नोकरींत दहापांच माणसें वरच्या दर्ज्यापर्यंत चढत जातील येवढाच फायदा यांत समजावयाचा नाहीं. तर तात्विक दृष्ट्या हा फायदा अत्यंत महत्वाचा आहे. प्रांतिक व वरिष्ठ सरकारच्या कार्यकारी कौंसिलांत देशी गृहस्थांचा शिरकाव झाल्या नंतर कलेक्टर किंवा डि० जज्ज यांच्या जागांवर युरोपियन किंवा सिव्हिल सर्विस मधलाच गृहस्थ पाहिजे असें ह्मणण्यांत अर्थ उरला नव्हता. लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांच्या नजरेस ही गोष्ट येऊन त्यांनीं कांग्रेसची पंचवीस वर्षांची मागणी कांहीं मर्यादेपर्यंत कां होईना, पण कबूल केली यांत कांग्रेसचा खास जय

झाला आहे, आणि एकदम स्वराज्या करितां टाहो फोडणारांची सध्या झालेली शोचनीय दुर्दशा आणि धिम्मेपणानें व कायदेशीर रीतीनें नेमस्तपणाच्या मागण्या मागणाऱ्या राजनिष्ठ पक्षाचा अखेर झालेला हा विजय यांचा हा विरोध आंधळ्याला सुद्धां दिसेल इतका स्पष्ट आहे.

---

### ना० गोखल्यांची कामगिरी.

कांग्रेसच्या या मागणीला यश मिळवून देण्यास कोणत्याही एका व्यक्तीचे श्रम कारणीभूत झालेले असतील तर ते ना० गोखले यांचे होत. मि० दादाभाई नौरोजी यांनीं गेल्या पन्नास वर्षांत अश्रांत परिश्रम करून जी देशसेवा केली ती पुढें चालू ठेवण्यास ना. गोखल्याहून अधिक लायक मनुष्य हिंदुस्थानामध्यें नव्हता. देशी गृहस्थांना मोठाल्या जागा देण्याचे संबंधांत ना० गोखले यांनीं लॉर्ड कर्झन साहेबांना कसें पेचांत धरलें होतें, व कौंसिलांत अशा जागांचा तक्ता कौंसिला पुढें मांडतांना लॉर्ड कर्झन साहेबांनीं कशी हातचलाखी केली होती या गोष्टी वर्तमानपत्राच्या वाचकांस श्रुतच आहेत. लॉर्ड कर्झन साहेबांच्या हातचलाखीनें त्यांच्या स्वतः शिवाय दुसरे कोणी फसले नाहींत. कारण अधिकार विभागणी कमिशनाचे अध्यक्ष लॉर्ड हॉबहाउस यांनीं ना० गोखल्यांच्याच मताला दुजोरा दिला, आणि अशा रीतीनें कांग्रेसच्या मागणीचा वाजवीपणा लॉर्ड मोर्ले यांच्या लक्षांत येऊन शेवटीं ना० गोखले यांच्या प्रयत्नास यश आलें हें पाहून कोणाही नेमस्त पक्षीयांस आनंदच वाटेल. ना० गोखल्यांच्या या कामगिरीनें त्यांनीं आजपर्यंत केलेल्या देशसेवेच्या अनेक कृत्यांत चांगली भर टाकली आहे.

---

### रानडे एकॉनमिक इन्स्टिट्यूट.

ता. १९ रोजीं पुण्यास परलोकवासी न्या० माधवराव रानडे यांचें स्मारक ह्मणून उभारलेल्या 'रानडे एकॉनमिक इन्स्टिट्यूट' या संस्थेच्या इमारतीचा प्रवेशसमारंभ मुंबई-इलाख्याचे गव्हर्नर नेक नामदार सर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्तें होणार आहे. न्या० रानडे हे मोठे राजकारणी व मुत्सद्दी पुरुष होते, तसेच ते समाजसुधारक, धर्मसुधारक, आणि विद्वान् व देशहिताची चिंता वाहणारे थोर गृहस्थ होते. पण या सर्वांपेक्षां अर्थशास्त्रनिष्णात ह्मणून त्यांची जी योग्यता होती त्या योग्यतेला आजपर्यंत कोणीही देशी गृहस्थ चढला नाहीं. अशा गृहस्थाचें स्मारक अर्थशास्त्रविषयक संस्थेच्या रूपानेंच होणें इष्ट होतें आणि तसें तें होत आहे हें पाहून प्रत्येक महाराष्ट्रीयास--किंबहुना--प्रत्येक हिंदी गृहस्थास संतोषच वाटेल. अर्थशास्त्राचीं सामान्य तत्वें जरी एक असलीं तरी जमीन, हवापाणी, राजकीय व सामाजिक परिस्थिति आणि परंपरागत आलेल्या रूढी वगैरे बहुविध कारणांनीं प्रत्येक देशाचें निराळें अर्थशास्त्र बनतें ही गोष्ट न्या. रानडे सप्रमाण सिद्ध करीपर्यंत हिंदुस्थानच्या अर्थविषयक स्थितीची खरी मीमांसा कोणालाच करतां येत नव्हती. ती करण्याचा खरा मार्ग न्या० रानडे यांनीं दाखविला. ही एकच सबब त्यांचें नांव चिरायु करण्यास पुरेशी आहे. त्यांचें स्मारक ह्मणून पुण्यास जी संस्था उघडण्यांत येणार आहे तिचा मुख्य विषय अर्थशास्त्र व उद्योगधंद्याविषयींची माहिती हाच राहणार आहे. या विषयासंबंधाची शक्य व प्राप्य तेवढी माहिती या ठिकाणीं एकत्र करण्यांत येणार आहे. अशी एखादी संस्था आपले देशांत असावी अशी खुद्द रावसाहेब रानड्यांची इच्छा होती. पंचवीस वर्षांपूर्वी ते व ना० गणेश व्यंकटेश जोशी यांच्यामध्यें या विषयासंबंधाचा कांहीं पत्रव्यवहार ही झाला होता असें कळतें. ती रावसाहेबांची इच्छा त्यांच्या हयातींत पुरी झाली असती तर त्यांना केवढा संतोष झाला असता! पण त्यांच्या हयातींत जें कार्य झालें नाहीं तें त्यांच्या मागून लवकरच त्यांचे पट्टशिष्य ना० गोखले यांनीं अविश्रांत श्रम करून घडवून आणिलें, आणि आपल्या गुरूची इच्छा तृप्त केली त्याबरोबरच एकंदर देशाला भूषणीभूत व हितावह होणारी संस्था निर्माण केली हें मोठेंच कार्य झालें आहे. या कार्याला हिंदुस्थानचे धनिक लोक उदार हस्तें मदत करतील आणि जिज्ञासु या ठिकाणीं प्राप्य ती माहिती मिळवून कांहीं देशकार्य करून दाखवितील तेव्हांच या संस्थेचा खरा हेतु सिद्धीस गेला असें ह्मणतां येईल. असा सुदिन ईश्वरकृपेनें लवकरच येवो असें आह्मी चिंतितों.

---

### समाधिस्थ.

शेगांवचे सुप्रसिद्ध परमहंस श्रीगणपती महाराज यांनीं आपल्या नश्वर देहाचें गेल्या बुधवारीं विसर्जन केलें आणि जर्जर व जड विकृत देहाच्या पिंजऱ्यांतून त्यांची मुक्तता कर्मानुरोधानें झाली हें कळविण्यास परम आनंद वाटतो. यांचें पूर्ववृत्त खरें कोणास माहित नाहीं. पण अलिकडील १५।२० वर्षांपासून हे महान् योगी आहेत अशी यांची ख्याती आहे. लौकिकी दृष्टीनें यांची वृत्ति तामस पंथांतली व उन्मादाच्या अवस्थेंतली असे. व्यवहारिक मनुष्य यांची गणना वेड्यामध्यें करील. तथापि कांहीं तज्ञ लोक ह्मणतात कीं भगवद्भावाचीं चिन्हें यांच्या अंगीं पूर्ण वसत असत. कांहीं लोक त्यांस नवसास पावणार साधु महाराज ह्मणून पूजीत असत. कांहीं लोक त्यांच्या साक्षात्काराविषयींच्या गोष्टी आनंदानें सांगत असत कांहींही असो, हे आपल्या पूर्व कर्मानें महा भाग्यशाली होते. त्यांनीं शेवटलीं दहा बारा वर्षे अशीं नेलीं कीं त्यांच्या सभोवार हरिभजन, नामस्मरण, व अध्यात्मश्रवण यांची गर्दी उडत असे. व त्या तशा वातावरणांत त्यांचें देहावसान झालें ही ईश्वरी कृपेचीच खूण होय. श्री गणपती महाराजांची मोठी समाधि तयार होणार आहे आणि पाठशाळा, अन्नछत्र इत्यादि गोष्टी उभारण्या सारखी द्रव्याची मदत भाविक लोक करण्याच्या विचारांत आहेत हें कळविण्यास परम आनंद वाटतो. असा सत्कार्याची प्रेरणा करणारी सन्मूर्ती ईश्वरी अंशाचे महाशयच होत! त्यांच्या दर्शनासाठीं गेल्या बुधवारीं व गुरुवारीं सर्व शेगांव शहर माणसांनीं फुलून गेलें होतें.

---

### पुण्यकार्य.

पुण्य कार्य हातीं घ्या ह्मणजे त्याच्या पावन कृपेनें मनुष्य किती देवगुणाला चढेल याचा नेमच रहात नाहीं. हल्लीं आमचे लोकप्रिय डिपुटी कमिशनर राजश्री जठार साहेब यांनीं आकोल्याला पाणी विपुल पुरविण्याचा प्रश्न हातीं घेतला आहे. विचाराचें मंथन होऊन होऊन असा आंकडा निघाला कीं या कार्याला ४ लक्ष ३० हजार रुपये निदान लागतील. राजश्री जठार यांचा संकल्प पक्का झाला आणि त्यांनीं आपल्या प्रयत्नाला लोकांचें पाठबळ किती आहे हें पाहण्या साठीं पहिला दगड टाकून पाहिला. आणि आह्माला कळविण्यास अत्यानंद वाटतो कीं या धर्मकार्यासाठीं आमच्या व्यापारी मंडळींनीं मोठ्या औदार्यानें पुढाकार घेतला आहे. त्यांची स्पर्धा अत्यंत वर्णनीय आहे. आमचे प्रसिद्ध नागरिक राजश्री ओंकारदास सावतराम यांनीं १० हजाराची पहिली श्री काढली; लागलीच त्यांच्या मागून राजश्री टीकमदास तेजमल यांच्या दुकानचा आंकडा ६१०० रुपयांचा आला. रा. रा. मोतीलाल बनसीलाल व लक्ष्मीनारायण रघुनाथदास यांनीं प्रत्येकीं पांच पांच हजार रुपये कबूल केले आहेत. वकील मंडळींतील पहिला मोठा आंकडा ह्मणजे २॥ हजार रुपये रावबहादूर देवराव विनायक यांचा आहे. अशीं उदार वर्गणीचीं उदाहरणें डोळ्या पुढें आलीं ह्मणजे कोणतेंच गोत्र अशक्य वाटणार नाहीं. व्यापारी मंडळी आपला उदार हस्त वर उचलण्यास अशी उत्सुक आहेत तेव्हां राजश्री जठार आपला कृतसंकल्प सिद्धीला लवकरच नेतील आणि आपल्या जन्मभूमीची सेवा हस्तें परहस्तें उत्तम बजावतील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

---

मेजर डी. ओ. मॉरिस डिस्ट्रीक्ट जज हे गेल्या शनिवारीं येथून उमरावतीस गेले. यांच्या बदलीमुळें त्यांच्या सन्मानार्थ गेल्या पोळ्याच्या दिवशीं पानसुपारी झाली आणि त्या दिवशीं हाताखालील सबजज्ज, मुनसफ व इतर हस्तक मंडळी यांचा त्यांनीं प्रेमानें निरोप घेतला व आपण कडक अधिकारी आहों हें लक्ष्यांत आणून त्यांनीं असा अनुभव सांगितला कीं कडक स्वामीची सेवा शेवटीं अधिक श्रेयस्कर होत असते. राजश्री मॉरिस साहेब बहादूर हे वऱ्हाडांतील जुने अधिकारी आहेत आणि त्या समागमामुळें त्यांच्या विषयीं लोकामध्यें विशेष आगत्य व प्रेम आहे. हे बाणीदार अंमलदार असून चांगले कायदे पंडित आहेत. त्यांची महत्वाकांक्षा हायकोर्ट जज्ज होण्याची आहे आणि कालानुरोधानें ती सुयोग घडून येईल. अशी आह्मांस पक्की उमेद आहे. हे अंतःकरणानें दयाळू, कडक शिस्तीचे आणि अर्दी नियमित व नेमस्त आहेत. न्यायाच्या कामांत निःस्पृह व कुशाग्र बुद्धीचे असल्यामुळें कधीं कधीं त्यांची मुद्रा किंचित् क्षुब्ध व आवेशयुक्त दिसत असे. विलायतेस रजेवर असतांना त्यांच्या पत्नी मृत झाल्या आणि त्या वियोगामुळें त्यांच्या मनी स्वभावांतील प्रेमळ मार्दवता व कोमळ सौष्ठव यांचा अंशतः लोप झाला असा कित्येकांचा समज आहे. मेजर मॉरिस साहेब यांस क्रिकेट व गोल्फ या खेळांचा विशेष नाद आहे आणि त्यांनीं या खेळांचे सामने येथें मुद्दाम घडवून आणिले. शनिवारीं स्टेशनावर त्यांस सन्मानानें पोंचविण्यासाठीं पुष्कळ अधिकारी मंडळी मुद्दाम जमली होती व हारतुरे इत्यादि सुवासिक द्रव्यें अर्पण केल्या नंतर मोठ्या प्रेमाच्या मुलाखती झाल्या. वकील मंडळी त्या स्थळीं गैरहजर होती यावरून कांहीं किरकोळ बाबतींत त्यांचा रोष असावा असें ह्मणतात. यांची कारकीर्द उत्तरोत्तर अधिक लोकप्रिय होवो असें आह्मी इच्छितों.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान-- पाऊस मधून मधून चालूच आहे. वारा चांगला जोराचा सुटतो व हवेंत थंडी भासते यावरून चांगली उघाडी मिळेल असा अंदाज आहे. सार्वजनिक आरोग्याची वृद्धि थोडथोडी मंदावली आहे.

प्लेग-- बुलढाणा, उमरावती, व आकोला या जिल्ह्यांत प्लेग पसरत चालला आहे. ३१ आगष्ट अखेरच्या सप्तकांत अनुक्रमें ११६, ८१ व ४९ असे प्लेगाचे मृत्यु झाले. खुद्द आकोल्यास उंदीर पडूं लागले आहेत आणि विरळ विरळ भागांत प्लेग आहे असें वाटतें.

राव बहादूर विनायक मोरेश्वर केळकर डिस्ट्रीक्ट जज, आकोल्या हे या सप्तकांत आपल्या जागीं रुजू झाले आणि त्यांची स्वारी बुलढाण्यास सेशन कामा निमित्त गेली आहे.

येथील स्माल काज कोर्टाचे जज्ज रा० रा० बमनजी बेझनजी मेहता यांस आफि० डिस्ट्रीक्ट जज्ज करून वर्धेस बदलल्या अन्वयें ते गेल्या शुक्रवारीं येथून रवाना झाले. हे गृहस्थ सुस्वभावी कामाला सरळ व मनमिळाऊ असे आहेत आणि त्यांच्या सन्मानार्थ कचेरीच्या संबंधांत असलेल्या सर्व मंडळींनीं त्यांस स्टेशनावर पानसुपारी, हारतुरे, अत्तरगुलाब इत्यादि अर्पण केलीं आणि प्रेमपूर्वक निरोप दिला.

रा. रा. विनायक मोरेश्वर खरे, सबजज्ज, आकोल्या यांस येथील स्माल काज कोर्टाचे न्यायाधीश नेमण्यांत आलें.

आणि त्यांच्या सब जज्जाच्या जागीं रा. रा. मूळचंद तिवारी मुनसफ वर्ग १ ला, दारव्हा यांस आकोल्यास बदलीवर पाठविण्यांत आलें.

रा० रा० प्रीडो साहेब डिस्ट्रिक्ट जज्ज उमरावती हे गेल्या गुरुवारीं विलायतेला रवाना झाले. उमरावतीस वकील व अधिकारी मंडळी यांनीं त्यांच्या सन्मानार्थ टोलेजंग जलसा केला होता.

जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशाहोत, तेंव्हां सुद्धा सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

## सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी ( काळरा ) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वांत्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाट लीस ॥- आणे. सर्व औषधें विकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावांत ही एजं- पाहिजेत; नियम मागवून पहावे.

सांगविण्याचा पत्ता:—

क्षेत्रपाल शर्मा मालक

सुख संचारक कंपनी मथुरा

गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत !!

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्पतगुड्ड नांवाच्यां वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा '' जायफळार्कमधु '' यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड व सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते-रतिकाळीं स्त्रीपुरुषांत फार वेळ टिकणारी कामास्थिति अनुभवास येतो. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजूं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. अंगांतील नासलेली आणि कारणाखेरीज निघून जाणारी धातू पाण्यासारखी तेजस्वी व घट्ट बनून संततीधारणास योग्य अशी होते. शरीरापिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रेडे, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येतें. या औषधास पथ्य नाहीं स्त्रीवर्ज करण्याचें कारण नाहीं. कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १॥८४, तीन बाटल्यांस २॥८१०, दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०-नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो॰ नं. ड ९३ श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,
हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

**सूचनाः**—कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरूं होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं आमचें येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

ॐ

## सत्यमेव जयते.

सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकारितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, काव्रत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायाश्चेत्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार ( मुंजी ) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, जन्नाक्षा, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्णे कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ ( तांबूल ) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधींची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ ( संध्या ) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वास्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यात अंत्येष्टिकर्म ( मृतसंस्कार ), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसाच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजायन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात.' अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधीं ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशीचळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र. व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरात छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

## सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधीत वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधांत विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेदविद्येचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस
पोष्ट हिवरखेड रुपरायाचे ता० आकोट
जि० आकोला प्रांत वऱ्हाड

नो. नं. ड ७९

## मुलास प्रिय झालेलें मासिक पुस्तक

वर्षारंभ आगष्ट १९ **आनंद** वार्षिक वर्गणी ट. ह.सह १ रु.

यांत मौजेच्या गोष्टी, गमतीचे खेळ, मनोहर व सोपी गाणीं, मुलांचे लेख, मुलांनीं विचारलेले प्रश्न व त्यांचीं उत्तरें, उत्कृष्ट चित्रें, विनोदी चुटके अशी गंमतच गंमत दरमहिन्यास येते. या मासिक पुस्तकासंबंधानें पुढील अभिप्राय पहा:—

**न्या. सर नारायणराय गणेश चंदावरकर**—"आनंदाचे अंक वाचून आनंद झाला. विषयांची मांडणी, व भाषा शैली दोन्ही संबंधानें माझें अनुकूल मत झालें आहे. मुलांना फार उपयुक्त होईल. प्रयत्न अल्प पण प्रशंसनीय आहे.'

**ना० डॉ० रा० गो० भांडारकर सी. आय. ई.**—'आमचीं मुलें प्रत्येक अंकाची वाट मोठ्या उत्सुकतेनें पाहत असतात. भाषा लहान मुलांस समजण्या इतकी सोपी असून संभावित प्रकारची आहे. आपलें मासिक मुलांचीच केवळ करमणूक करतें असें नाहीं तर मोठ्यांचीही करतें. यांत बऱ्याच गोष्टी उपदेशपर असून उपदेश उत्तम रीतीनें मनांत ठसेल अशा प्रकारें सांगितल्या असतात."

यंदाच्या वर्गणीदारांस 'वीरांच्या कथा' हें सुंदर पुस्तक भेटादाखल देण्यांत येईल.

पत्ताः-- म्यानेजर 'आनंद'—
शनिवार पेठ पुणें

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचेकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें चाखून हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हे अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंबक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पतीं मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पहिले या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नप्रमेह इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मी वगैरे मुळचे विकार मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, मुड पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जनाट परमा, मुष्ठीमैथुननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनूपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३१ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० ११९ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५१० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें वडस. साहर, फुल, सुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः--कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबळवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें सुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाही प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः--आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून घातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डी सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरूं केला त्यांचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावा आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांतून आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९१२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीटे दिलें, ज्यांच्या औषधानें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यपुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीों गशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

ORIENTAL GOVERNMENT

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

## FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस.

मलू वल्लद पैकाजी लांजेवार हेडमास्तर राहणार पिंपळगांव निपाने तालुका चांदूर जिल्हा उमरावती.

सीताराम वल्लद दिना नांदगाया कुणबी राहणार कामरगांव तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला.

नोटीस देतो अशी कीं माझी लग्नाची बायको नामें येल्लाई इच्याशीं तुह्मी महुतुर लावला आहे त्यास आज सुमारें २–३ वर्षे होत आलीं आहेत. मी आपल्या देशांत ( झाडीत ) राहात होतों व तुझा शोध करीत होतों, आतां तुझा पत्ता लागला आहे ह्मणून तुझ्या गांवीं तुला नेण्याकरितां ५ पांच पंच घेऊन आलों होतों. त्याजवर तुह्मी जबाब दिला कीं तुला आह्मी ओळखत नाहीं, आह्मी तुझी बायको पाठवीत नाहीं, तुला वाटेल तर तूं सरकारांत जाऊन फिर्याद कर.

२ तुह्मी आमच्या जातींचीं मनुष्यें आहात, ज्यांच्या बायकोशीं गंधर्व पहिल्या नवऱ्यानें फारकत दिल्याशिवाय दुसरा नवरा करितां येत नाहीं. तुह्मी सरकारी नोकर आहात; तुह्मास कायदेकानु सर्व माहीत आहेत असें असून तुह्मी आडाणीपणा करिता हें बरोबर नाहीं.

३ आमच्या बायकोच्या अंगावर एक चांदीची सरी वजन तोळे १२, साखळी वजन तोळे १०, चांदीच्या कोपरकड्या वजन तोळे २९ आणि १ तोळ्याची नथ, आणि १ तोळ्याच्या तळपा सोन्याच्या याशिवाय चांदीच्या पाटल्या आणि पलोटे वजन तोळे १९ येणें प्रमाणें ७ सात जिनसा.

४ सदरहू जिनसांसहीत आमची बायको आमच्या घरीं कामरगांव येथें ८ आठ दिवसांत पोंचती करा, तसें न केल्यास तुमच्या वर फिर्याद केली जाईल. तारीख १–८–१० इसवी. सही

सीताराम वल्लद दिना कुणबी नांदगाया कामरगांव यांच्या हातची

नो० नं० द ३७ निशाणी.

## जाहिर नोटीस.

खालीं सही करणार याजकडून नांदुराबु॥ व खुर्द व बुलढाणा जिल्ह्यांतील सर्वांस व इतर ठिकाणचे सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा भाऊ नामें बलदारखा वल्लद आजमखा मुसलमान हा आमचेमधून बरेच दिवसांपासून निराळा आहे. हल्लीं त्याची चालचलणूक बिघडली आहे ह्मणजे तो दुरव्यसनी निघाला आहे. करितां आमची कोणतीही स्थावर इस्टेट त्याजपासून आमचे संमती वांचून कोणी गहाण अगर खरेदी घेऊं नये याउपर त्यास कोणी कर्जाऊ पैसा देऊन त्याजपासून आमची स्थावर इस्टेट कोणी गहाण खरेदी करून घेईल त्याजबद्दल मी जबाबदार नाहीं व तो सर्व व्यवहार रद्द समजला जाईल. कळावें तारीख १।९।१०

सही

बिलनखा वल्लद अजमखा मुसलमान रा० नांदूरा बु॥ दस्तुर खुद

नो. नं० द ३८ सही फारशींत असे.

## नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं शहर इलिचपूर येथील म्यु० कमेटींत ता० २९।८।१० इ. चे स्पेशल जनरल कमिटींत खालीं लिहिलेले नियम मंजूर केले आहेत.

१ कोणत्याही रक्तपितीग्रस्त मनुष्यानें शहर इलिचपूर येथील म्यु० कमेटीचे हद्दींत करितां ज्या विहिरी किंवा तलाव मुकर्रर केले आहेत त्या शिवाय इतर कोणत्याही सार्वजनिक विहिरीवर किंवा ज्या विहिरींचा सार्वजनिक रीतीनें उपयोग करितात त्या विहिरीवर स्नान करूं नये किंवा त्यानें आपले कपडे धुवूं नयेत.

२ कोणत्याही रक्तपितीग्रस्त मनुष्यानें स्नान नदीचे दोन्ही काठावर किसन माळी यांचे वाडीपासून ह्मणजे ज्या ठिकाणीं शहापूरचा रस्ता नदीस मिळतो या ठिकाणापासून सुलतानपुऱ्या जवळील जैसींगपुऱ्याचे मारोतीचे देवळापर्यंत स्नान करूं नये किंवा आपले कपडे धुवूं नयेत.

३ कोणत्याही रक्तपितीग्रस्त मनुष्यानें बिछन नदीचे दोन्ही कडील काठावर संन्यासपेंड पासून गड घाटापर्यंत ह्मणजे ज्या ठिकाणीं चांदूरची सडक नदीला मिळते त्या ठिकाणा पर्यंत याचे दरम्यान स्नान करूं नये किंवा आपले कपडे धुवूं नये.

४ सदर्हू नियम ज्या मनुष्यास पांढरा कोड आहे त्यांस लागू नाहीं.

तरी सदर्हू नियमा विरुद्ध ज्या कोणाची कांहीं तक्रार असेल त्यानें ती आज तारखेपासून एक महिन्याचे आंत आमचेकडेस लेखी करावी. या मुदती नंतर मग कोणाची कोणतेही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें. तारीख ३१ माहे ८ सन १९१० इ०

हरी भास्कर बक्षी

सेक्रेटरी

म्यु० कमेटी शहर इलिचपूर.

नो० नं० द ३९

## नोटीस

रुखमाई मर्द जानू जाधोरकार माळी राहणार मानकी हल्लीं शेगांव ता० खामगांव हिस :–

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मैत जानजी वा॥ तुकाजी हा माझा साक्षात बाप असून त्याची स्थावर जिनगी मौजे मानकी तालुके बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ३२ पैकीं एकर १३ गुंठे १८ आकार रुपये २३ व त्यांत आंब्याचीं झाडें पांच यांचें खातें रुखमाई मर्द जानु माळी व राहतें घर १५ पंधरा खांबी धाब्याचें व समोर कौलाची ओसरी हे मौजे मानकी ता० बाळापूर येथें आहे. तूं त्याची पाटाची बायको असून सदर्हू जिनगीची अफरातफर करण्याचा तुझा विचार दिसतो. तरी या नोटिशीनें तुजला कळविण्यांत येतें कीं माझे बापाचें वेळचें जें कांहीं कर्ज असेल तें कर्ज व तुजला खाण्यापिण्या करितां व वस्त्राप्रावर्णा करितां जो कांहीं खर्च लागेल तो मी देण्यास तयार आहे व सदर्हू जिनगी तुजला कोणास खरीद अगर गहाण देण्याचें कारण नाहीं असें असून तूं गहाण अगर खरेदी कोणास देशील तर तो व्यवहार रद्द आहे. ही नोटीस दिली. ता० ६।९।१० इ. सही

तानी मर्द असराजी माळी राहणार कान्हेरी नि० खु. हातची बांगडी०

नो० नं० द ४०

## नोटीस

रा. मारुती गायकवाड व जयवंती मर्द झाबु राहणार दोवे देवरी तालुके आकोट पोस्ट— मुंडगांव यांस:—

खालीं सही करणार ...

बायको असून तिला तुह्मी दीपवाळीसाठीं माहेरीं माझ्या घरच्या डागडागीन्यांसह नेलें. तिला आणण्यास माझा भाऊ बैराम आला असतां तुह्मी तिला माझ्या घरीं मी माणसांत नसल्याचा खोटा बहाणा करून धाडीत नाहीं. मी घरचा सधन नसल्यानें तुह्मी मला अशा रीतीनें आडवूं पाहता. तुमचा विचार माझा संसार बुडविण्याचा आहे. मजजवळ मी तिला चारचौघांसारखा मारहाण न करितां वागविण्यास खुषी असतां नांदण्यास न ठेवता फारकत मागता. तरी नोटीसीनें कळवितों कीं ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर ८ आठ दिवसांत तिला माझ्या डागदागीन्यांसह व कपड्यालत्त्यांसह आणून पोंचवावें नाहीं तर मी तिचा कोर्टमार्फत ताबा मिळवीन. मी तिला नांदविण्यास राजी असल्यानें फारकत देऊं शकत नाहीं. माझ्या फारकती शिवाय तिचें गंधर्व लावविल्यास मी तुमच्यावर व पाटाचे नवऱ्यावर माझा दुसरा संसार करण्यास लागणारे खर्चासह दावा आणीन, फिर्याद फौजदारींत करीन व सर्व नुकसानी भरून घेईन. सोयऱ्यापायऱ्यांत बदनामी करूं नये ह्मणून म्यां तुह्मास सुचविलें आहे.

डागडागीन्यांचा तपशील:—

सोन्याच्या बाळ्या अजमासें १ तोळ्याच्या.
सोन्याची नथ १ अजमासें ६ माशाची
चांदीचा जोड गुंडाळ्याचा अजमासें तोळे २९.
चांदीचे कडे २ अजमासें तोळे १०
चांदीच्या दंडवाळ्या अजमासें तोळे १९
चांदीचे तोडे अजमासें तोळे ४०

येणें प्रमाणें चीजवस्तासह माझ्या घरीं जयवंती पावती करावी. कळावें. तारीख. ३१–८–१० सही

झाबु वल्लद शिवराम मुंढे राहणार आगतपूर तालुका आकोला

नो. नं. द ४१ नि० खु० आंगठा.

## नोटीस.

नोटीस बेगमी शेखवजीर व शेखमहिबूब वा॥ शेखचांद बागवान रा० शहर आकोला दहिहांडावेस यास:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची सख्खी भावजई असून माझा नवरा मैत होण्यास दोन वर्षे होत आलीं तेव्हां पासून तुह्मी मला काढून दिलें. मी आपले घरीं जाऊन सावकाराचें कर्ज काढून माझें व माझे मुलाचें पोषण करीत आहे, आतां सावकार लोकांनीं तंगी लाविली आहे करून कळवितें कीं सावकाराचें झालेलें कर्ज रुपये २०० दोनशें देऊन मजला नोटीस पावले तारखे पासून आठ दिवसांचे आंत घेऊन जावें तसें न केल्यास वरील रकमे बद्दल व पुढील व्यवस्थे बद्दल तजवीज करण्यांत येईल करितां अगाऊ नोटिसीनें कळविलें आहे कळावें ता० १।९।१० इ.

द॥ लक्ष्मण भिकाजी, पी० रा०, आकोला.

सही

हुरमतबी मर्द शेखफरीद नि० बां०

नो. नं. द ४२ रा. बोरगांवमंजू

## नोटीस

रा० रा० नरसाजी वा॥ सीतारामजी कुणबी पोहोकार रा० वरुड ( कुलटाचें ) ता० दर्यापूर जि० उमरावती यांस:—

खालीं सही करणार हिनकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी तुह्मास कोर्टांत हजर ...

झाला आहे. तुमचे पैसे सदर्हू दाव्यास मुळींच लागले नाहींत आणि ज्या शेती संबंधानें दावा होता ती जमीन माझ्या जवळून तुह्मी बटाईनें केली आहे असें लोकां जवळ सांगण्याचे करितां तरी मी कांहीं जमीन तुह्मांस बटाइनें अगर मालकीनें दिली नाहीं ती माझे घरींच करितेस आहे. आणखी असेंही ऐकीवांत येत आहे कीं माझ्या पश्चात तुह्मी माझ्या नांवचा कागद घेऊन कांहीं लेख लिहून ठेविला आहे. या प्रकारची जनवार्ता ऐकूं येत आहे तरी या नोटीसीनें कळविलें जातें कीं तुमचा आमचा विशेष मुखत्यारपत्राशिवाय इतर कोणत्याच प्रकारचा संबंध नाहीं आणि वर लिहिलेल्या गोष्टी संबंधानें तुह्मी विनाकारण आह्मांस त्रास दिल्यास फौजदारी गुन्हास मात्र पात्र व्हाल. तरी विनाकारण आह्मांस तुह्मी तसदी देऊं नये आणि तुमचे जवळ आमचें बक्षीसपत्र व खरेदीखत हे दोन कागद आहेत ते ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आणून द्यावे. कळावें. तारीख ३१।८।१० इ. दस्तुर गोविंद विठोबा.

सही

अजान मर्द सुर्यभान रा० सावर इची निशाणी खुद असे.

नो० नं० द ४३

## जाहिर नोटीस.

चि० नरसाजी वा॥ सीताराम कुणबी पोहोकार रा० वरुड ( कुलटाचें ) ता० दर्यापूर जि० उमरावती यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझा लेकजांवई आहेस; माझा मालक मांदा असल्यामुळें तुला मी दि० मु० नंबर २०/०९ यांत मजतर्फे कोर्टांत हजर राहण्या करितां विशेष मुखत्यारपत्र दिलें होतें. सदरहू तंट्याचा आमचा आपसांत निकाल झाला आहे. तरी या नोटीसीनें कळविलें जातें कीं, तुह्मास दिलेलें मुखत्यारपत्र रद्द असे; यापुढें सदरहू मुखत्यारपत्रा संबंधानें कोणत्याही प्रकारची तुह्मी खटाखट केल्यास ती बातल असे. कळावें तारीख ३१ माहे आगष्ट सन १९१० इ० द० गोविंद विठोबा.

सही

अजान मर्द सुर्यभानजी काळे कुणबी रा० सावर इचे हातची निशाणी बांगडी असे. द० गोविंद विठोबा.

नो० नं० द ४४

## फळांचा बार विकणें आहे.

खामगांवीं रेल्वे स्टेशनच्या जवळ अर्ध्या मैलावर आमचा "शेळगांवचा बगीचा" ह्मणून प्रसिद्ध बगीचा आहे. त्यांत संत्र्यांचीं ४९०, पेरूचीं १९० [ जांबाचीं ], डाळींबांचीं ८९, लिंबूचीं १००, साखरलिंबांचीं ३०, शीताफळांचीं, ९० बोरींचीं ५० झाडें आहेत. एकंदर ९१५ अंदाजान झाडें आहेत. त्यांच्या फळांचा बार १ वर्ष पुरता विकणें आहे. खामगांव रेल्वेस्टेशनापासून भुसावळला ।. आणे मणी, नागपुरला रु. १ मणी व मुंबईला रु० ११. मणी रेल्वेभाडें पडतें. ज्यांची घ्यावयाची इच्छा असेल त्यांनीं समक्ष अगर पत्रद्वारें खुलासा करून घ्यावा. खामगांव ता. ७।९।१०

सही

# नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं शहर इलिचपूर येथील म्यु० कमेटीनें तारीख ५ माहे आगष्ट सन १९१० इसवीचे स्पेशल जनरल कमेटींत वऱ्हाड म्यु० कायद्याचें कलम ४२ अन्वयें भंगीपट्टीबद्दल खालीं लिहिलेले नियम मंजूर केले आहेत.

| क्लास | घरांचें वर्णन. | पायखाना असलेल्या घरास. | | | पायखाना नसलेल्या घरास. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु० | आ. | पै. | रु० | आ. | पै. |
| १ | ज्या घरांचे वार्षीक भाड्याचें उत्पन्न ३ रुपयांचे वर नाहीं त्यास सालीना. .... .... .... | १ | ० | ० | ० | ० | ० |
| २ | ज्या घराचें वार्षीक भाड्याचें उत्पन्न ३ रुपयांचे वर आहे परंतु ६ रुपयांचे वर नाहीं त्यांस सालीना.... | २ | ० | ० | ० | ८ | ० |
| ३ | ज्या घराचें वार्षीक भाड्याचें उत्पन्न ६ रुपयांचे वर आहे परंतु ९ रुपयांचे वर नाहीं त्यांस सालीना. .... | ३ | ० | ० | १ | ० | ० |
| ४ | ज्या घराचें वार्षीक भाड्याचें उत्पन्न ९ रुपयांचे वर आहे परंतु १५ रुपयांचे वर नाहीं त्यांस सालीना.... | ५ | ० | ० | २ | ० | ० |
| ५ | ज्या घराचें वार्षीक भाड्याचें उत्पन्न १५ रुपयांचे वर आहे परंतु २४ रुपयांचे वर नाहीं त्यांस सालीना. .... .... .... .... .... | ७ | ० | ० | ३ | ० | ० |
| ६ | ज्या घराचें वार्षीक भाड्याचें उत्पन्न २४ रुपयांचे वर आहे त्यांस सालीना. .... .... .... | १० | ० | ० | ४ | ० | ० |

मात्र ज्या घराचा पायखाना घरमालकाचे नोकरीवर असलेल्या भंग्याकडून (कायमचा नोकर) साफ केला जाईल त्या घराबद्दल हा कर घेतला जाणार नाहीं. मात्र मैला नेण्याचे गाडीबद्दल घरमालकास दरसाल रुपये २ दिले पाहिजेत.

ज्या घराला सांडपाण्याची मोरी आहे ती मोरी साफ करण्याबद्दल खालीं लिहिल्याप्रमाणें कर द्यावा लागेल.

| घराचे मोरीबद्दल वर्णन. | सालीना कर | | |
|---|---|---|---|
| लां. रुं. खो. | | | |
| ज्या घराची मोरी २ × २ × २ फूट आहे त्या घरास दर सालीना. .... | १ | ० | ० |
| ज्या घराची मोरी २ × २ × ३ फूट आहे त्यापेक्षां जास्त नाहीं त्या घराबद्दल दर सालीना. | २ | ० | ० |
| ज्या घराची मोरी २ × २ × ३ फूटांपेक्षां जास्त आहे त्यांस दरसाल... | ३ | ० | ० |

सदरहू नियमाविरुद्ध ज्या कोणाची तक्रार असेल त्यानें आज तारखेपासून एक महिन्याचे आंत आमचेकडेस लेखी करावी. या मुदतीपुढें कोणाची कोणतेही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें, तारीख ३१ माहे आगष्ट सन १९१० इ.

H. B. Bakshi.
सेक्रेटरी.

नो. नं. ८ ४६ म्यु० कमेटी शहर एलिचपूर.

## BUILDING RULES FRAMED BY THE ELLICHPUR CIVIL STATION MUNICIPALITY.

Draft revised set of Rules regarding the erection and re—erection of buildings within Municipal Limits passed by the Ellichpur Civil Station Municipal Committee, in The Special Meeting held on 26th August 10, under Section 85 and 116 Sub-Section 1 Clause J of the Berar Municipal Law of 1886, in Supercession of the previous Rules made by the Committee regarding the same and published in Residency Orders Notification No. 187 dated 20th. April 1899:—

1. Every person who intends to erect or re-erect any building within the limits of the Ellichpur Civil Station Municipality shall give notice of his intention to the Municipal Committee, in the form appended to these Rules.

EXPLANATION:—The expression "erect any building" includes all additions and alterations which involve new foundations or increased superstructure on existing foundations, or the conversion into more than one dwelling house of a building originally constructed as one dwelling house only.

2. Every person who intends to erect or re-erect any building within Municipal Limits, shall with such notice furnish a rough sketch showing:—

(a). The area to be occupied by the building and out building to be erected or re-erected on the land.

(b). The levels at which the foundations and the lowest floor or plinth are proposed to be laid with reference to the level of the adjacent roads and streets.

(c). The space to be left about the building or out building to be erected or re-erected.

(d). The lowest floor of all buildings intended for habitation must be at least $1\frac{1}{2}$ feet above the ground level.

(e). The position of drains, privies or cesspools existing or to be constructed.

(f). The nature of house and materials to be used.

The above sketch must be to scale of not less than 20 feet to an inch in the case of houses costing more than Rs, 500/-, in other cases, the sketch may be rough one.

3. No steps or projections shall be built over the road side drains without special permission in writing, of the Municipal Committee.

4. Every privy to be built or rebuilt shall be erected on a site and model approved by the Municipal Committee.

5. All waste water drains or sewage drains attached to the house shall be so constructed as to be easy of access and inspection by Municipal Committee and no drain shall be covered except with the permission of the Committee.

6. No person shall within the limits specified by the Municipality from time to time construct the roof or outer walls of his buildings of grass or other inflamable material.

7. Every person wishing to erect or re-erect a building in any street shall provide proper troughs and pipes for receivng and carrying the water from the roof or other parts thereof and discharging the same so as not to inconvenience to persons passing along the street, or to damage the streets or the road side drains.

8. No privy seat nor the foundations thereof nor any drain or cesspool intended for carrying off sewage water shall be constructed of mud or brick in mud.

EXCEPTION— The Municipal Committee may in their discretion exempt poor people from the operation of the above Rules.

9. Every privy shall be shut by a sufficient roof and wall or fence from the view of persons passing by or dwelling in the neighbourhood and shall be provided with a door when the privy opens on any street or drain.

### PROCEDURE FOR SANCTIONING BUILDINGS.

10. Notices received under Rule 1 shall be registered in Secretary's office in a Register to be kept for the purpose.

11. On receipt of the notice and papers complete and in proper form the Secretary shall inspect the site and report within 7 days on the Sanitary arrangements proposed and the durability of the structure to be erected. The paPers shall then be sent to the Ward Member who shall return them with his opinion within 7 days from the date of receiPt thereof.

12. On receipt from the Ward Member the Secretary shall place the papers before the next meeting of the Managing Committee who may either sanction the proposed building outright or subject to such alterations and qualifications of the plans and specifications as they may think fit ( or may report the case to the General Committee as one in which sanction should be refused under Section 85 of the Berar Municipal Law ) provided that before passing orders the Managing Committee may inspect the site, or depute one or more of its members to inspect and report on the site and buildings as proposed.

13. When the Managing Committee shall have finally approved of the building, the Secretary shall issue a permit to build in writing. Such permit shall be accompanied by the plan as sanctioned and shall show any alterations or qualifications of the original plans ordered by the Managing Committee. In cases of emergency the Vice-Chairman may issue the permit on the recommendation of the Ward Member, but his order will be subject to the approval and confirmation of the Managing Committee.

14. On the disposal of the case the Secretary shall file a copy of the sanctioned plans and instructions in his Office for future reference.

15. The Secretary or such other officer as the Managing Committee may appoint shall inspect the building while in progress and if he finds that the sanctioned plan and instructions have not been followed put, the matter for disposal before the Managing Committee at once.

16. In case of all buildings temporary or otherwise proposed to be erected or re-erected which in his opinion are of so unsubstantial a nature as not to require the application of the aforesaid Rules or the estimated cost of which is less than Rs. 500/— the Secretary or the Ward Member as the case may be put the case before the Managing Committee and the latter may in its discretion wholly or partially exempt the building from the operation of the aforesaid Rules.

17. Every person who has obtained permission to build shall commence work within at least a year from the date of issue of permission to build and on the expiry of a year from the date of permission on building shall be permitted unless and until the permission shall be renewed.

18. A person who has obtained permission to build shall on being required by a Municipal Officer, his permit and sanctioned plan and instructions for inspection.

### FORMS AND PLANS.

19. The form of notice under Rule 1 will be supplied from the Office of the Secretary free of charge on demand.

20. The plan required under Rule 2 will if so desired be prepared in the Committee's Office at the cost of the person intending to erect or re-erect any building and at such rate as may be determined by the Committee from time to time.

21. Any person who infringes the above Rules shall on conviction by a Magistrate be punished with fine which may extend to Rs. 50/—.

### THE FORM OF NOTICE.

To
The Secretary,
Ellichpur Civil Station,
Municipality,

Sir, Dated Ellichpur Month. 19 .

In accordance with the Rules made under Section 85 (1) of the Berar Municipal Law of 1886, I beg to give you notice that I intend to erect or re-erect a building No. in Ward lane. The necessary particulars as required by the Building Rules are furnished herewith:—

PARTICULARS.

____________________ Signature.

____________________ Address.

G. N. Sahasrabudhe
Vice—chairman
Ellichpur Civil Station
N. No. Dh. 47 Municipality.

# वऱ्हाडसमाचार

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख १९ माहे सप्टेंबर १९१० इ० [ अंक ३९



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं ७३ } G. A. Phillips. एजंट


## NOTICE.

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2831-42, dated the 8th December 1899, is published for general information.

Sd/ B. P. Standen,
Chief Secretary to the Chief Commissioner,
Central Provinces.

Nagpur:
The 1st. Septembar 1910.

## RESOLUTION.

The Secretary of State for India has brought to the notice of the Government of India that it not infreqently happens that natives of India, students or others who have proceeded to England, desire to obtain passports to enable them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore entitled to a passport. Appeals for assistance are also frequently addressed to his Lordship by destitute Indians who desire to return to their counrry and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2. In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governer General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India, with an authoritative certificate of identity, in the form appended to this Resolution, signed by the head of the district ( in a Presidency Town, the Commissioner of Police ) in the case of residents of British India and by the Political Officer in that of residents of Native States. For a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the District Officer ( in a Presidency Town, the Commissioner of Police ) or Political Officer, as the case may be:—

### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY,

1. Name of applicant..........................................
2. Father's name and caste..............................
3. Residence......................................................
4. Age of applicant...........................................
5. Nationality of applicant * ...............................................
6. Social and pecuniary status of father ( or guardian )........................
7. Date of probable departure of applicant from India..............................
8. Object of applicant's visit to England ( Europe )...................................

Signature of District Officer ( in a Presidency Town, the Commissioner of Police ), or Political Officer, or head of school or college.

Date ________________

* i. e. whether a British subject by birth or by naturalization ( or a subject of a native state ).

No. n, dh. 56

## नोटीस.

विठोबा वल्लद बाळाजी सपकाळ जिरेमाळी राहणार टाकळी तालुके मलकापूर यांसः—

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी घरचे जाणते असे एकटेच असून तुमच्या घरची नादारी आहे. तुह्मी मोलमजुरी करून पोट भरतात. तुह्मास घरदार नाहीं व बाल्याच तुह्मी शहाणेही नाहीं. चारचौघांच्या नादानें मला मात्र फुचकळ्यांत टाकलें आहे. धड वागवीत नाहीं किंवा खाण्यापिण्यासही पुरवीत नाहीं. मला टाकून घालण्यास अजमासें ६।७ वर्षे झालीं. फारकती मागतां देत नाहीं. मला आतां माझ्या माहेरीं बाप चारल्या मुळें राहतां येत नाहीं. माहेरीं कोणी माझा प्रतिपाळ करण्यास नसल्यानें इज्जतीनें दिवस कंठणें कठीण झालें आहे. सबब ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर १५ दिवसांनीं तुह्मी माझ्या खावटीचे पैसे दरसाल रु० ६० प्रमाणें देऊन टाकून मला नांदविण्यास येथें यावें किंवा फारकती लिहून द्यावी. असें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा माझ्यावर नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. तुह्मी मजशीं संसार करण्यास राजी असल्याम व तुमच्या जवळ शेतीवाडी कांहीं नाहीं ह्मणून कोणत्याही गांवीं आपण राहिल्यास हरकत नसावी समजून कळवीतें कीं तुह्मी आपल्या अज्ञान भावासह याच गांवीं राहण्यास यावें. हें तुह्मांस पटत नसल्यास तुमच्या मनांतून इज्जतीनें संसार करणें नाहीं व माझा काळ व्यर्थ घालविणें आहे असें मानणें भाग आहे. मागें पुढें तुमची तक्रार राहूं नये सबब ही नोटीस दिली आहे. ता. ९-९-१९१० इ.

सही
गुंजी मर्द विठोबा सपकाळ
जिरमाळी रा० पहुरजिरे ता०
खामगांव नि० बु० आंगठा

नो. नं. ढ ९१

## नोटीस

मी खालीं सही करणार जात मारवाडी रा० मौजे मौजे सेंदल प्र० व ता० मेहेकर जि० बुलढाणें यांजकडून शिवनारायण जगन्नाथ मारवाडी रा० मौजे जाणेफळ ता० मेहेकर जि० बुलढाणें यांसः

या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, मी तुह्मांस कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन तें मेहेकरचे सब रजिष्टरचे कचेरींत तारीख २७-८-१० इ० रोजीं नोंदून दिलें आहे, परंतु तुह्मी माझें इच्छेप्रमाणें काम करीत नाहीं, करितां मी तुह्मास दिलेलें कुलमुखत्यारपत्र आज पासून रद्द केलें आहे. आतां या पुढें माझे तर्फे तुह्मांस कुलमुखत्यारपत्रानें काम करण्यास अधिकार मुळींच राहिला नाहीं. केल्यास मी बांधला जाणार नाहीं. करितां अगाऊ तुह्मांस या नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. ता० १३-९-१० इ.

सही ( मारवाडींत )
केसरमल नारायण द० खु०

नो० नं० ढ ९४

## जाहिरनामा

मी खालीं सही करणार मारवाडी रा. मौजे सेंदल प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें यांजकडून तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, मी ता० २७-८-१० इ. रोजीं सिवनारायण जगन्नाथ मारवाडी रा० मौजे जाणेफळ ता० मेहकर जि० बुलडाणें यांस कुलमुखत्यारपत्र करून देऊन मेहकरचे सबरजिष्टरचे कचेरींत नोंदून दिलें आहे, तें कुलमुखत्यारपत्र मी आजपासून रद्द केलें आहे. आतां या पुढें सदहू शिवनारायण याच्याशीं कोणीच कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये, केल्यास मी बांधला जाणार नाहीं. करितां अगाउ कळविलें आहे. कळावें ता. १३-९-१० इ.

सही मारवाडींत
केसरमल नारायण द० खु०

नो. नं. ढ ९९

## नोटीस

हुरमतबी मर्द शेखफरीद मुसलमान राहणार बोरगांवमंजू इसः—

ता० १२।९।१० चे वऱ्हाडसमाचार पत्रांतून तूं आह्मांस नोटीस दिली परं आह्मी कोणत्याही प्रकारें तुझे अन्नवस्त्राबद्दल जबाबदर नाहीं. तुझे नवऱ्यापाश त्याची कांहीं एक जिनगी नव्हती त्याची कोणतीही जिनगी आह्मी घेतली नाहीं. तुझी नोटीस खोटी आहे कळावे ता. १७।९।१०

सह्या
शेखमहेबूब वा। शेखचांद द. खु.
शेखवजीर वा। शेखचांद नि. खु. रेघ.

नो० नं० ढ ९७

# वर्तमानसार.

बादशहांच्या राज्यारोहणसंबंधाची तयारी चालू आहे. एक मोठे अधिकारी असें ह्मणतात कीं, हा समारंभ अगदीं अपूर्व होईल. सर्व राजे व मांडलीक ह्या समारंभांत सामील होतील. वसाहतींतील मुख्य प्रधान व इतर प्रधान यांस निमंत्रण करण्यांत येईल. जगांतल्या सर्व भागांतील सैन्य ह्या समारंभास येतील. राज्यारोहण समारंभ होण्याच्या पूर्वीं किंवा त्यानंतर लागलीच बादशाही परिषद भरण्यांत येईल.

✓ युगांतर पत्रावरील खटल्याचा ता. १२ रोजीं निकाल लागला. मि. स्विनहो यांनीं आरोपी महेन्द्रनाथ चतरजी यांस त्यांना 'युगांतर' हें राजद्रोही पत्र छापल्याबद्दल दोषी ठरवून चार महिने सक्त मजुरीची शिक्षा सांगितली. पत्रकर्त्यादरील खटला अजून चालू आहे.

विषारी विड्याच्या पानांसंबंधानें तपास करण्याकरितां एक खास कमिटी स्थापण्यांत आली होती. त्याचा रिपोर्ट ले. गव्हर्नर साहेबांकडे पाठविण्यात आला आहे. तो अजून प्रसिद्ध झाला नाहीं तथापि विड्याच्या पानांत विष नाहीं; जे मृत इ ल ते या विषामुळें नव्हत असें सिद्ध झाल्याचें कळतें. मांजर वगैरे प्राण्यांवर प्रयोग करून पाहण्यांत आले, पण विषाचे चिन्हही सांपडलें नाहीं. विड्याच्या पानांत विष नसून ते हिरव्या सुपाऱ्यांत आहे असें दिसून येतें.

बंगाल नागपूर रेल्वेच्या नेटिव्ह लोको स्टाफमध्यें संप झाला होता तो मोडला. संपवाल्यांच्या तक्रारीचा विचार करून अधिकाऱ्यांनीं त्यांची अलावन्स संबंधाची मागणी मान्य केली. संपवाले कामावर पुनः रुजू झाले असून, कामांत विक्षेप येण्याची भीति आतां राहिलेली नाहीं.

गया येथील वकील बाबु ठाकूर प्रसाद यांजवर, त्यांनीं गया येथील सेशन्स जज्जांसमोर एका मुकत्यारावर चाललेल्या खटल्यांत बनावट कागद पुराव्यांत हजर केला या आरोपावरून खटला चालला आहे. सदरील मुकत्याराची जबानी ह्मणून वकिलांनीं सदर कागद पुराव्यांत सादर केला होता. जज्जांनीं मुकत्यारास दोषमुक्त करून सदरील कागद बनावट ठरविला व वकिलावर खटला चालवावा असें फर्माविलें.

संयुक्त प्रांतांतील प्रदर्शनाचे वेळीं कॅ. विंढम, मि. रो व कॅ० मेटलँड हे विमानें उडविणार आहेत. बक्षिस देण्यास पुरेशी रक्कम जमल्यास नाताळचे दिवसांत वाटेल त्या शोकी वैमानिकास विमानें उडविण्याची मोकळीक दिली जाईल. कोठेंही न थांबतां जो प्रथम आपलें विमान अलाहाबादहून मिरझापुर येथें घेऊन जाईल त्यास देण्याकरितां मिरझापुरच्या एका रहिवाशानें बक्षीस ठेवलें आहे.

सर ऑर्थर लाले यांचे जागीं सर लॉरेन्स जेंकिन्स हे मद्रासचे गव्हर्नर होणार अशी बातमी पसरली आहे पण सरकारी रीतीनें अजून तसें प्रसिद्ध झालेलें नाहीं.

वायव्येकडील प्रांतांत बरसात संपल्याचें लक्षण ह्मणजे हिमालयाच्या उत्तर भागांत सपाटून बर्फ पडणें होय. याप्रमाणें तिकडे बर्फ पडलें आहे व हिंदीमहासागराकडून येणारा वायुप्रवाहही मंद येत आहे.

✓ वायव्य सरहद्दीवरील सरकारनें पुढील पुस्तकें नवीन प्रेस अॅक्टान्वयें बंद केलीं आहेत. मेसर्स ए. डब्लु. शहा आणि सी. एन. देसाई यांनीं केलेलीं 'हिंदी राष्ट्रीय गीतें, 'मुक्तिकोन पाठे' 'अनल प्रभा' वरधान भा. १ आणि २ 'गोलोक' आणि मुक्तिमंत्र. हीं सर्व पुस्तकें बंगाली भाषेंत लिहिलीं आहेत.

हिंदुस्थानचे नवीन व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज ऑफ पेनहर्स्ट, त्यांच्या पत्नी, मिलिटरी सेक्रेटरी मेजर मॅक्सवेल व एडी कांग मंडळी 'पर्शिया' बोटीनें मार्सेलीं येथून ता. ४ रोजीं हिंदुस्थानास येण्या करितां निघणार आहे.

तेहरानहून आलेल्या रूटरच्या तारेवरून असें समजतें कीं, पोलिस खात्याची पुनर्घटना करण्याचे कामीं सल्लामसलत देण्याकरितां इटालियन आणि फ्रेंच लोक नेमण्यांत यावे व न्याय खात्याच्या बाबतींत एक फ्रेंच गृहस्थ व इजिप्शन मुसलमान यांची योजना व्हावी असा इराणच्या मजलिसनें ठराव केला आहे. बलाढ्य राष्ट्रांतील लोकांना नेमण्या संबंधाच्या ठरावावर रशियांतील इंग्लिश लोकांचे आक्षेप येतील ह्या समजुतीमुळें तो ठराव कायम करण्यांत आला नाहीं.

जम्मू आणि काश्मीर यांच्या दरम्यानच्या रस्त्यावरून एक टांगा पन्नास फूट उंचावरून खालीं आदळला, पण तो झाडांत अडकून राहिल्यामुळें नदींत पडला नाहीं. सुदैवानें टांग्यातील माणसें आधींच उडी मारून खालीं आल्यामुळें बचावलीं.

रंगून कॅन्टोन्मेन्टमधील तलावांत ३, ६०० काडतुसें सांपडलीं आहेत. त्यासंबंधीं कुम्ब्स आणि कंपनीचें असें ह्मणणें आहे कीं, दारूगोळा ठेवलेल्या पेट्यांस मुंग्यांनीं कांहीं नुकसान पोचविलें. या आपल्या गैरसावधपणाबद्दल ठपका येऊं नये ह्मणून त्या पेट्या ज्यांच्या ताब्यांत होत्या त्यांनीं काडतुसें तलावांत फेंकून दिलीं.

---

## भक्तिवात्सल्य नाटक.

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

### अंक दुसरा.

प्रवेश १ ला. स्थल अरण्यांतील दरी.

( पात्रें. मृडानी दरींत कोंडली आहे. )

मृडानी.— पद

निज वेष जरी पालटला ॥ काषायांबर विभुती त्याला ॥
परि मन-अनुगामी झाला ॥ शडरींच्या स्वैर बलाला ॥
आवरी ना परि जो रतला ॥ चित्ताच्या मलिन-पणाला ॥
क्षाली ना तो नट नटला ॥ १ ॥

असले बकासारखे संन्यासी ह्मणजे हरणें पकडण्या करितां मंजूळ स्वरानें गान करणारे पारधी, किंवा सावजें पकडण्या करितां गाईचें चर्म पांघरून कळपांत शिरलेले लांडगे. त्यांच्या पारमार्थिक दिसणाऱ्या सर्व कृत्या लाल इंगळाला अवरण करणारी मृदु व स्वच्छ रक्षा. वाऱ्याची झुळूक लागतांच राख उडून निखाऱ्याचें प्रज्वलित स्वरूप प्रगट होतें. तद्वत स्वार्थाचा माग लागतांच टिला टोपीवर शिळा पडून, ढोंगी बुवांचें घातुक अंतःकरण राक्षसी रूप धरतें. व त्यांत अनेक भोळ्या लोकांचे बळी पडतात. अरेरे ! त्या रात्रीची आठवण झाली ह्मणजे भीतीनें आंगावर शहारे येतात ! काय त्याची कृतिती ! !

पद

भजनीं जे लागले ॥ सुमनें ॥
गुरु मानुनि पदिं रतले ॥ धृ० ॥
घेठ तयांचा अधमपणानें ॥
खाटिकसम विरण्याला धजसें ॥
गुरु पातक करितां तुजला हें ॥
नरा भय ना वाटलें ॥ कां ॥ १ ॥

चांडाळा गुरे ! माझ्या भाविक वृद्ध सासूसासऱ्यांनीं तुला घरांत ठेवून सत्पुरुष ह्मणून आनंन्द भावानें तुझी सेवा केली. त्याची फेड त्यांच्या खुनांनीं करून त्यांच्या लेकी सुनांचा नि द्रव्याचा अभिलाष धरलास काय ! दुष्टा, तुझे पोटातील पाप त्या वृद्ध सात्विकांना दिसले नाहींत. तुझें आध्यात्मिक विद्येचें निरूपण ह्मणजे भाविकांनां जाळ्यांत पकडण्या करितां लाविलेलें आमिष. जटा, त्रिपुंड्र, रुद्राक्ष, दंड हीं खरें राक्षसी रूप झाकण्याचीं साधनें आहेत; हें त्यांना कसें कळणार ! कारण जो संन्यासमार्ग परलोकाचा सोपान तोच आता चोर, खुनी वगैरे नीच लोकांचा नीच हेतु पार पाडण्याचा राजमार्ग व्हावा काय ! बा कली, धन्य आहे तुझी ! ! !

पद

अकुलीन मलिन जन लीन कुकर्मीं असती ॥
बहु कुटिल कपटि ते तुजला प्रियतम गमती ॥
जे दांभिक चर भाविक त्या साह्या करिशी ॥
धिःक्कार तुला कलि मधु सोडुनि गर घेशी ॥ १ ॥

वेळ आली ह्मणजे सर्व गोष्टी घडून येतात. तिकडे बादशहाच्या हुकमा प्रमाणें मोहिमेवर जाणें झालें. नि घरीं असा आकांत उडाला ! त्या मेल्या मांगानें पशुतुल्य काम करून नीच वासनेनें नलिनीला आणि मला अरण्यांत आणून निरनिराळ्या दरींत कोंडून ठेविलें आहे; याची मोहिमेवरून घरीं आल्यावर कल्पना तरी येईल काय ! किंवा मातापित्या प्रमाणें आमचाहि खून झाला असेल, असाच तिकडच्या समज होऊन हताश व उदास होणे होईल! कांहीं होवो तिकडे. या दरींतून बाहेर निघण्याचा मार्ग पाहिला पाहिजे. ह्मणजे नलिनीचीही सुटका करून घरीं परत जातां येईल. अहाड पोर! या घाल्यानें गांगरून गेली असेल.

(जाते)

प्रवेश १ ला समाप्त.

पुढें चालू.

---

श्रीमती ऍनी बेझंटबाई यांचे व्याख्यानाचे आधारें

(लेखक चिंतामण हरी मराठे सिताबर्डी नागपूर)

## हिंदुस्थानची जागृति

आत्मोन्नति झाल्याखेरीज कायमाची अशी ऐहीक उन्नति होत नाहीं, या बद्दल कोणाचा मतभेद असेल असें वाटत नाहीं. सर्व काळीं व सर्व देशांत अनेक धर्म, अनेक पंथ, व अनेक धार्मिक व नैतिक संस्था स्थापन होत आल्या आहेत व नवीन निघत आहेत यांचें तरी कारण हेंच होय. आत्मोन्नति झाली पाहिजे याबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, ब्रह्मसमाज किंवा अनादी कालापासून चालत आलेले, अद्वैत, द्वैत व विशिष्टाद्वैत पंथ घेतले तरी ते सर्व आत्मोन्नतीचेंच महत्व प्रतिपादन करीत आहेत.

आपल्या पूर्वज महर्षींनीं, जेव्हां इतर राष्ट्रें अज्ञान अंधःकारांत लोळत पडलीं होतीं, तेव्हां हीच गोष्ट प्रतिपादन केली आहे. आत्म्यापासून सर्व सृष्टि उत्पन्न झाली आहे. सर्व भूतमात्रांत एकच आत्मा व्यापक भरला आहे. आत्मव्यतिरिक्त जीवांचें आस्तित्व शक्य नाहीं. 'एक मेवा द्वितीयंब्रह्म' इत्यादि श्रुतिवाक्यें देखील हाच एकात्मत्वाचा सिद्धांतदर्शक आहेत.

'योगोनष्टः परंतप' श्रीकृष्ण भगवान यांनीं अर्जुनास नष्ट झालेल्या ज्ञानयोगाची जशी स्मृति करून दिली त्याप्रमाणें आपल्या हल्लींच्या निकृष्टावस्थेचें खरें कारण काय आहे याची स्मृति झाल्याशिवाय आपला पूर्व वैभव सविता उदय पावणार नाहीं. आमच्या ऐहिक नष्ट चर्येचें कारण आमच्या आत्मभ्रष्टतेमध्येंच आहे. आपण कोण याची विस्मृति झाली ह्मणजे आपलें कर्तव्य काय हेंहि विसरतें व अशा रीतीनें स्वकर्मभ्रष्टतेचे पाठी मागून सर्व ऐहिक दुःखें प्रगट होतात. ज्या परंपरेनें आह्मी पदभ्रष्ट झालों ती परंपरा चांगली लक्षांत आणून पूर्वपद प्राप्तीची खटपट झाली पाहिजे. आरशा शिवाय स्वमुख दिसत नाहीं, त्याप्रमाणें दुसऱ्याची स्थिति पाहून आपली स्थिति लक्षांत येते

प्रथम टोळधाडी प्रमाणें आमचे आर्यावर्तावर मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या केल्या तेव्हां आह्मी थोडेसें जागृत झालों होतों. निदान आमच्या पदभ्रष्टतेचें निदान सांगणारे वैद्यराज —— ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव तुकाराम, रामदास इत्यादि —— थोर विभूति अवतरल्या होत्या व त्यांचेच उपदेशाचीं सुफलें — शिवछत्रपती, पहिले बाजीराव, माधवराव मल्हारराव होळकर, महादजी शिंदे वगैरे झटली पाहिजेत. ही लाट अथवा हा अमृतफळांचा बार येऊन गेल्यानंतर फिरून कालगतीची रुक्षता प्राप्त झाली. यानंतर कधींही न पाहिलेले, न ऐकिलेले श्वेतवर्णाचे लोक आकाशांतून नाहीं परंतु पाताळांतून निर्माण झाले व त्यांनीं आपल्या प्रखर अशा तेजानें आमचे डोळे अगदीं दिपऊन टाकले ! आह्मी त्याजबरोबर आपली तुलना करूं लागलों तेव्हां आमचें भयंकर स्वरूप आमचे दृष्टीस पडूं लागलें.

पुढें चालू

वऱ्हाडसमाचार.

भाद्रपद शुद्ध १९ शके १८३२ दुर्मतीनामसंवत्सरे

## आशिया खंडाची जागृति.

—:+※+:—

सेंट निहालसिंग नांवाच्या एका तरुण पण विचारी आणि खंबीर लेखकानें चीन, जपान, इराण, अफगाणिस्तान वगैरे आशिया खंडांतल्या ठळक ठळक देशांत प्रवास करून तें प्रत्यक्ष पाहिलेल्या स्थितीवरून असें अनुमान काढलें आहे कीं आशिया खंडांत आतां सर्वत्र जागृति होऊं लागली आहे. महानिद्रेंतून आशिया डोळे चोळीत उठत आहे. आतां तो युरोप व अमेरिका खंडांतल्या सुधारलेल्या राष्ट्रांच्या मागें राहणें संभवनीय नाहीं. हें त्यांचें अनुमान अजमावून पाहण्यासाठीं त्यांनीं प्रत्येक देशाविषयीं दिलेली गमतीची माहिती येथें देणें अवश्य आहे.

**चीन**— हिंदुस्थानचेच लोक नेभळे झाले आहेत असें नाहीं. चीनचेही लोक तसेच आहेत. एक युरोपियन कान्स्टेबल पंचवीस चिनी बदमाषांना सहज ताब्यांत ठेवतो. शांघाय येथें म्युनिसिपल बगीचांत कोणाही चिनी माणसाला येण्याची परवानगी नाहीं, आल्यास लाथ बसते. चिनी लोक मूळचेच परक्यांचा द्वेष करणारे आहेत. तशांत युरोपियन लोक त्यांच्याशीं अतिशय वाईटपणानें वागल्यामुळें चिनी लोकांत त्यांच्याविषयींचा द्वेष पूर्णपणें बाणला आहे. तथापि हे दिवस तुटक राहण्याचे नाहींत. आपल्या मतलबाकरितां परक्या देशांत जाऊन विद्या, कला शिकलें पाहिजे, व युरोपियन मुत्सद्द्यांच्या डावपेंचाविषयीं सावध राहिलें पाहिजे असें चिनी मुत्सद्द्यांना वाटूं लागलें आहे. ह्मणून आतां दरसाल हजारों चिनी विद्यार्थी जपान, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी वगैरे राष्ट्रांत शिकण्यासाठीं जात असतात. जपाननें प्रथम चीन विषयीं कांहीं सहानुभूति दाखविली, पण चीन व जपान यांच्यांत कायमचें वैर असल्यामुळें आतां [illegible] तरी खुसपट काढून चिनी विद्यार्थ्यांना बंदी करण्याची तजवीज चालली आहे. प्रथम फी वाढवून पाहिली, तरी चिनी विद्यार्थी येत; मग ते आळशी आहेत, दुराचरणी आहेत असा त्यांच्या नांवचा बोभाटा करून ठेविला. तरी अद्याप कांहीं चिनी विद्यार्थी तिकडे जातातच. बरेचसे अमेरिकेंत जातात. अमेरिकेंत कोणत्याही बुद्धीनें कां होईना, पण मनाचा उदारपणा दाखविला आहे. चीनकडून अमेरिकेचें घेणें होतें, त्याची रकम तुह्मी चिनी विद्यार्थ्यांना अमेरिकेंत पाठविण्याचे कामीं खर्च करा असें अमेरिकेनें सांगितलें आहे. यामुळें अमेरिकेच्या या औदार्यावर अनेक चिनी विद्यार्थी विद्येचा लाभ करून घेत आहेत. हे विद्यार्थी शिकून परत आले ह्मणजे चीनचा एक लष्करीपणा, आणि जुन्याविषयींचा दुरभिमान घालविण्यास फार उपयोगीं पडतात. याचा परिणाम तेथील राज्यव्यवस्थेवर मुद्रा होऊं लागला आहे. पेकीन शहराची इतकी सुधारणा झाली आहे कीं ती पाहून आश्चर्य वाटतें. जुनें कोंदट, घाणेरडें शहर बॉक्सर बंडाचे वेळीं जळालें. नवें बांधलें तें अगदीं नव्या तऱ्हेवर. टेलिग्राफ, टेलिफोन, वगैरेचीं कंत्राटें पूर्वीं युरोपियन कंपन्यांना दिलीं होतीं. आतां चिनी कंपन्यांकडे तीं आहेत. गांवोगांव शाळा झाल्या आहेत. विद्याखातें पूर्वीं नव्हतें तें निघालें आहे. इकडच्या सारखीं राजकुमार कॉलेजें आहेत, वर्तमानपत्रें आहेत. तीं सोप्या सामान्य लोकांना समजणाऱ्या भाषेंत असून चीन चिनी लोकांकरितां आहे या तत्वाचें अध्यापन तीं करीत असतात. हीं पत्रें व्यवहाराच्या तत्वावर नव्हे तर देशाभिमानाच्या तत्वावर चाललीं आहेत. स्त्रियांची गुलामगिरींतून मुक्तता, मर्यादित राजसत्ताक राज्यपद्धतीची अवश्यकता, व अफूचें व्यसन बंद करण्याची जरूरी हे बहुधा वर्तमानपत्राचे विषय आहेत. पूर्वीं चिनांत अतिशय रानटी व क्रूरपणाच्या शिक्षा देत असत. त्या बंद होऊन सुधारलेली न्यायपद्धति अमलांत आली आहे. ज्यूरीची पद्धत चालू आहे. कायद्याच्या अध्यापनाच्या शाळा आहेत. गुलामगिरी बंद झाली आहे. अफूचें व्यसन सुटत चाललें आहे. व्यापाराकडे ही चिनी लोकांचें लक्ष लागलें आहे. बिनधुराची बंदुकीची दारू करण्याचे कारखाने चालू आहेत. कागद, सीमेंट, वगैरेचे कारखाने आहेत. जहाजें बांधण्याच्या गोद्या आहेत. अद्याप नाण्याच्या ऐवजी सरकारानें नोटा काढण्याची पद्धति सुरू झाली नाहीं. पण खाजगी व्यांकांनीं काढलेल्या नोटा आहेत. खजिन्यांत पैसे नाहींत ह्मणून लष्करी शिक्षण भाग पडलें आहे. तथापि चिनी मुत्सद्दी मुद्दाम जर्मनींत जाऊन तेथें सक्तीचें लष्करी शिक्षण कसें देतात तें पाहून आले आहेत. ती पद्धत चिनांत लवकरच सुरु होईल. तूर्त पैशाची मोठी अडचण आहे.

**जपान**— या देशाविषयीं अलीकडे पांचचार वर्षांत बरीच माहिती प्रसिद्ध झाली असल्यानें ती येथें देत नाहीं. पण येथें एक मोठा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. तो हा कीं ज्या प्रमाणें चीन, हिंदुस्थान, ब्रह्मदेश वगैरे देशांत गोरे लोक प्रथम व्यापाराच्या निमित्तानें गेले तसेच ते जपानांत ही गेले असतां जपाननें तेवढें आपलें स्वातंत्र्य कायम ठेविलें, आणि चीनसुद्धां बाकीच्यांनीं कशाप्रशस्त प्रमाणानें घालविलें हें कसें ? हें एक मोठें गूढ आहे, आणि याचें उत्तर जपानी मुत्सद्द्यांनासुद्धां देता येत नाहीं. पण आमच्या मतें तें असें आहे कीं जपान आरंभापासूनच सावध राहिलें. त्यांनीं शिकण्यापुरता परकीयांचा उपयोग करून घेतला. त्यांचा हात राज्यकारभारांत किंवा व्यापारांत अधिक शिरकूं दिला नाहीं. जपानची सुधारणा फार घाईनें झाली असल्यामुळें वरचा—लोकनायकांचा—थर तेवढा सुधारला आहे. सुधारणा खालच्या थरापर्यंत अद्याप जाऊन पोहोंचली नाहीं. दुसरी गोष्ट उद्योगधंद्याच्या कामांत जपाननें अमेरिकेचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवल्यानें अमेरिकेंतले दुष्टसारखे दोषही जपानांत घुसूं पाहत आहेत व कारखान्यांच्या वाटा बरोबर स्त्रिया व मुलें यांचे हाल वाढत आहेत. जपानी शिक्षणांत एक मोठी गोम ही आहे कीं त्यांत धर्मशिक्षणाला जागा ठेविलेली नाहीं. तसें करण्याचा मूळ उद्देश हा आहे कीं धर्मशिक्षणानें मुलें दुराग्रही व जुन्याला चिटकून राहणारीं होतात. तें जपानला नको आहे. ह्मणून त्यांनीं धर्मशिक्षणाला अजीबात फाटा दिला आहे. याचा अनिष्ट परिणाम शंपन्नास वर्षांनीं दिसून येईल असें कित्येक ह्मणतात, तथापि प्रत्यक्ष धर्मशिक्षणाचें सार बादशहानें आपल्या आज्ञेंत आणिल्यामुळें व ही आज्ञापत्रिका प्रत्येक जपानी विद्यार्थ्यानें नेहमीं लक्षांत वागविण्याविषयीं सक्ति असल्यानें धर्मशिक्षणाचा मुळींच अभाव आहे असें वाटण्यास खरोखर कांहीं कारण नाहीं.

वस्तुतः चीन व जपान हे शेजारी शेजारी किंबहुना एकाच वर्णाचे असल्यामुळें बंधुबंधु असतां त्यांच्या मध्यें बंधुप्रेम दिसण्याचे ऐवजीं भाऊबंदकी मात्र दिसते ! जपानचें चिनशीं कसें अन्यायाचें व अरेरावीचें वर्तन घडत असतें याचीं उदाहरणें ह्मणजे तात्सुमारू व मुकडेन रेलवे हीं होत. मनाई केलेल्या मालानें भरलेलें जपानी जहाज चीननें अटकावून ठेवलें. त्यावरून आमचा अपमान झाला ह्मणून ओरड करून जपाननें चीनलाच उलट दंड देण्यास लाविलें ! अशा अनेक प्रसंगीं जपानचें अन्यायाचें वर्तन पाहून चिनी लोकांनीं जपानी लोकांना वठणीवर आणण्यासाठीं जपानी मालावर हा बहिष्कार घातला. हा बहिष्कार खाजगी लोकांनीं घातला, त्याला सरकारी स्वरूप दिलें नाहीं. इतकेंच नाहीं तर त्याला 'बहिष्कार' असें नांव न देतां 'राष्ट्रीय अपमान' असें अधिक जोरदार व लोकांच्या मनावर अधिक परिणाम करणारें नांव देऊन शांततेनें कोणावरही जुलुम न करतां तो चालविला. जपानी व्यापारी मुद्दाम चीनमध्यें गल्ल्यांतून कुरापत काढण्या करितां हिंडत, पण चिनी लोकांनीं कुरापतीला यत्किंचितही जागा दिली नाहीं. त्यामुळें जपानी राष्ट्राला कांहीं करतां येईना. एखाद्या व्यापारी कंपनीनें जपानी माल विकला कीं तिच्या नांवच्या नोटिसा निघावयाच्या, व तिच्याशीं मग कोणी व्यवहार करावयाचा नाहीं. अशा शांततेच्या रीतीचा हा बहिष्कार होता. इकडच्या आमच्या बहिष्कारवाद्यांनीं या बाबतींत चीनचें अनुकरण केलें असतें तर आज त्यांच्यावर आलेलें संकट टळलें असतें. चीनच्या बहिष्काराचा जपानी व्यापाऱ्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यांनीं समेट करण्यासाठीं चिनी व्यापाऱ्यांना आदरानें बोलाविलें व त्यांना मेजवानी दिली. चिनी व्यापाऱ्यांनींही जपानी लोकांना उलट मेजवानी देऊन सभ्यपणाचें वर्तन ठेविलें. पण बहिष्कार काढून घेतला नाहीं. या गोष्टी पासून आमच्या लोकांना पुष्कळ शिकतां येईल.

**अफगाणिस्तान**— येथील लोक कडवे व जुन्याचे कट्टे अभिमानी, पण तोही जुन्याच्या अभिमानाचा किल्ला सुधारणेच्या लाटेनें ढासळत चालला आहे. अफगाण लोकांना शिक्षण द्यावें अशी तेथील अमीराची उत्कट इच्छा आहे. अमिराच्या राजवाड्यांत विजेच्या प्रकाशाचा प्रवेश झाला आहे. अमीर दूरच्या अधिकाऱ्याशीं तारायंत्रानें व टेलिफोननें बोलत असतो. टाइपरायटरचा खट खट आवाज चालू आहेच. माणसाची तसबीर काढणें हें अफगाण लोक भयंकर अधमकृत्य समजतात; पण अमीर हे स्वतः उत्तम फोटोग्राफर आहेत. ते मोटार मधून हिंडतात; चिरूट पितात, व युरोपियन सारखी त्यांची राहणी असते. 'यथा राजा, तथा प्रजा' या न्यायानें त्यांचें अनुकरण सरदार व प्रजाजन करूं लागले आहेत. अमीरानें आपल्या राज्यांत सडका केल्या आहेत, व दर दोन मैलांवर टेलिफोनचें स्टेशन करण्याचें काम सुरू आहे. टपाल खातें नाहीं, तरी हलकारे धाववून त्यांच्या कडून पत्रें पोंचविण्याची रीत आहे. अफगाणिस्थानांत आजपर्यंत बादशहाची जशी मर्जी तसा न्याय असे. कायद्यांचीं पुस्तकें नव्हतीं. पण सध्याच्या अमीरानें न्यायाची पद्धत सर्वत्र सारखी ठेवण्याचा यत्न चालविला आहे, व क्रूरपणाच्या शिक्षा करणें भान न पडतां जीव व मालमत्ता सुरक्षित राहावी अशी तजबीज चालली आहे. कापड, साबण, बूट, मेणबत्त्या वगैरेचे कारखाने काबुलांत निघाले आहेत. हे कारखाने इंग्रज चालवितात, पण त्यांनीं अफगाण लोकांना त्याची माहिती करून द्यावी असें केलें आहे. नवीन पद्धतीवर शिक्षण देण्यासाठीं शाळा स्थापिल्या आहेत. अद्याप खुद्द अफगाणिस्थानांत वर्तमानपत्र निघालें नाहीं. पण इकडचीं वर्तमानपत्रें तिकडे जातात. अमिराला साचित्र वर्तमानपत्रें व मासिकें वाचण्याचा नाद आहे. सारांश, सुधारणेचें व जागृतीचें कार्य तेथेंही सुरू झालें. बीज पेरलें गेलें आहे. अंकुर फुटला आहे, योग्य काळानें त्याचा वृक्ष ही झालेला दृष्टीस पडेल.

**इराण**—या देशांत १९०६ सालापर्यंत अनियंत्रित राजसत्ता होती. त्या सालीं शहानें लोकमताचा प्रभाव ओळखून व्यवस्थित राज्यव्यवस्था करण्यास आपली पसंती दिली, आणि आक्टोबर १९०६ सालीं पहिलें पार्लमेंट बसलें. तो शहा लागलीच मेल्यावर १९०७ मध्यें महमदअली शहा झाला. यानें बाह्यतः पार्लमेंटविषयीं प्रेम दाखवावें पण अंतःकरणांत झळफळावें. पण असें किती दिवस चालणार ? लवकरच मजलिस (इराणांतलें पार्लमेंटचें नांव) व शहाचें वाकडें येऊन महमदअलीला पदभ्रष्ट व्हावें लागलें. पुढें त्याचा बारा वर्षांचा मुलगा अहमदमिर्झा गादीवर आला. मजलिसनें राज्यसुधारणेच्या अनेक गोष्टी केल्या; नवें कर्ज काढण्याचें बंद केलें; उत्पन्न वाढविलें; शहाचा खानगी खर्च कमी केला; सर्व प्रजेला समान हक्क दिले; प्रांतिक कौंसिलें स्थापन केलीं; विशेष आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं धर्माधिकारी ह्मणजे बहुधा जुन्यामताला चिटकून राहणारे व दुराग्रही असावयाचे, पण इराणांत झालेल्या या राज्यक्रांतींत पुढाकार घेणारे धर्माधिकारीच होते ! राज्यक्रांतीच्या मुळाशीं दुसरें एक कारण होतें. तेथील वर्तमानपत्रांनीं गुप्त रीतीनें राज्यक्रांतीला अनुकूल

असे लेख लिहून लोकांचीं मनें तयार करून ठेविलीं होतीं. हीं वर्तमानपत्रें स्वार्थाच्या दृष्टीनें नव्हे, तर देशाभिमानाच्या तत्वावर चालविलीं असत. या लेखांचा लोकांच्या मनावर पूर्ण संस्कार होऊन राज्यक्रांति लवकर घडून आली पुढें लेखन-स्वातंत्र्य मिळाल्यावर पाश्चात्य सुधारणेच्या निरनिराळ्या अंगांवर उघडपणें लेख येऊं लागले. एकदां राष्ट्रांत जागृति होऊं लागली कीं ती सर्व दिशांनीं होऊं लागते. पुरुषांत झाल्यावर बायका कशा स्वस्थ बसणार? त्यांनाही जनानखान्याच्या बाहेर चाललेल्या कारभारांत मन घालण्याची बुद्धि झाली, आणि असें सांगतात कीं जेव्हां प्रजासत्ता स्थापन करण्या करितां इराणच्या पुरुषांना लढाईवर जावें लागे तेव्हां बायकांनीं आपल्या हातांनीं पुरुषांच्या अंगावर कपडे घालावे, व आपण स्वतः जवळ राहून लढण्यास त्यांना उत्तेजन द्यावें. पुढें प्रजासत्ता स्थापन न झाल्यावर बायकांनीं आपल्या अंगावरचे दागिने मोडून त्याचे पैसे ब्यांकेंत ठेवीच्या रूपानें ठेविले व ब्यांकेचें काम सुरू केलें. असे देशाभिमानी पुरुष व स्त्रिया यांची संख्या अर्थात् फार अल्प आहे. बाकीचे लोक अज्ञानांत, चैनींत, व व्यसनांत निमग्न आहे. पण पुढऱ्यांत जागृति झाली आहे येवढें दाखविण्यास येवढा इतिहास पुरेसा आहे. आतां इराणला भय आहे तें स्वतःच्या राजापासून नाहीं तर गोऱ्या शेजाऱ्यापासून आहे. इतके दिवस इंग्लंड व रशिया हे इराण-साठीं परस्परांशीं स्पर्धा करीत होते तोंपर्यंत इराणला भय नव्हतें; पण आतां त्यांनीं आपसांत तोडजोड करून शहाला शह लावण्यासाठीं उत्तरभाग व दक्षिणभाग असे वांटून घेतले आहेत. शिवाय जर्मनीचाही डोळा आहेच. इराणचा खजीना रिकामा असल्यामुळें कर्ज मागण्याला कोणा तरी युरोपियन राष्ट्राकडे जाणें भाग आहे. जावें तर कर्जा पायीं ईजिप्तची कशी दुर्दशा झाली त्याचें उदाहरण डोळयासमोर आहे. अशा अडचणींत इराण सांपडलें आहे. सारांश, इराणांतल्या लोकांचीं मनें अस्वस्थ आहेत. ही अस्वस्थता त्यांना सुखाकडे नेणारी आहे यांत मात्र शंका नाहीं.

**ईजिप्त**— हा देश सध्यां ज्वालामुखी सारखा आहे. तेथें इंग्लिश लोकांचें सध्यां वर्चस्व आहे त्या विरुद्ध लोकांचीं मनें क्षुब्ध करणारा निहिलिस्ट लोकासारखा एक राष्ट्रीय नामधारी पक्ष निर्माण झाला आहे. इंग्रजांना सक्तीनें ईजिप्तमधून घालवून दिलें पाहिजे असें हा पक्ष लोकांत सांगत आहे. इंग्रजाशीं मिळून मिसळून वागणारा मनुष्य या पक्षाच्या डोळ्यांत सलत राहतो, व ते त्याचा केव्हां घात करतील याचा नेम नाहीं. या पक्षानें आपल्या शाळा काढल्या आहेत. बाह्यतः या शाळेच्या शिक्षणांत आक्षेप घेण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. पण गुप्त मंडळ्या, व राजद्रोहाचा प्रसार वगैरे कामें या शाळांतून रात्रींचीं चालतात असा बोभाट आहे. या शिवाय राष्ट्रीय पक्षानें फंड उभारून त्या फंडांतून पगारी उपदेशक ठेविले आहेत. या राष्ट्रीय पक्षाचा मुख्य नायक मुस्ताफा कामेल पातशहा हा १९०८ सालीं मरण पावला. त्यानें २७ दिसेंबर १९०७ रोजीं ईजिप्त मधल्या असंतुष्ट लोकांची कांग्रेस भरवून स्वराज्याचे हक्क प्रथम मागितले. पुढें तो मेला, पण त्यानें शिकविलेलीं तत्वें त्याच्याबरोबर मेलीं नाहींत. दुसरी कांग्रेस जिनीव्हा येथें भरली. या सभेस आयर्लंड व ब्रिटन मधून कित्येक सोशियालिस्ट गेले होते. या सभेंतल्या भाषणांचा सगळा विषय इंग्रजी राज्याचा निषेध व स्वराज्याची मागणी हा होता. नंतर लवकरच केरो येथें एक सभा भरली. या सभेनें इंग्रजांनीं आतांच्या आतां इजिप्तमधून चालतें व्हावें अशी मागणी तेथील प्रधानाकडे केली होती! राष्ट्रीय पक्षाचे इंग्रजासंबंधानें मुख्य मुख्य आरोप आहेत ते हे कीं इंग्रज ईजिप्तच्या लोकांना अज्ञानांत ठेवूं पाहतात; त्यांच्या आरोग्याची काळजी घेत नाहींत; काळा व गोरा यांच्यांत खरा न्याय मिळत नाहीं; ते ईजिप्तचा द्रव्यौघ पश्चिमेकडे नेतात, व ईजिप्तच्या लोकांना गुलाम करून त्यांनीं ठेविले आहे. या सगळ्या रोगावर स्वराज्य हें रामबाण औषध राष्ट्रीय पक्षानें शोधून काढलें आहे. इंग्रज लोकांनीं कांहीं हित केलें नाहीं, सगळा सत्यानाश केला आहे असें भासविणाऱ्या या पक्षाचें दमन करून लोकांना बहकण्या पासून बंद ठेवण्यासाठीं सरकारचेही प्रयत्न अर्थात् जोरानें सुरू आहेत. संशयित लोकांपासून चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन मागावयाचा, व त्यांनीं तो दिला नाहीं ह्मणजे हद्दपार करावयाचें असे उपाय सरकारला करावे लागले आहेत. पुरुषांचें उदाहरण पाहून ईजिपशियन बायकाही पुरुषांपासून जबरदस्तीनें आपली स्वतंत्रता परत मिळवूं लागल्या आहेत. पुरुषांच्या बरोबरीनें आपणांस हक्क असावे असें ह्मणणाऱ्या स्त्रीवर्गांत अग्रस्थान प्रिन्सेस आयेषा यांनीं घेतलें आहे. दुसऱ्या एका सरदाराच्या बायकोनें प्रथम स्त्रियांच्या हक्काबद्दल निनांवी लेख लिहून मग उघडपणें सभेंत भाषण केलें, तिनें घालून दिलेल्या या उदाहरणाचें अनुकरण इतर स्त्रियाही करूं लागल्या आहेत.

एशियाखंडांत कोठें कशी जागृति झाली आहे व तिचे परिणाम काय होतील हा सध्याच्या काळीं मोठा महत्वाचा प्रश्न असल्यामुळें या प्रश्नाचा पूर्वार्ध या लांबलेल्या लेखांत एकदम दिला आहे. हा नीट वाचून लक्षांत आणिला ह्मणजे उत्तरार्ध समजण्यास सोपें जाईल.

## हिंदुस्थानचें राष्ट्रत्व.

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनीं नुकतेंच फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांस उद्देशून केलेलें भाषण फार मनन करण्यासारखें आहे यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांतून विलायतेकडे वळणारा द्रव्यौघ हिंदुस्थानाला कितपत फायदेशीर आहे हा वादग्रस्त मुद्दा बाजूला ठेविला, तर त्यांचें समग्र भाषण अत्यंत सहानुभूतिपर होतें असें ह्मणतां येईल. हिंदुस्थानच्या लोकांना स्वतःचें राज्य चालवितां येण्याचें सामर्थ्य येईल तो दिवस ब्रिटिश राज्याच्या इतिहासांतला सोन्याचा दिवस आह्मी मानूं अशी जी आशा ५० वर्षांपूर्वीं लॉर्ड मेकॉले यांनीं प्रदर्शित केली होती, तिचा ध्वनि आज पुष्कळ वर्षांनीं ना० सर जॉर्ज क्लार्क यांच्या तोंडून पुनः निघाला. हिंदुस्थान हें राष्ट्र नाहीं असें ह्मणून कांग्रेसच्या मागच्या 'राष्ट्रीय' या विशेषणाची नुसती टर उडविणाऱ्या सिव्हिलियनांनीं नामदार साहेबांचें भाषण अवश्य वाचावें. हिंदुस्थान हें आज एक्या अर्थानें राष्ट्र आहे व एका अर्थानें नाहीं. निरनिराळ्या प्रांतांतल्या सर्व जातींच्या लोकांच्या गरजा, अपेक्षा, व हिताहित या गोष्टी एकच आहेत, ध्येय एकच आहे, व तें साधण्याचे मार्ग ही एकच आहेत या अर्थानें ते सर्व लोक मिळून एक राष्ट्र होतें; पण त्यांच्यांत भाषा निराळ्या, धर्म निराळे, जाती पुष्कळ वगैरे फूट पाडण्यास निमित्त होणारीं पुष्कळ कारणें विद्यमान आहेत. हीं आहेत तों पर्यंत सर्वांचे प्रयत्न एकदिलानें चालणें शक्य नाहीं, या दृष्टीनें हिंदुस्थान राष्ट्र नाहीं. हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनीं कांग्रेसला राष्ट्रीय नांव दिलें तें पहिल्या अर्थानें, व आंग्लो-इंडियन अधिकारी दुसऱ्या दृष्टीनें तिच्याकडे पाहत असतात. ना० सर जॉर्ज क्लार्क यांनीं दोन्ही दृष्टींनीं या प्रश्नाकडे पाहिलें आहे; आणि ह्मणूनच सध्याच्या स्थितींत फूट पाडण्याचीं कारणें नाहींशीं करण्याचा उपदेश त्यांनीं विद्यार्थ्यांस केला. त्यांच्या भाषणांतला दुसरा मुद्दा ह्मणजे सद्यःस्थिति नीट डोळे उघडून पाहण्या विषयींचा होता. आपण स्वर्गप्राप्तीकरितां इच्छा करीत असतां आपले पाय जमिनीवर पाहिजेत. हाच दृष्टांत राजकारणाकडे लाविला तर असें ह्मटलें पाहिजे कीं असाध्य उच्चतम काल्पनिक ध्येय डोळ्यांपुढें ठेवून सद्यःस्थितीला विसरणें ही राजकारणी निर्विकल्प समाधि व्यवहारांत वागणाऱ्या माणसाच्या उपयोगाची नाहीं. ती लावूं पाहणारांनीं हिमालयाची वाट धरावी. सद्यःस्थितीचा विसर पडल्यामुळेंच अनेक तरुणांचीं मनें बहकलीं, आणि त्यांना व त्यांचीं मनें बहकाविणाऱ्या गुरूंना ताळ्यावर आणण्यासाठीं सरकारला कडक उपाय योजावे लागून त्याच्या पायीं हिंदुस्थानच्या एकंदर लोकांना त्रास भोगावा लागत आहे. या सद्यःस्थितीचें ज्ञान वाचन, मनन, आणि विवेक या त्रयींनें होणार आहे. तेव्हां तिकडे विद्यार्थ्यांनीं आपल्या अंगच्या उत्साहाचा ओघ प्रथम वळविला पाहिजे हा नामदार-साहेबांचा कळकळीचा उपदेश तरुणांच्या मनावर ठसून त्यांच्या विचारांत, भाषणांत व आचरणांत त्याचें प्रतिबिंब दिसून यावें अशी आमची इच्छा आहे.

## न्या० रानडे यांची योग्यता.

ना० सर जॉर्ज क्लार्क यांनीं ता. १५ रोजीं रानडे एकॉनामिक इन्स्टिट्यूट उघडतांना केलेलें भाषण हें वरील भाषणाच्या उत्तरार्धाच्याच स्वरूपाचें होतें. विद्यार्थ्यांनीं आपल्या देशाच्या सद्यःस्थितीचा विचार सर्व दृष्टींनीं करावा. त्यांनीं राजकारणांत पडूं नये याचा अर्थ राजकीय विषयावरचे ग्रंथसुद्धां वाचूं नयेत असा नाहीं. त्यांनीं ते अवश्य वाचावे; अर्थशास्त्रविषयक प्रश्नांची माहिती करून घ्यावी; सामाजिक, धार्मिक, सांपत्तिक, सर्व बाजूंनीं सद्यःस्थिति पहावी असें सांगितलें, पण ही माहिती मिळविण्यास साधनें कोठें आहेत असा प्रश्न पुढें येईल. त्याचें उत्तर ह्मणून रानडे यांचें स्मारक करणारांनीं एकॉनमिक व टेक्निकल इन्स्टिट्यूट उभारलें आहे असें अप्रत्यक्ष रीतीनें नामदारसाहेबांनीं सुचविलें. ना० सर जॉर्ज क्लार्क यांचा न्या० रानड्यांशीं प्रत्यक्ष परिचय नव्हता, तरी गव्हर्नर साहेबांनीं रानड्यांची खरी योग्यता जाणली यांत शंका नाहीं. रानडे हे खरे देशाभिमानी थोर पुरुष होते; त्यांची दृष्टी सगळ्यांच्या पुढें होती; हिंदुस्थानचें खरें हित कशांत आहे याची बिनचूक कल्पना त्यांना होती; ते पूर्ण आशावादी होते; बुद्धि त्यांची मर्मभेदी होती; त्यांच्या कर्तव्यांची मर्यादा विस्तृत होती, त्यांचीं मतें उगीच घाईनें बनविलेलीं नसून विचाराच्या भक्कम पायावर बसविलेलीं होतीं; ब्रिटिश अमला खालीं राहूनच हिंदुस्थानचें हित व्हावयाचें हा ईश्वरी संकल्प त्यांनीं जाणला होता; ते हिंदुस्थानांतले [illegible] थोर, दूरदर्शी आणि देशाभिमानी पुरुष होते अशा तऱ्हेचे ना० गव्हर्नरसाहेबांनीं त्यांच्याविषयीं जे उद्गार काढले ते अर्थात् त्यांची थोरवी जाणूनच काढले. असेच उद्गार डेक्कन कॉलेजचे माजी प्रिन्सिपाल मि० सेल्बी यांनींही काढलेले पाहून ना० गव्हर्नर साहेबांनीं जातां जातां असें ह्मटलें कीं जोंपर्यंत प्राच्य आणि पाश्चात्य मनें अशा रीतीनें परस्परांस पूर्णपणें ओळखून वागतील तोंपर्यंत त्या दोन दिशांतलें अंतर नष्ट झाल्यासारखेंच राहील. ना० साहेबांच्या या लहानशा वाक्यांत फार अर्थ भरला आहे. हिंदुस्थानचे पुढारी व राज्यकर्ते यांना जर या लहानशा वाक्याच्या अर्थाचें पूर्ण आकलन करतां आलें तर हिंदुस्थानच्या एका बिकट प्रश्नाचा तावडतोब निकाल लागल्या सारखें होईल. पण तसें आकलन मोठाल्या अधिकाऱ्यांच्या हातूनसुद्धां होत नाहीं; उलट ना० मि० जेन्किन्स सारख्या कौन्सिलराच्या तोंडून हिंदी पुढाऱ्यांना चिडविण्या सारखे उद्गार प्रत्यक्ष कौन्सिलांत निघतात, आणि बाकीचे युरोपियन कौन्सिलर त्यांचा निषेध न करतां स्वस्थ बसतात अशी प्रत्यक्ष स्थिती आहे. सगळें बिघडतें तें येथेंच.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—— उत्तरा नक्षत्राचा पर्जन्य फार जोराचा व हत्तीच्या वेगाचा होत आहे. या पावसानें पीकांवरील कीड वगैरे सर्व नाहींशी झाली. आतां उघाडा मिळेल तर पिकांचें आरोग्य व वाढ हीं वर्णनीय होतील. [illegible]चा रोग देखील हल्लींच्या हवामानानें [illegible] होईल असा तर्क आहे.

रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी साहेब कमिशनर यांची स्वारी आकोल्यास आली आहे. आणि त्यामुळें सर्व जिल्ह्यांतील मंडळी आनंदानें त्यांच्या भेटीचा योग जोडीत आहे. सार्वजनीक शाळा, कचेऱ्या वगैरेंची तपासणी चालू आहे. साहेब बहादूरांस कायमची कमिशनरी पुढें लवकर मिळावी असा सर्वांचा मनोदय आहे.

उमरावती जिल्ह्यांतील रावसाहेब आनंदराव तुकाराम देशमुख, जरूड, रा. रा. मार्तंड तुकाराम काळे; कऱ्हाळाक बिहारीलाल व रघुनाथ लहानाजी यांस दिलेले बेंच माजिस्ट्रेटीचे अधिकार परत काढून घेण्यांत आले. ही पिच्छेहाट कां?

## जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीं निराशा होत, तेंव्हां सुद्धा सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षी पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्रांच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, शीतलाप, पटकी ( फाळरा ) शूळ, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाट लीस ‐॥‐ आणे. सर्व औषधें विकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावात ही एजं‐ पाहिजेत; नियम मागवून पहावे.

मांगविण्याचा पत्ता:—

**क्षेत्रपाल शर्मा मालक**

**सुख संचारक कंपनी मथुरा**

**गुण न आल्यास पैसे परत !**

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्पतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा ‘‘ जायफळार्कमधु ’’ यंत्र साहाय्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड व सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते—रतिकाळीं स्त्रीपुरुषांत फार वेळ टिकणारी कामास्थिति अनुभवास येतो. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजूं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पाहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. अंगांतील नासलेली आणि कारणाखेरीज निघून जाणारी धातू पाऱ्यासारखी तेजस्वी व घट्ट बनून संततीधारणास योग्य अशी होते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रहे, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येतें. या औषधास पथ्य नाहीं स्त्रीवर्ज करण्याचें कारण नाहीं. कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १॥१४, तीन बाटल्यांस २॥१०, दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०-नें पाठवूं.

पत्ता:—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो॰ नं. ड ९३ श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

**सूचना:**—कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरूं होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं आमचें येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर काढूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

ॐ

## सत्यमेव जयते.

सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकरितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, कार्व्रत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायश्चित्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार ( मुंजी ) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, जन्नाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सवर्णे कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा सांडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वैदोक्तमंत्र, पुरुषसूक्त, ब्रह्मयज्ञ ( संध्या ) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वस्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म ( मृतसंस्कार ), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत ज्योतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व सभाजायन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधीं ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादींचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशीचळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र. व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें घरांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत’ अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरात छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

## सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधीत वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधांत विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेदविद्येचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रूपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७२ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

## विलक्षण नयन सुखकुठार.

विलक्षण नयन सुखकुठार – ह्या अप्रातिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें; अग्नितापानें, उपदंशादीकारानें, अतिवाचनानें, कडलीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रातिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदरहू औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणें करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ७६ अंण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्यावर,

जी. एन. वारपुरे. पोष्ट- आलिबाग.

मुंबई.

## फळांचा बार विकणें आहे.

खामगांवीं रेल्वे स्टेशनच्या जवळ अर्ध्या मैलावर आमचा ‘‘ शेळगांवचा बगीचा ’’ ह्मणून प्रसिद्ध बगीचा आहे. त्यांत संत्र्यांचीं ४९०, पेरुंचीं १.५० [ जांबाचीं ], डाळींबांची ८५, लिंबूचीं १००, साखरलिंबांचीं ३०, शीताफळांचीं, ५० बोरींचीं ५० झाडें आहेत. एकंदर ९१५ अंदाजान झाडें आहेत. त्यांच्या फळांचा बार १ वर्षा पुरता विकणें आहे. खामगांव रेल्वेस्टेशनापासून भुसावळला ।. आणे मणी, नागपुरला रु. १ मणी व मुंबईला रु० १। मणी रेल्वेभाडें पडतें. ज्यांची घ्यावयाची इच्छा असेल त्यांनीं समक्ष अगर पत्रद्वारें खुलासा करून घ्यावा. खामगांव ता. ७।९।१० सही

टोडरमल पुरणमल झुणझुणवाला.

नो० नं० ड ४५

## नोटीस.

नोटीस बेशमी शिदु वा। नातेवा जात बनगीधनगर राहणार शेगांव यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची मुलगी रुखमी ही माझी गंधर्वाची बायको असून गंर्धव हो-ण्यास ९।१० वर्षें झालीं. त्या अवधींत ती पावणेदहा वर्षें पर्यंत माझ्या घरीं रा हिली. आतां तिला तुह्मी फितूर देऊन ठेविलें. मी नेण्यास आलों असतां तुह्मी व तिचा मामा नामें महादु मला आडवे येऊन मा-रण्याची धमकी देता, नाहीं तर तिला लपविता व मला ह्मणता कीं ती आपल्या मनाची मुखत्यार आहे. यावरून तुमचा तिला दुसरा नवरा करून देण्याचा विचार आहे व त्या दुसऱ्या नवऱ्या जवळून पैसे खाण्याचा विचार आहे तरी आपणास क-ळविण्यांत येतें कीं तिला आठ दिवसांचे आंत माझे घरीं तिचे अंगावरील दागी-न्यांसह आणून घालावें. न घालाल तर माझे गंधर्वाची व दागिन्यांची नुकसानी मी दावा करून भरून घेईन. अंगावरील दागीने येणें प्रमाणें.

नथ नग एक किंमत रुपये १२.
पोलट नग दोन किंमत रुपये ८.
आंगठ्या नग दोन किंमत रुपया १॥.
फुलें पायांतील नग दोन किंमत रुपया १॥.
या दागीन्यांसह तिला आणून घालावें

कळावें. ता. १०।९।१०

सही

भिवा वा। बाबाजी जात बनगीधनगर
रा० बार्शिटाकळी. नि० खु०

नो० नं० ढ ५२

## नोटीस

नोटीस बेशमी अनुसया मर्द कृष्णाजी शिंपी रा० वाशिम हिसः—

खालीं सही करणार याजकडून या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तूं मजला ता० २९।८।१० इसवीची नोटीस आकोला वऱ्हाडसमाचारांतून दिली ती पावली. त्यांत लिहिलेला मजकूर सर्व खोटा आहे. मी तुजला घराचे बाहेर ठेऊन पोसण्यास तयार आहो घरांत ठेवीत नाहीं. कारण तूं वाईट आहेस हें. सर्व जातीला माहीत आहे. तुजला दुसरा नवरा करण्याची जरूर असल्यास माझे लग्नाचे हक्काचा निकाल करून माझी फारकती घ्यावी. तोंपर्यंत तुजला कांहीं एक करितां येत नाहीं. जर करितां तुह्मी या नोटीशीचा विचार न केला तर तुजवर फौजदारींत काम चालविणें भाग पडेल. ही नोटीस दिली. तारीख ७-९-१९१० इ.

सही

कृष्णा वल्लद रंगोबा हेदरें व नामदेव
शिंपी राहणार वाशीम

नो. नं. ढ ५३

## नोटीस.

नोटीस बेशमी—गुजी मर्द रामचंद्र बेलदार राहणार बेलुरा ता० व पो० मलकापूर हिसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं ता. २९।८।१९१० रोजीं दिलेली नोटीस सर्व खोटी आहे. तूं आपल्या आईच्या घरीं येथून भांडण करून निघून गेलीस मी तुला नेण्यास बरेच वेळां आलों असतां तुझी आई व भाऊ तुझा पत्ता लागूं देत नाहींत. तूं माझ्या येथून गेलीस तेव्हां अंगावर दागीने हि अंदाजा रुपये ६० किंमतीचे घेऊन गेलीस. सबब तुला या नोटीशीनें कळ-विण्यांत येतें कीं ही नोटीस पावले पा-सून आठ दिवसांच्या आंत तूं माझ्या येथें येऊन रहावेस व येतांना दागीने ही घेऊन यावेस. मी तुला ज्याअर्थीं पुष्कळ वेळां घेऊन जाण्यास आलों असतां तुझा तुझ्या आईनें वगैरे पत्ता लागूं दिला नाहीं त्याअर्थीं मी तुझ्या खावटी बद्दल जबाबदार नाहीं. जर तूं वरील मुदतींत माझे येथें नांदण्यास येणार नाहींस तर मला तुझा कोर्ट मार्फत तावा घ्यावा लागेल कळावें. ता. १९।९।१९१० इ.

सही

रामचंद्र वा। तुकाराम बेलदार
राहणार राजनी ता. जाम-
नेर पोष्ट वगारी नि. खु.

नो. नं. ढ ४८

## जाहिर नोटीस.

सर्वत्र शेट, सावकार व इतर लोक यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस दे-ण्यांत येतें कीं माझा मुलगा श्रीकृष्ण जेठमल मेसरी मारवाडी रा० बाळापूर व शेगांव ता० खामगांव हा अजमांस १॥-२ महिन्यांपासून वाईट लोकांच्या नादीं लागून घरांतील ४००।५०० रुपये मला न विचारतां घेऊन गेला व ते त्यानें उधळून टाकले; त्याचें डोकें कधीं कधीं ठिकाणावर नसतें. सबब मी लोकांस जा-हिर करितों कीं या पुढें कोणी वरील श्री किसन यास पैसाआडका माझ्या लेखी परवानगीवांचून माझी वडिलार्जित अगर म्यां स्वतः संपादन केलेल्या स्थावर जंगम जिनगी पैकीं कांहीं बक्षीस, खरेदी किंवा मांडून घेऊन देऊं नये. तसेंच त्यास कोणी वसुल देऊं नये. दिल्यास तो मजरा धरण्यांत येणार नाहीं. त्याला खाण्यापिण्यास किंवा वस्त्रप्रावर्णास कांहीं कमी नाहीं व त्याचें सर्व प्रकारचें चोज पुरविण्यास मी त्याचा बाप असल्यानें समर्थ आहे. मला न विचारतां त्याच्याशीं कोण-त्याहि बाबतींत देवघेव वगैरे व्यवहार मी हयात आहे तों पावेतों केल्यास तो मला मान्य होणार नाहीं. ज्याचा तो जबाबदार राहील. त्याचा हक्कवारसा माझ्यावर किंवा माझ्या स्थावरजंगम माल-मत्तेवर कोणत्याहि तऱ्हेनें नाहीं. कोणी फसी पडूं नये, सबब हें जाहिर केलें आहे कळावें. ता० ९-९-१९१० इ.

सही (मारवाडींत)

जेठमल साहेबराम मेसरी मारवाडी
रा० बाळापूर द० खु०

नो. नं. ढ ४९

## नोटीसीचें उत्तर

अंजी मर्द रामराव कुणबी वणजारी रा० पाळोदी ता० मंगरूळपीर पोस्ट-मनोरा हिसः—

रामराव अमृतराव केदार याजकडून उत्तर देण्यांत येतें कीं तूं ता० ५-९-१० च्या वऱ्हाड समाचारांतून मला नोटीस दिली ती पावली. मी तुला वागविण्यास राजी असून तुझी चालचलणूक आतां कशी आहे हें पाहण्यासाठीं तूं माझेपाशीं महिनाभर राहावें. मग मी तुझें कर्ज फेडण्याची तजवीज करितों. ही नोटीस प्रसिद्ध झाल्या वर ८ दिवसांत माझे घरीं नांदण्यास यावें. असें न झाल्यास तुला माझ्याशीं संसार करणें नाहीं समजून तुजवर व तूं ज्याच्याशीं माझी फारकत न घेतां गंधर्व लावशील त्याजवर माझा दुसरा संसार कर-ण्यास लागणारे खर्चासह फिर्याद करून तुझा तावा मिळवीन. अखेर भानगड होऊं नये ह्मणून तुला हें सुचविलें आहे. कळावें ता० १४-९-१९१०

सही

रामराव अमृतराव केदार दं० खु०
रा० राबंदे ता० आकोला.

नो. नं ढ ५०

# विनंती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या सुधारलेल्या लोखंडी नाग-रांचा खप फारच झपाट्यानें वाढल्यामुळें व विशेषेंकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमचीं आउतें फारच खपल्यामुळें आह्मी आमचा बेळगांव येथील शेतकीचीं आउतें करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्य-भागीं ह्मणजे सातारा जिल्ह्यांत कुंडलरोड रेल्वे स्टेशनानजिक किर्लोस्कर वाडीस नेला आहे. सबब आपल्यास एवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं आउतें लागतील तीं खालीं लिहिलेल्या पत्त्यावर मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,

किर्लोस्कर बंधु,

किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,

नो. नं. ड ६६ जिल्हा सातारा.


**ORIENTAL GOVERNMENT**

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

**FUNDS EXCEED THREE CRORES**
**AND**
**FORTY SEVEN LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employin portion of their annual income or profits in effecting life policies crea fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur


हें पत्र आकोला येथें केलसवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख २६ माहे सप्टेंबर १९१० इ० [ अंक ३६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील

नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या रुढीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट

नं ७३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ २/१ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट.

नो. नं. ढ ७१

### जाहिर नामा.

जाहिरनामा सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतो कीं नारायण वल्लद सोनाजी तेली राहणार देवदरी आणि बार्शीटाकळी यांनीं देवदरी बाघ वगैरे आसपासचे गांवचे लोकांवर त्यांचे नांवचे खोटे दस्तैवज करून फिर्यादी करून आपसांत दाटदटाव करून फारच फार त्रास दिला आहे त्यांत जे विन-लिहिणारे लोक आहेत त्यांचेवर दस्तैवजा-वरून खोट्या फिर्यादी. [ कोणास तरी बेंडरकडे पाठऊन कोणाचे तरी नांवचा दस्तैवज आणून एकादे मेळांतील इसमाकडून लिहून घेऊन एक दोन साक्षी घालून ठेवितो आणि एक दोन वर्षांनीं त्याची फिर्याद करून देतो. ] फिर्याद दस्तैवजी? शर्तावादी बिन-लिहिणार ! तेव्हां कोर्टांतून त्यांना कितपत दाद मिळविता येईल हें उघडच आहे. करितां या जाहिरातीवरून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं मजला लिहीता वाचता येत नाहीं याजकरितां आतां यापुढें माझे नांवचा दस्तैवज किंवा एकादे दस्तैवजावर साक्षी किंवा कोठेंही माझे नांवची सही करितांना माझा आंगठा करून घेत जावा. आंगठा असल्या वांचून माझी निशाणी वगैरे करून घेतल्यास ती मला कबूल नाहीं. आंगठ्याचे शाईची बाटली मी आपले जवळ आणून ठेविली आहे. कळावें तारीख २१।९।१० इसवी.

सही

दावल वल्लद मारुती तेली राहणार बाघ बुजरुख तालुके आकोला निशाणी आगठा.

नो. नं. ढ. ६९

### नोटीस

चांदबी मर्द बाबामिया राहणार बुधवार वेस आकोट

हिजला खालीं सही करणार नाजुक मर्द पैसा इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझी सखी आई असून देशामधून जेव्हां मी वऱ्हाडांत आले तेव्हां तुह्मी उभयतां ह्मणजे तूं व माझा बाप मिळून माझे मागें आले तेव्हां मी आज दहा वर्षांपासून कसबपणा करून तुह्मास खाणें-पिणें व अन्नवस्त्र पुरविलें व हल्लींही मीच देत आहे. व मी स्वतः पैसे मिळवून कांहीं इस्टेट व एक घर रुपये ३०० मध्यें घेतलें आहे. तें घर मी माझे नावानें खरेदी न घेतां माझा बाप चांगला असल्या मुळें त्याचे नांवानें खरेदी घेतलें आहे व पैसे माझे आंगावरील डागिने मोडून दिले आहे. आतां माझा बाप वारल्यामुळें माझे इस्टेटीची तूं वाईट लोकांचे सोबतीनें लागून खराबी करित आहे. व केली आहे. व माझे ऐकण्यांत असें आहे कीं तें घर ही तूं विक्रीस काढलें आहे. तेव्हां या नोटिशीनें कळविते कीं तुझा घरावर कोण-तेहि प्रकारचा विकण्याचा हक्क नाहीं. व त्यावर पैसे काढण्याचाहि हक्क नाहीं. जर कोणी त्यावर पैसे देईल अगर खरेदी घेईल तर त्याचे पैसे फुकट जातील. मजकडे कोणतेहि पैसे लागू होणार नाहींत. जर तुला विकण्याचें असेल अथवा कोणास घेण्याचें असेल तर त्यानें माझे विचारा-शिवाय अगर सहीशिवाय घेऊं नये. मला एक मुलगी आहे, ती माझी हक्कदार आहे. हल्लीं ती अज्ञान असल्यामुळें मला तिचे नांवें करितां येत नाहीं कळावें. ता० ७-९-१९१० इ.

सही

नाजुक मर्द पैसा राहणार आकोट निशाणी खुद्द हातची बांगडी.

नो. नं. ढ ६१

### नोटीस.

बेनामी— १ अहिल्याबाई मर्द श्रावणजी मोरे, २ गंगाबाई मर्द श्रावणजी मोरे उभयतां राहणार बोरगांव खुर्द परगणे कुरणखेड ता० आकोला यांस ——

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी माझ्या भावजयी आहांत. श्रावणजी मरून चारपांच महिने होत नाहींत तोंच तुह्मी लबाड लोकांच्या नादीं लागून कांहीं निराळीच धुसपूस घरीं आरंभली आहे. ही गोष्ट सर्व घराण्याला वाईट आहे. आह्मी त्रिवर्ग बंधु एकत्र समाइक होतों. आणि वडिलार्जित व सर्वांच्या मिळकतीची मिळून सर्व स्थावर जंगम इस्टेट समाइक आहे. मी कारभार करीत असतांना पुष्कळसे कर्जरोखे धाकट्या बंधूच्या नांवानें व इतर मुलांच्या नांवानें लिहून मुद्दाम घेत होतों. तथापि हिंदुधर्म शास्त्रा प्रमाणें सर्व जिनगी एकत्रपणांतली व समाईक आहे. तुमचे दोघे लहान मुलगे आहेत आणि ते मोठे होईपर्यंत तुह्मी कांहीं गडबड करूं नये. तुह्मी पुष्कळसे कर्जरोखे आ-पल्या पाशीं दांडगाईनें घेऊन बसला आहा आणि रोख नगदीच्या रकमा देखील तुह्मीच घेऊन बसला आहा. तसेंच सोनें वगैरेचा देखील तुह्मी पत्ता देत नाहीं. खुद्द श्रावणजीच्या हातचे कागदपत्रीं शर्ते आढळ होत असून जिनगी मात्र तुह्मी दाबून ठेवून तिचा अन्यत्र अपहार करूं पहात आहा या योगानें अज्ञान मुलांचें व सर्व कुटुंबाचें मोठेंच नुकसान तुह्मी मांडलें आहे. आतां ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत तुह्मी सर्व जंगम जिंदगी आमचे हवाली करून द्यावी. असें करण्यास चुकाल तर मात्र निरुपायानें सरकार दरबार करून तुह्माला सक्तीची मनाई देणें भाग पडेल. या शिवाय असेंही कळतें कीं तुह्मी कांहीं जिंदगी विकण्याच्या व गहाण वगैरे ठेवण्याच्या फंद-फितुरांत आहांत. इस्टेटी संबंधानें कांहीं देव-घेव किंवा व्यवहार करण्याचा कांहीं अधि-कार नाहीं. तुमचे मुलाचें पालन करण्याचा अधिकार सर्वस्वीच माझा आहे. याउपर जर कोणी तुमच्याशीं जिंदगी संबंधानें व्यवहार करील तर तो कायद्यानें बातल असून इस्टेट त्याबद्दल जबाबदार राहणार नाहीं. तुह्माला शेतीच्या मालासंबंधानें किंवा कोटांतील कामगिरी संबंधानें कांहींच हाल-चाल करण्याचा अधिकार नाहीं. आणि जर कोणी तुह्मी मुकत्यार उभा कराल तर तोही रद्द असे कळावें ता. २९-९-१०

सही

महादाजी वा. निंबाजी मोरे तर्फे मुखत्यार इरभान महादाजी मोरे रा. बोरगांव खुर्द प्र० कुरणखेड ता. आकोला

नो. नं. ढ ६९ द० खु०

ताजाकलमः—वरील नोटिशींतील सर्व भाग विशेषतः अहिल्या बाईला लागू असून गंगाबाई या अहिल्याबाईच्या गैर गोष्टीला अनुकूलही नाहीं.

### जाहिरात

सर्वत्र साहू सावकार व इतर लोक यांस कळविण्यांत येतें कीं आमच्या दोघी भावजया नामें गंगाबाई मर्द श्रावणजी व अहिल्याबाई मर्द श्रावणजी मोरे ह्या समाईक कुटुंबांतील विधवा असून आणि त्यांच्या अज्ञान मुलाचें पालन करण्याचा अधिकार त्यांचे कडे नसूनहि त्यांनें आमच्या एकत्र कुटुंबांतील जिंदगी संबंधानें अफरातफर मांडली आहे तर कोणीही त्यांच्याशीं देव-घेव करूं नये. कदाचित् अज्ञान मुलें गो-वर्धन व परमेश्वर उर्फ रामजन यांची पालन कर्ती या मिषानें कदाचित त्या जर व्यव-हार करूं लागल्या तर ते व्यवहार हिंदु-धर्म शास्त्रानें रद्द आहे. या कारणास्तव कोणी फसूं नये व आमचे इस्टेटीला सर-कार दरबार करण्याची दखल लागू नये ह्मणून आह्मी मुद्दाम प्रसिद्ध नोटीस दिली आहे कळावें ता. २६।९।१०

सही

महादाजी निंबाजी मोरे तर्फे मुखत्यार इरभान महादाजी मोरे रा. बोरगांव खुर्द प्र. कुरणखेड ता. आकोला. दस्तुर खुद.

नो. नं. ढ ७०

# वर्तमानसार.

✓ विनायक दामोदर सावरकर याच्या बाबतींत एक्स्ट्रॅडिशनसंबंधानें फ्रेंच व ब्रिटिश या सरकारांच्या दरम्यान जो प्रश्न उपस्थित झाला होता त्याचा निकाल झाला. विलायत सरकारानें हिंदुस्थान सरकाराला असें कळविलें आहे कीं, सावरकर याला परत आपल्या ताब्यांत मागण्यासंबंधानें असलेले सर्व हक्क फ्रेंच सरकारनें सोडले आहेत.

टोकियोहून आलेल्या तारांवरून कळतें कीं, बादशहाला ठार मारण्याचा गुप्त कट केल्याबद्दल कित्येक लोकांना पकडण्यांत आलें असून त्यांची चौकशी खास गुप्त कोर्टापुढें होईल. राजाच्या विरुद्ध जपानांत कट झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. राजधानीच्या बाहेर लष्करी शाळा पाहण्यासाठीं मिकॅडो गेले असतां त्यांनीं ठार मारण्याचा बेत होता. पकडलेल्या लोकांत सोशियालिस्ट पक्षाच्या चळवळीचे कित्येक पुढारी आहेत.

आशुतोष हे देवाची प्रार्थना करित असतां एका गुरख्यानें त्यांस धमकी दिली व शिवीगाळ केली व त्यास एका हवालदारानें मारहाण केली. त्याच प्रमाणें सर्व आरोपींची अशी तक्रार आहे कीं, गुरखे लोक आह्मांस फार छळतात असें बाबू निवारणचंद्र गुह वकील यानें कोर्टास कळविलें. याजवर मि. गुप्त ह्मणाले कीं, "मी या संबंधी डि. कमिशनर यांजपाशीं बोललों तेव्हां कळविलें कीं, त्यांनीं स्वतः तुरुंगांत जाऊन चौकशी केली तेव्हां कैद्यांनीं कोणतीही तक्रार केली नाहीं; उलट नीट व्यवस्था असल्याचें त्यांनीं सांगितलें." (या वेळी कित्येक आरोपींनीं 'नाहीं' 'नाहीं' ह्मणून ओरडून सांगितलें, या बाबतींत मॅजिस्ट्रेट अथवा जेल सुपरींटेंडेंट यांचे जवळ बोलावें असें कोर्टानें फर्माविलें यानंतर राजकुमार दास, राजेन्द्रचंद्र शास्त्री, कालीचरण दास, श्यामचरण गुप्त, जगदीशचंद्र गुह व पद्मिनीभूषण रुद्र यांच्या साक्षी झाल्या. मि० बेंटिंक हे मुद्दाम पिंजऱ्याजवळ आले व त्यांनीं विचारल्यावरून आशुतोष यांनीं संत्र्यांनीं धक्का देऊन पाडल्यामुळें झालेली हातावरील जखम त्यांस दाखविली. कोणास तरी रोज तुरुंगांत धाडून कैद्यांच्या काय तक्रारी आहेत, याची चौकशी करवीत जावी असें मि. डि. मॅजिस्ट्रेट यांस सांगेन असें मि. बेंटिंक ह्मणाले व याबद्दल आरोपींनीं त्यांचे आभार मानले.

एका भिकाऱ्याचे मरणास कारणीभूत झाल्याचे आरोपावरून महम्मद सैय्यद या इसमावर खटला करण्यांत आला होता. प्रेताची तपासणी करून अ. सर्जन बशरत अहमद यांनीं असें सांगितलें कीं, मृत इसमाच्या प्लिहेचें वजन ४३ औंस आहे. नंतर खटला सेशन कमिट होऊन तेथून आरोपीस जामिनावर खुलें करण्यांत आलें. पण सिव्हिल सर्जन यांनीं प्रेताची तपासणी केली तेव्हां प्लिहा ११ औंस वजनाची आहे असें आढळून आलें. व हास्पिटल-मधील भंगयानें सांगितलें कीं, प्लिहेचें वजन स्वतः अ. सर्जन यांनीं केलें नव्हतें. त्यामुळें अ. सर्जनविरुद्ध १९३ कलमान्वयें खटला करण्यांत येणार आहे. विशेष चौकशी करितां महम्मद सैय्यदवरील खटला सेशन जजसाहेबांनीं पुनः अ. कमिशनरकडे पाठविला आहे.

अमरावाद येथील पोलिसांनीं बांबची वर्दी देणाऱ्या इसमांवरील खटल्याच्या चौकशीस गेल्या सोमवारीं फ. क्रा० मॅजिस्ट्रेट मि. आल्फ्रेड मास्तर यांच्यापुढें पुनः सुरुवात झाली होती या खटल्यांतील सगळ्या आरोपींना सेशन कमिट केलें आहे. आरोपी नं. १ याजवर इ. पि. को. क. १९९ आणि २११ आणि दुसऱ्या दोघां आरोपींवर २११ या कलमांन्वयें आरोप ठेवण्यांत आले आहेत.

डेरागाझीखान हें शहर जलप्रळयामुळें वाहून जाऊन तेथील जे हजारों लोक निराधार झाले आहेत, त्यांना लोकांनीं मदत करावी, अशाबद्दल मुलतान येथील कमिशनर साहेबांच्या सहीनें एक विनंतीपत्र 'सिव्हिल मिलिटरी गॅझेट' मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

मुनशीगंज येथें पोलिसांना सांपडलेले ११ बांब स्फोटक-द्रव्याचे-सरकारी-परीक्षकांनीं तपासून पाहतां ते किंचित आघातानें उडणार आहेत असें ठरलें आहे.

एका आठ वर्षांच्या मुलानें त्याच्याच वयाचा दुसरा एक मुलगा पाण्यांत बुडत असतां स्वतःच्या जीवाची पर्वा न करितां त्यास वांचविल्याबद्दल बरीसाल येथील पुढारी गृहस्थ बाबू अश्विनी कुमार दत्त यांनीं त्यास कालरोजीं एक सोन्याची आंगठी बक्षीस दिली.

लिसबन येथून रायटरचा बातमीदार कळवितो कीं, तेथील झडती घेऊन बांब तयार करणाऱ्या दहा इसमांना पकडलें आहे. या इसमांच्या जवळ बांब करण्याचें बरेंच साहित्य मिळालें आहे. पकडलेल्या गृहस्थांपैकीं एका इसमानें आमचे बेत राजकीय होते, असें कबूल केलें असल्याचें समजतें.

बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनीं आपल्या बंगाली पत्राचें वळण जरा सौम्य करावें अशाबद्दल सरकारांतून सूचना आल्या आहेत, असें कळलें आहे.

जोहॅन्सबर्ग येथील तारांवरून समजतें कीं, जनरल बोथा यांची स्थिति फार चमत्कारिक झाली आहे. त्यांना निरनिराळ्या लोकांकडून निरनिराळ्या सल्लामसलती व सूचना आल्या आहेत, परंतु त्यांनीं मौनव्रत धारण केलें आहे. बोथा आणि जेम्सन यांचें संयुक्त प्रधानमंडळ होणार अशी बोलवा आहे व त्यांत मेरिमन यांनाही घेऊन मिळण्याविषयीं निमंत्रण केलें आहे; परंतु त्यांना मुख्य प्रधान नेमलें तरच ते प्रधानमंडळांत येतील असें ह्मणतात.

आदमखल लोकांकडून वारंवार दरोडे घालण्यांत येतात, यामुळें कोहट येथील खिंडींतील वाट जाण्यायेण्यास बंद केली आहे, व जिर्गा यास कोहट येथें बोलावून सांगण्यांत आलें आहे कीं, इराणच्या आखातांत हत्यारांच्या व्यापारांत होणाऱ्या नुकसानीची जी भरपाई तुह्मी मागतां ती मिळणार नाहीं. कोहटकडील अफगाण लोक घालत असलेल्या दरवड्यांमुळें झाकाखेल व कुकीखेल या लोकांत थोडी अस्वस्थता उत्पन्न झाली आहे.

ता. १ एप्रिल तें ३ सप्टेंबरपर्यंत हिंदुस्थानांतील सगळ्या रेल्वेचें उत्पन्न १४७ लक्ष रुपये गेल्या सालापेक्षां अधिक झालें. पैकीं जी. आय. पी. चें २९ लक्ष, इ. आय. चें २९ लक्ष, राजपुताना माळव्याचें १३ लक्ष, मद्रास आणि एस. एम. चें १२ लक्ष असें उत्पन्न आहे.

अतिवृष्टीमुळें अमृतसरनजीक करतारपूर येथें एक घर कोसळून पडून त्याखालीं निजलेलीं तीन माणसें दबून मरण पावलीं. त्यांचीं प्रेतें दुसरे दिवशीं बाहेर काढण्यांत आलीं.

मँचेस्टर येथील व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटीच्या टेक्निकल शाखेंतील बी. एस. सी. च्या परीक्षेंत बाबू ज्वालाप्रसाद श्रीवास्तव हे पास झाले आहेत. हिंदी लोकांत अप्लाइड केमिस्ट्रीमध्यें वरील हुद्द्याचा हा बहुमान यांनींच प्रथम मिळविला आहे.

---

## भक्तिवात्सल्य नाटक.

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

### अंक दुसरा.

प्रवेश २ रा.

स्थळ:— बादशहाचा वाडा.

**दासोपंत**— हा जड देह पितृकार्यासाठींच बळी पडणार ही मनाला केवढी समाधानाची गोष्ट आहे. अशा प्रसंगाला संकट मानणें ह्मणजे आपलें बुद्धिमांद्य जगापुढें आणण्या सारखेंच आहे. पहा.

पद

मातृपितृ भक्तीच्या आमिषें देवा भुलवीलें ॥<br>
पुंडलिकानें भीमा तटिंनी तटिं त्या<br>
तिष्ठविलें ॥ धृ० ॥<br>
भक्तांकित प्रभु ह्मणवी ह्मणुनी तेथुनि मच हाले ॥<br>
कटिं कर ठेवुनि अजुनि विटेवरि उभा तयें त्याजिलें ॥<br>
भक्तेश्वरतव वैकुंठहि तें भूवरि वसविलें ॥ १ ॥

आतां सांप्रतच्या स्थितींत मला या यवन बादशहाचे नाना आघात सहन करावे लागतील. मला जातिभ्रष्ट करण्या करितां किंबहुना तो माझा अनन्वित छलही करील. पण पितृभक्ती पासून निष्पन्न होणाऱ्या ईश्वर प्राप्तीच्या चित्सुखापुढें या क्षणिक दुःखाची काय थोरवी ! गुलाबाच्या फुलाची अपेक्षा करणाराच्या हाताला फुला भोंवतीं असलेला एक तरी कांटा टोंचणारच. तरी तो पुष्पेच्छु त्याची पर्वा न करितां जसा फूल तोडण्याचा प्रयत्न करितो, त्याच प्रमाणें ईश्वर प्राप्तीच्या मार्गांत आड येणाऱ्या दुःखरूप कंटकांना न जुमानतां धर्माज्ञेला अनुसरून पायरी पायरीनें आपला यत्न चालू ठेविलाच पाहिजे. त्याच पायरी पैकीं मातापित्याची आज्ञा पाळणें व सेवा करणें; ही पहिली पायरी होय. या पायरीवर बसण्याची वेळ आली असतां, यवन भयानें मी तिचा अव्हेर करितों, तर आज माझ्या चित्सुखप्राप्तीच्या भावी आशावृक्षावर मूर्खपणाची कुठार पडून तो तुटून नष्ट झाला असता. मना आतां कसल्याही प्रसंगाला तोंड देण्याचा निश्चय कर. तूं मेणाहून मऊ. पण प्रसंगीं वज्राहून कठीण आहेस. याची सत्यता मला दाखीव आज. बा-

पद

सुख दुःखाचे आघात वरि वरि सहन करावें तरी ॥<br>
स्थिरावें मग हृदया माजिं हरी ॥ निश्चय बल<br>
असतां मग कार्या फल येतें झडकरी ॥ मना<br>
ही सत्य असे वैखरी ॥ हो निश्चल मेरूसम<br>
सोडुंनि तव भ्रमणा ॥ रे चराचराची चिंता<br>
राधारमणा ॥ असतां कां येइन तुझी तयाला<br>
करुणा ॥ दृढता धरि अंतरीं ॥ सदोदित ॥<br>
तो नर न बुडे तमसागरीं ॥ १ ॥

( बादशहा येतो. )

**बादशहा**— वाहवा ! मुझे ये लडका मानिंद आफताफ नजर आता है. ऐ खुदा ये जो मुसलमीन बनजाय तो मय ख्वाइष रखताहूं के इस्को मय मेरा शहाजादा समजके खिलकतका पादशहा बनाउंगा (दासोपंतास) बेटा तेरे वालिदके वास्ते कुष सोच करके हरगीज फिक्रमे नहीं रहिनां.

**दासोपंत**— खाविंद प्रजा ही राजाचीं लेंकरें आहेत. अर्थात मी बादशहाच्या वाड्यांत ह्मणजे आईबापाच्याच घरीं आहे असेंच मी समजतों.

**बादशहा**— हां बेशक. लिये तुझे मय कहताहूं कै तू जल्द मुसलमीन बनजा. मेरेकोभी अवल्याद नहीं. इसलिये मय तुझे मेरे तख्तका वारीष बनाउंगा.

**दासोपंत**— छे, छे, खाविंद केवळ राज्यलोभानें, नश्वर संपदेच्या प्राप्ती करितां धर्मांतर करणारा नीच मनुष्य मी नाहीं.

**बादशहा**— क्या एहेले इस्लामी मजहबको तू नादान समजता है. नही नही बेटा परवरदिगारनें इस्लामी लोगोंको बक्ष किया हुवा ये मजहब है.

**दासोपंत**— प्रत्येक धर्म आणि प्रत्येक मनुष्य ईश्वरानेंच पैदा केला आहे. आणि याचे करितां कोणत्याही मनुष्याला धर्मांतर करण्याचा अधिकार नाहीं.

**बादशहा** — क्यं ?

**दासोपंत**— निरनिराळे धर्म ह्मणजे ईश्वरानें आपल्या प्राप्ती करितां प्राणिवर्गाला लावून दिलेले निरनिराळे मार्ग. व त्या त्या मार्गाचा अवलंब करावा ह्मणून जगजीवनानें मनुष्यजातीला आपल्या कर्मानुसार निरनिराळ्या धर्मांत उत्पन्न केलें. परमेश्वराची आज्ञा पाळणें हें प्रत्येक व्यक्तीचें आद्य कर्तव्य आहे. जो तें बजावणार नाहीं तो देवाचा गुन्हेगार ठरेल.

**बादशहा**— ये तेरी बात दुरस्त नही.

**दासोपंत**— खाविंद प्रबळ इच्छे करितां, चैनी करितां, संपत्ती करितां, वा राज्यालोभाकरितां धर्मांतर करणाऱ्याला नेमून दिलेला धर्म सोडून अन्य धर्म स्वीकारल्या बदल ह्मणजे ईश्वराच्या करण्यांत दुरुस्ती करून, त्याची आज्ञा भंग केल्या बदल मरणा नंतर परमात्म्यापुढें जाब द्यावा लागणार नाहीं काय ? आमच्या शास्त्रांत ह्मटलें आहे. "स्वधर्मांत मरण आलें तरी पत्करलें पण परधर्मांत भीति आहे." आणि ती भीति हीच. अहो.

पद

परमात्म्याची असे सकल कृति मनुजा सुखदाती ॥
चराचराते पोसायाते मेघाते जगतीं ॥ पाडितो ॥
प्राणिगणांची अंतरिं राहुनि चिंता तो करितो ॥
॥ सद्रोदित ॥
योग्य जया ज्या देशीं धर्मि जानि धनहि तसें
देतो ॥ तयाला ॥
स्वार्थपरायण परी नर होउनि स्वार्थाला मुकती ॥

आकाशांत तारांगणें, चंद्र, सूर्य, आणि पृथ्वीवर पशु, पक्षी आदि प्राणी आपापले जातिधर्म पाळतात. परंतु मनुष्यमात्र स्वार्थाकरितां ईश्वर प्रेरित आपला धर्ममार्ग सोडून, ईश्वर इच्छेच्या विरुद्ध गेल्याचें पाप पदरीं बांधतो. आणि संकट ओढवून घेतो. या पापाचें भरमाप त्याच्या पदरीं देण्याकरितां देवानें रौरव, कुंभीपाक वगैरे नर्कासह यम निर्माण केला आहे.

बादशहा– [ मनांत ] आभी इससे बात करनेमे कुच गुंजाष नई.. [ उघड ] खैर तेरे दिलमे नही तो हमारा कुच कहेना नही. [ मनांत ] मुझे खास यकीन है के इसके वालीदसे दोलाख रुपवा आदा होनेका नही. फीर यकरार बमूजब खास इस्को मुसलमीन बनायेंगे. खुदा हुलाला करे तो ये मौका जल्द आयेगा. [ उघड ] देख बेटा तेरे आच्छेके लिये सब कहता हूं. मेरे पीछे तू राजा बन जायेगा.

( जातो व पडदा पडतो. )

( प्रवेश २ रा समाप्त. )

---

## श्रीमती ऍनी बेझंटबाई यांचे व्याख्यानाचे आधारें

(लेखक चिंतामण हरी मराठे सिताबर्डी नागपूर)

## हिंदुस्थानची जागृति

'धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे' या भगवंताचे वचनाप्रमाणें वर उल्लेख केलेल्या धर्म व पंथ संस्थापकांनीं तत् तद् परिस्थितीस अनुसरून धर्म स्थापनेची खटपट चालविली व हाच आपल्या जागृतीचा प्रारंभ म्हटला पाहिजे.

देशांतील पुढारी स्वपर उर्जितावस्थेचा विचार करूं लागले. आपण पूर्वी होतों कसें, हल्लीं आपण कोणच्या स्थितींत आहों, याच अवस्थेंत राहिल्यास आपलें आस्तित्व कायम राहील किंवा नाहीं या व अशा अनेक विचारांनीं आमच्या धुरिणांचीं मनें व्यापून राहिलीं आहेत. लोकांस असें वाटत आहे कीं आमच्या सर्व आपत्तीचें बीज आमचें अज्ञान आहे व तें अज्ञान दूर करण्याकरितां शिक्षणाचा प्रसार जितका होईल तितका झाला पाहिजे. उत्तम तऱ्हेचें शिक्षण मिळाल्यास पुढील पिढी आपल्या नावास व पूर्व वैभवास शोभेल अशी तयार होईल याबद्दल सर्वत्राचा एकवाक्यता आहे. हल्लीं चालू असलेल्या शेंकडों चळवळींचा उगम याच जागृतींत आहे. आमचा देश, आमच्या देशाचें कल्याण झालें पाहिजे, आह्मी परकिया कडून सर्व तऱ्हेनें फजीत होत आहोत, आमचें वीर्य, शौर्य, बल, विद्वत्ता, शहाणपणा, कल्पकता या सर्वांच्या नाशास कारण कोण असावें ? आमची प्रगति होण्यास आमची राजकीय परिस्थिति अनुकूल आहे अथवा प्रतिकूल आहे! अशा तऱ्हेचे विचार सुशिक्षीत लोकांचे डोक्यांत घोळूं लागले आहेत. परदेशांत वाहणाऱ्या संपत्तीचा लोट बंद कसा होईल या विवेचनेंत आमचे नागरिक गुंतले आहेत. हीं सर्व सुचिन्हें पूर्वादवरवीं उदय पावणाऱ्या अरुणोदयाप्रमाणें आहेत व असाच सारखा क्रम सुरू राहिल्यास आर्यभूवर पूर्व वैभवरूप सविता खचित दृष्टीस पडेल.

परंतु हल्लीं बंगालमध्यें अथवा इतर ठिकाणीं चालू असलेल्या चळवळी कडे बारिक लक्ष दिलें असतां असें दिसून येईल कीं कांहीं गोष्टींत फारच गडबड झालेली दिसते. विशिष्ट कारणानें उत्पन्न झालेले आगंतुक मनोविकार कायम राहतील किंवा नाहीं याची फार भीति आहे. लोकनायक हे अंतर्बाह्य थोर पुरुष असून जनसमूहास उत्तम वळण देणारे पाहिजेत. राष्ट्रभक्तिरूप स्थंडिलावर आपले सर्व सुखाची आहुति दिल्याखेरीज राष्ट्रकार्य सिद्धीस जाणें दुर्घट आहे. राष्ट्र धुरीणास विश्व हें स्वकुटुंबा समान भासलें पाहिजे याची 'आर्य' धर्मावर पूर्ण श्रद्धा असली पाहिजे तो नीतीचा पुतळा पाहिजे. असें नसल तर या एकदम आलेल्या लाटेचा परिणाम चांगला होणार नाहीं. सवेग प्रगति झाली पाहिजे. योग्यते प्रमाणें मनाची धांव पाहिजे.

अशा राष्ट्र जागृतीचे प्रसंगीं लोक धुरीणांनीं कोणचा मार्ग स्विकारावा याचा आपण विचार करूं. मानव जातीची प्रगती अथवा अधोगती ही केवळ मनुष्याचेच स्वाधीन नसून हें भवचक्र फिरविणारा ब्रह्मांडनायक वेगळाच आहे. त्याचा अदृश्य शक्ति अनंत रूपानें जगांतील घडामोडी घडवून आणितात, प्रत्येक स्थूल व सूक्ष्म कार्यास तत् तत् अदृश्य अशी देवता चालक असते, ही गोष्ट आह्मां आर्यांस नवीन नाहीं. विघ्ननाशक विनायकाचे कृपेशिवाय आमचे कोणतेंही कृत्य निर्विघ्नतेनें पार पडत नाहीं. हा विचार नवीन नाहीं. याच परम दयाळू परमेश्वराचे कृपेवर आपलें वैभव, आपला थोरपणा अवलंबून असतो. 'निमित्त मात्रं भव सव्यसाचिन्' या भगवंतोक्ती प्रमाणें आपण निमित्त मात्र आहोंत. 'धाता यथा पूर्वमकल्पयत्' पुढें काय होणार याचें चित्र पूर्वीच आंखून ठेविलेलें आहे. व परमात्म कल्पनेंत रचलेल्या चित्राचे पूर्ततेकरितां दृश्य व अदृश्य अशा अनंत शक्ति अहोरात्र झटत आहेत. देशांत बऱ्या वाईट घडणाऱ्या सर्व गोष्टींचा तोच चालक असून, सर्व त्याचेच सत्तेनें होत आहे. या त्याचे सृष्टिरूप नाटकाचें वर्णन करणें मानवी सामर्थ्याचे बाहेरचें आहे. ज्यास आपण संकट ह्मणतों त्यास आपण वाईट ह्मणतो तीं गोष्ट कदाचित् आपल्या कल्याणाची असेल व ज्या गोष्टीस आपण चांगली ह्मणतो ती गोष्ट कदाचित् सर्वांचे आपल्या नाशास कारणीभूत असेल. तो परम दयाळू आहे व त्याचे दयेचें प्रतिबिंब पुसट पुसट निरपेक्षबुद्धीनें जगताकरितां झटणारे लोकनायकाचे अंतःकरणांत दृष्टीस पडतें.

[पुढे चालू]

---

# वऱ्हाडसमाचार.

भाद्रपद शुद्ध १९ शके १८३२ दुर्मतीनामसंवत्सरे

## ते दिवस आणि हे दिवस!

—*--*-*--*—

'तेहि नो दिवसा गतः' हें वाक्य पुष्कळांच्या तोंडून आपण ऐकतों, पण एल्फिनस्टन कॉलेजाच्या संमेलनप्रसंगीं न्या० सर नारायणराव चंदावरकर यांचे तोंडून निघालेल्या त्या प्रकारच्या उद्गारांनीं मागच्या काळच्या थोर पुरुषांची, त्यांच्या मताची, व थोरपणाची आठवण करून दिल्यामुळें त्यांना विशेष महत्व देणें योग्य आहे. अगदीं अव्वल इंग्रजी अमलांतल्या पिढींतले सुशिक्षित व थोर ग्रहस्थांपैकीं आतां मि० दादाभाई नौरोजी व डा० भांडारकर दोघेच राहिले आहेत. बाळशास्त्री जांभेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, रानडे, गापुरजी बंगाली, मंडलीक नूलकर, देशमुख कर्सनदास मुळजी प्रभृति मंडळी गेली. त्यांच्या वेळेला सार्वजानिक चारित्र हा शब्द नुकताच लोकांच्या परिचयाचा होऊं लागला होता. पण त्यांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेवलेला उच्च आदर्श, व तें ध्येय साध्य करून घेण्याची त्यांची धमक, त्यांची सहिष्णुता, त्यांचें तेजही आतां लुप्तप्राय दिसत आहेत. त्या वेळच्या सुशिक्षितांमध्यें एकाही होती. आतांच्या सारखे हिंदु आणि मुसलमान, मराठे आणि ब्राह्मण, म्हावी व जिनगर, सारस्वत व चितपावन, नागपुरे आणि पुणेकर, वगैरेंच्या सारखे जातीजातींतले तंटे करण्यांत सुशिक्षितांचा काळ जात नसे. वर निर्दिष्ट केलेल्या पैकीं एकाही गृहस्थानें समाजांत दुही वाढविण्याचें नीच कृत्य केलें नाहीं; उलट भिन्न भिन्न जातीचें एकीकरण, धर्माच्या उज्वल स्वरूपाचें प्रकटीकरण, सामाजिक शुद्धता, राजकीय उन्नति, वगैरे समाजाला हितकारक अशाच गोष्टी करण्यांत त्यांनीं आपली इतिकर्तव्यता मानिली. त्यांचीं मनें उदार होतीं; त्यांची कृति धीटपणाची आणि विचार सरळ होते. या गोष्टीहून अगदीं निराळ्या गोष्टींचें साम्राज्य आज चालू आहे. असें कां व्हावें? याचें एक उत्तर हें आहे कीं प्रगति ही नेहमीं सरळ रेषेनें जात नाहीं. प्रगतीचा ओघ वाहत असतां त्याला मध्यंतरीं दुराग्रह, दुर्मते, अविचार, उतावळपणा, अप्रामाणिकपणा वगैरे अंतरायांतून पार जावयाचें असतें. त्यांना ओलांडून जात असतांना कांचित् प्रसंगीं प्रगतीच्या प्रवाहाचें कांहीं काळपर्यंत स्खलन होणें अपरिहार्य असतें. हें स्खलन अपरिहार्य आहे. कोणत्याही देशाच्या इतिहासांत अशा प्रकारचीं उदाहरणें आढळतील सध्याची ब्रिटिश पार्लमेंटचा स्थिति पहाना ? सध्यां पार्लमेंटांत जितके पक्ष व जितक्या दुफळ्या दिसतात तितक्या पूर्वी कधीं होत्या ? पण सध्यांच्या पार्लमेंटच्या बहुविध पक्षभेदावरून जर कोणी असें अनुमान काढलें कीं इंग्लंड अवनतीच्या मार्गाला लागलें आहे, तर तें अनुमान साफ चुकीचें ठरेल. कारण कीं पार्लमेंटचें ध्येय–लोकहित साधन–तें दृष्टीआड झालें नाहीं. ब्रिटिश मुत्सद्दी जेव्हां तें ध्येय विसरतील, कर्तव्यभ्रष्ट होतील, व लोकहितापेक्षां स्वार्थाला अधिक महत्व देतील तेव्हां मात्र हें पारडें खास उलटेल. तोंपर्यंत नुसते मतभेद देशाची हानि करूं शकणार नाहींत. तोच नियम आपल्या समाजाला लागूं केला तर असें ह्मणतां येईल कीं आमच्यांत मवाळ, जहाल, सुधारक, कुधारक, ब्राह्मणाचे कैवारी किंवा त्यांचे द्वेष्टे, असे किती ही पक्ष असले तरी जोंपर्यंत ते प्रामाणिकपणा, ध्येयानुरक्तता, आणि देशहिताविषयीं दक्षता या त्रयींचा त्याग करणार नाहींत, तोंपर्यंत मतभेद व पक्षभेद यामुळें समाजाची यत्किंचित् ही हानि होणार नाहीं.

कांहीं अंशीं हें ही खरें आहे कीं गतकाल माणसाला नेहमींच रमणीय व आदरणीय वाटत असतो. ज्याप्रमाणें पर्वतापासून दूर जाऊन त्याकडे दृष्टिक्षेप केल्यावर त्या पर्वताचा विषमपणा दृष्टीच्या टप्प्यांतून निघून जाऊन फक्त त्याची मोहकता तेवढी डोळ्यांत भरते, अथवा ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत दुपारचे वेळीं वालुकारण्यांतला प्रवाशाला मागें व पुढें कांहीं अंतरावर नेत्रांना आल्हाद देणारें मृगजळ दिसत असतें, त्या प्रमाणें विचारसृष्टींत संचार करणारालाही नेहमीं गतकाल मोहक वाटत असतो. तिसरी ही एक गोष्ट हें अंतर पडण्यास कारण होते. ती ह्मणजे स्थितिभिन्नताही होय. त्या वेळचे लोक जुन्या पंडिताच्या दुराग्रहाविरुद्ध बंड करून नुकतेच स्वतंत्र झाले होतें, आणि स्वतंत्रतेबरोबर अनेक स्पृहणीय गुण त्यांनीं संपादन केले. सध्यां समाजाचा एक पोटभेद दुसऱ्या पोटभेदापासून भिन्न व्हावयाला पाहत आहे. एक प्रकारचा जात्यभिमान लोकांत दिसूं लागला आहे. तें स्वातंत्र्य समाजाच्या पोटभेदाला मिळेपर्यंत असा कलह चालणार, व तें मिळालें ह्मणजे त्याचें समाधान होऊन तो दुसऱ्यांशीं सलोख्यानें राहूं लागणार असें दिसतें. सारांश, सध्याचे मतभेद आणि पक्षभेद हे चिरस्थायी नाहींत, क्षणिक आहेत, आणि समाजांत चैतन्य आहे याचें तें निदर्शक आहे. ते दिवस गेले तसे हे ही जातील आणि प्रगतीचा ओघ या अंतरायांतून पार पडून पुनः जोरानें वाहूं लागलेला आपण पाहूं. दादाभाई, बाळशास्त्री, रानडे, देशमुख यांचा काळ गेलेला नाहीं; तो कांहीं वेळपर्यंत दृष्टीआड झाला आहे इतकेंच. तो पुनः येणार आहे, असा दृढ विश्वास धरून प्रगतीच्या मार्गांतल्या अंतरायांशीं जोरानें झगडणें हेंच सुशिक्षितांचें कर्तव्य आहे. हें त्यांनीं ओळखावें ह्मणजे झालें.

## मुंबईच्या इतिहासांतलें एक अप्रकाशित प्रकरण.

आमच्या देशांत इतिहासकार नाहींत हीच गोष्ट खरी. नाहीं तर १८६१ सालच्या शेअर-मार्केटच्या गोंधळा सारखीं प्रकरणें अद्यापपर्यंत अप्रकाशित राहिलीं नसतीं. आमच्यांतली ही उणीव मुंबईचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वृद्ध लेखक मि. दिनशा ए. वाच्छा यांनीं अंशत: दूर केली आहे. सन १८६१ सालीं अमेरिकेंत स्वातंत्र्याचें युद्ध सुरू होतें. त्यामुळें तिकडून विलायतेस कापूस न गेल्यामुळें हिंदुस्थानच्या कापसाला ' न भूतो न भविष्याति ' इतका भाव आला, आणि कापसाचे व्यापारी आपल्या घराचे उंबरठे सोन्याचे करूं लागले इतकी अलोट संपत्ति हिंदुस्थानांत आली. नव्या व्यांका स्थापन झाल्या, नवींनवीं व्यापारी धाडसाचीं कामें होऊं लागलीं. पैशाची पर्वा नसल्यानें मोटमोठे सट्टे होऊं लागले. अशांत मुंबईचा व्याकबे बुजवून ती जमीन बी. बी. सी. आय. रेल्वेला देण्याचा विचार ठरला. त्याकारितां कंपनी स्थापन झाली. तिच्या शेअरांची किंमत रोज चढत चालली. तिच्या सारखेंच माझगांव बंदराजवळचा समुद्र बुजवून जमीन करण्यास दुसरी एक कंपनी स्थापन झाली. पांच लक्ष रुपये किंमतीची जागा शेट प्रेमचंद रायचंद यांनीं चाळीस लक्षांस घेतली होती ती या कंपनीनें त्यांचे पासून साठ लक्षांस घेतली ! असले अप्रतिम धाडसाचे प्रकार रोज घडूं लागले. असले सट्टे करणारांत शेट प्रेमचंद रायचंद हे प्रमुख होते. गव्हर्नर पेक्षांही यांचा बडेजाव मोठा झाला. हे एकेका दिवसांत लाख दोन लाख रुपये मिळवूं लागले. यांच्या एका शब्दानें मुंबईच्या बाजारांत उलथा पालथ होऊं लागली. मुंबई व्यांकेसारख्या व्यांका यांच्या एका शब्दावर तारण न घेतां लक्षावधि रुपये कोणालाही कर्ज देऊं लागल्या. गोरगरिबांनासुद्धां किडुकमिडुक विकून व्याकबे कंपनींत एक अर्धा शेअर घेण्याचा मोह पडूं लागला. अशी स्थिति असतां एकाएकीं अमेरिकन युद्ध बंद होऊन कापसाचा भाव खाडकन उतरला व व्याकबे कंपनीचे कोट्यवधि रुपयांचें भांडवल ज्या एशियाटिक व्यांकेंत ठेविलें होतें ती व्यांक ही एकाएकीं बसली त्याबरोबर चोंहीकडे धरणी कंपासारखा धक्का बसला. या धक्क्यानें सट्टा करणारे प्रेमचंदासारखे धाडशी व्यापारी चीत झाले त्यांचे कोट्यवधि रुपयांचें दिवाळें निघालें ज्यांच्या घरीं रोज दिवाळी चालली होती त्यांच्या घरीं शिमग्याचा ध्वनि ऐकूं येऊं लागला. कित्येकांनी हिरकण्या व अफू खाऊन अब्रू बचावण्याचे मार्ग स्वीकारले. गोरगरिबांच्या तर तोंडचें अन्न गेलें, ते सपशेल बुडाले. एकदम सात मजली भव्य राजवाडा कोसळावा, तसा हा सट्याचा भव्य प्रासाद कोसळून लक्षावधि माणसें त्या खालीं चिरडून मेलीं. इंग्लंडच्या इतिहासांत जो प्रकार साऊथ सी बबलचा झाला तोच मुंबईत झाला. असलें विलक्षण हें प्रकरण अद्यापपर्यंत चांगल्या इतिहासकाराच्या अभावीं अप्रकाशित राहिलें होतें, पण मि० वाच्छा यांच्य सारखे तो प्रकार व्यांकेंत राहून प्रत्यक्ष पाहिलेले गृहस्थ सुदैवानें अद्याप हयात आहेत व त्यांनीं या प्रकरणाला उजेडांत आणिलें आहे ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. मि० वाच्छा यांचें हें पुस्तक इतकें मजेदार आहे कीं तें एका बैठकींत सगळें वाचून टाकल्याखेरीज राहवत नाहीं. हें पुस्तक गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालें आहे, पण आणखी दोनतीन महिन्यांच्या आंतच त्याची पहिली आवृत्ति संपेल असा रंग दिसतो. मुंबईच्या इतिहासांतलें हें अत्यंत महत्त्वाचें प्रकरण प्रकाशित करून मि० वाच्छा यांनीं आपल्या उत्कृष्ट नागरिकत्वांत कीर्तीची भर टाकली आहे यांत संशय नाहीं.

## अद्भूत कथा.

लंडन टाइम्सचे बातमीदार मि० चिरोल हे सध्या हिंदुस्थानांतल्या विक्षोभासंबंधाचे लेख लिहून त्या पत्राला पाठवीत असतात. या लेखांत सत्याभिरुची पेक्षां कल्पकतेचेंच प्रदर्शन ज्यास्त असतें. याचें प्रत्यंतर ज्यास पाहणें असेल त्यानें त्या लेखांतला हिंदुस्थानच्या स्त्रियांविषयांचा उल्लेख अवश्य पहावा. हिंदुस्थानच्या स्त्रिया सौंदर्यांत, विनय, लज्जा इ. गुणांत, बुद्धिमत्तेंत, दयादाक्षिण्यांत, किंवा धार्मिकतेंत पाश्चात्य स्त्रियांपेक्षां लेशमात्र ही कमी नाहींत, उलट सरस आहेत. राजकारणांत ढवळाढवळ करण्याची महत्त्वाकांक्षा अद्याप त्यांच्या स्वप्नींही नाहीं. तथापि मि० चिरोल यांच्या मनांत त्यांना कोणीकडून तरी नांवें ठेवावयाचीं होतीं. ह्मणून त्यांनीं सध्याच्या राजद्रोहाशीं त्यांचा संबंध जोडून दिला आहे, आणि कोल्हापुरास दोन बाया तपस्विनींच्या वेषानें हिंडून बंडाची उभारणी करतांना आढळल्या असें विधान बेलाशक ठोकून दिलें आहे ! इंग्रजी भाषेंतल्या बऱ्याच अद्भुत कथा आह्मी वाचल्या आहेत, पण इतकी अद्भुत कथा आह्मीं कधीं वाचली नव्हती किंवा लंडन टाइम्सनें राजकारणी अद्भुत कथांसाठीं आपले कालम खुले ठेविले आहेत, हा आह्मांला कल्पनाही झाली नाहीं. ब्राह्मणांच्या विरुद्ध कारस्थान रचण्याला कोल्हापुर हें सोयीचें क्षेत्र आहेच, आणि तेथें असतांनाच मि. चिरोल यांच्या सुपीक मेंदूंतून ही स्त्रियांविषयींची अद्भुत कथा बाहेर पडली असावी. पण अशा दोन स्त्रिया तपस्विनींच्या वेषानें घरोघर बंडाची उभारणी करीत असतांना कोल्हापूरचे पोलिस काय करित होते हें साहेब मजकुरांनीं सांगितलें नाहीं. कोल्हापुरचा पाहुणचार खाणाऱ्या साहेबांनें तेथल्या पोलिसाचा हलगर्जीपणा न कळत कां होईना, पण काल्पनिक कथेंत आणून त्यांची बदनामी करावी याला युरोपियन शिष्टाचाराच्या भाषेंत काय नांव असेल तें असो, पण हिंदुस्थानच्या शिष्टाचाराच्या दृष्टीनें ती गोष्ट निंद्यच ठरेल. या विक्षोभाच्या मीमांसेनें लोकांना अगदीं भंडावून सोडलें आहे. आतां टाइम्स हिंदुस्थानला विश्रांति कधीं देणार ?

## पोलिस रिपोर्ट

१९०९ सालचा वार्षिक रिपोर्ट नुकताच आला आहे. त्यावरून पाहतां या सालीं पोलिस खात्याचा कारभार विशेष समाधानकारक आहे आणि त्या संबंधानें अलिशान नामदार चीफ कमिशनर यांनीं आपला आनंद ठिकठिकाणीं व्यक्त केला आहे. रा. रा. क्लीव्हलंड हे मध्यप्रांताच्या पोलिस खात्याचे मुख्य आधारस्तंभ होते. आणि त्यांनीं आठ वर्षांच्या कारकिर्दींत या खात्याची चांगली भरभराट केली आणि त्यांत विशेषत: त्यांची मुख्य कामगिरी ह्मटली ह्मणजे वऱ्हाड व मध्यप्रांत यांमध्यें राजद्रोहाच्या प्रकरणांचा त्यांनीं उत्तम शेवट लावला ही होय. राजद्रोहाच्या प्रसाराच्या संबंधानें त्यांनीं जी चवकशी केली त्या चवकशीचें एक मोठें बाडच बनलेलें आहे. आणि ह्या गुप्त संग्रहांत प्रांतांतील बहुतेक सर्व चालक गृहस्थांच्या संबंधानें त्यांच्या निरनिराळ्या मतांचा त्यांच्या जाहिर संभाषणांचा व त्यांच्या कार्यमालांचा सर्व इतिहासच वर्णिलेला आहे. हा संग्रह गुप्त कोठींतला असल्यामुळें निदान आणखी पाव शतक याचा फायदा लोकांस मिळण्याचा संभव नाहीं. राजद्रोहाचा बींमोड करतांना इतर सार्वजनिक कार्यांना जो राजाश्रय मिळावयास पाहिजे होता तो न मिळाल्यामुळें धाईटावरोबर बरीचशा लोकोपयोगी संस्थाही लयास गेल्या आहेत ही दुःखाची गोष्ट होय.

पोलिसांनीं चवकशी करावयाचे असे गुन्हे रीपोर्टच्या वर्षी ३०४९६ घडले. या गुन्ह्यांमध्यें ३४ कलमा खालील क्षुद्र गुन्ह्यांचा समावेश होत नाहीं. १९०८ सालापेक्षां पिकापाण्यास धानें १९०९ साल बरें गेलें आणि त्या मानानें सुमार २००० गुन्हे कमी घडले गुन्ह्यांची संख्या कोणत्या कोणत्या जिल्ह्यांत लहान मोठी आहे या संबंधानें राजश्री स्लोकॉक इन्स्पेक्टर जनरल यांनीं एक मजेदार विल्हेवारी तयार केली आहे त्यावरून पाहतां सरासरी मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून ४६९ इसमां मागें एक गुन्हा असें प्रमाण निघतें. जिल्हे निहाय एकेका गुन्ह्याचें प्रमाण खालील प्रमाणें आहे—

| जिल्ह्याचें नांव | किती माणसांमागें एक गुन्हा. |
|---|---|
| दमो | २३९ |
| सागर | २६१ |
| बैतुल | २६८ |
| यवतमाळ | ३०९ |
| शिवणी | ३३६ |
| छिनवाडा | ३६४ |
| उमरावती | ३७६ |
| जबलपूर | ३८३ |
| मंडाला | ३८७ |
| नरसिंगपूर | ४०७ |
| हुशंगाबाद | ४३९ |
| नागपूर | ४५५ |
| बुलडाणा | ४७० |
| वर्धा | ५०१ |
| नेमाड | ५२२ |
| आकोला | ५४४ |
| रायपूर | ६८९ |
| बिलासपूर | ७३७ |
| बालाघाट | ७५२ |
| भंडारा | ८०४ |
| चांदा | ८६० |
| दुग | ९२६ |

वरील यादीवरून साधारण मान असें दिसतें कीं जंगली व कमी वस्तीच्या भागांमध्यें अर्थातच गुन्हे कमी घडतात तथापि वर्धा, बुलडाणा, व आकोला हे श्रीमान जिल्हे असून यां मध्यें गुन्ह्यांचें प्रमाण कमी आहे ही गोष्ट इन्स्पेक्टर जनरल साहेबांना पुरेशीं मान्य नसून त्यांचा असा समज आहे कीं या प्रांतांत गुन्ह्यांची नोंद बरोबर होत नसली पाहिजे. आणि यांच्या सत्यतेला उमरावती, यवतमाळ, जबलपूर इत्यादि श्रीमान जिल्ह्यांच्या आंकड्याकडे बोट दाखविण्यांत येतें.

श्री रामदासानुदास ( श्रीधर विष्णु परांजपे ) मुक्काम वर्धा यांनीं आपल्या सूर्यदेव मठ नामक रामदासी संप्रदायाची येथें शाखा काढली आहे. नांव कशवस्वामी मठ असें दिलें आहे. मठाचे सेवक रा. भास्कर विनायक वेचलेकर व यशवंत गोपाळ आगरकर हे आहेत. मठालाच एक पुस्तकालय जोडलें आहे. यांत मराठी व संस्कृत धार्मिक व तत्वज्ञानाचे ग्रंथ ठेविले जातील. या मठातर्फे रा. वेचलेकर यांचे घरीं दर शनिवारीं रात्रौ भजन व रविवारीं सायंकाळीं पुराण होतें. गुरुवारीं सायंकाळीं निव्वळ स्त्री सांप्रदायिकांची सभा होऊन त्यांत कोणते तरी पुराण ग्रंथ वाचितात. सदहू मठाचें कार्य उत्तरोत्तर यशस्वी होत जावो, असें आह्मी परमेश्वराजवळ प्रार्थना करितों.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— उत्तरा नक्षत्रांत हत्ती सारखा पाऊस पडला. असा पर्जन्य गेल्या १५ वर्षांत नव्हता. एकंदर ३५ इंचापर्यंत पाणी झालें आहे. आज पुन: हस्त नक्षत्र लागतें पण यामध्यें मेंढ्याचें वाहन असल्यामुळें पाऊस उघाडाचा असा अंदाजा आहे. रोगराई पुष्कळशा मानानें फार कमी आहे.

स० रा० रुस्तुमजी फर्डूनजी साहेब कामिशनर, यांची स्वारी येथेंच असून वार्षिक तपासणीचें काम चालूं आहे. साहेब बहादूर आज सकाळीं मुनासिपल सभासदांची मुलाखत टाऊन हालांत घेऊन कांहीं महत्वाच्या विषयावर आपला अभिप्राय कळविणार आहेत. हे इतके लोकप्रिय अधिकारी आहेत कीं सार्वजनिक व इतर बहुविध कार्यांमुळें त्यांचे येथील मुक्काम आणखी वाढवावे लागले आहेत.

## आकोला बाजारभाव

—:०:*:०:—

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००=॥ |
| मुंबई व्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २४८—॥ |
| चांदी | | ७३ |
| जवस | | १४५ |
| जवारी नवी | ३५ | ४२ |
| गहूं काठे | | ४ |
| गहूं खांडवा पीवळा | | ५। |
| गहूं बनशी | | ५॥ |
| चणे | | ३॥। |
| तुरी | | ३ |
| उडीद | | ३॥। |
| मुग | | ३॥। |
| तेल | | ७॥। |
| सरकी | | ११८— |
| तुप | | १२ |
| कापूस | ६० | ६९ |
| आकोला रुई जीन | | ८९ |

## जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची ही निराशा होत, तेंव्हां सुद्धा सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिन्धू

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्या संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी ( काळरा ) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि खोकला सर्वास गुण येतो किंमत प्रत्येक बाट लीस ॥- आणे. सर्व औषधें बिकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे.

मागविण्याचा पत्ताः—

### क्षेत्रपाल शर्मा माळक
### सुख संचारक कंपनी मथुरा



गुण न आल्यास पैसे परत !

ठिकाठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्पतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफळार्कमधु" यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड व सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते—रतिकाळीं स्त्रीपुरुषांत फार वेळ टिकणारी कामास्थिति अनुभवास येतो. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजूं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. अंगांतील नासलेली आणि कारणाखेरीज निघून जाणारी धातू पाऱ्यासारखी तेजस्वी व घट्ट बनून संततीधारणास योग्य अशी होते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रंडे, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो; शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येतें. या औषधास पथ्य नाहीं स्त्रीवर्ज करण्याचें कारण नाहीं. कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १॥०४, तीन बाटल्यांस २॥१०, दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०-नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नों० नं. ड ९३ श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

सूचनाः—कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं आमचें येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.



ॐ

## सत्यमेव जयते.

( सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकरितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकत्र. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, व्रत, शमिपूजन, तुळसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायश्चित्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिंची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार ( मुंजी ) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, जन्नाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्णे कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळे (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ ( संध्या ) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वास्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यात अंत्येष्टिकर्म ( मृतसंस्कार ), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधीं ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टीत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशीचळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्मांचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र. व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्मं, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरात छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

## सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधीत वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधात विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेदविद्येचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रूपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७९ जि० आकोला प्रांत वऱ्हाड



## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार— खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, धूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें; अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदरहू औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणें करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- आलिबाग.

मुंबई.



## फळांचा बार विकणें आहे.

खामगांवीं रेल्वे स्टेशनच्या जवळ अर्ध्या मैलावर आमचा "शेळगांवचा बगीचा" ह्मणून प्रसिद्ध बगीचा आहे. त्यांत संत्र्यांचीं ४९०, पेरूंचीं १५० [ जांबाचीं ], डाळींबांची ८९, लिंबूचीं १००, साखरलिंबांचीं ३०, शीताफळांचीं, ५० बोरींचीं ५० झाडें आहेत. एकंदर ९१५ अंदाजान झाडें आहेत. त्यांच्या फळांचा बार १ वर्ष पुरता विकणें आहे. खामगांव रेल्वेस्टेशनापासून मुक्तावळला ।. आणे मणीं, नागपुरला रु. १ मणी व मुंबईला रु० १। मणी रेल्वेभाडें पडतें. ज्यांची घ्यावयाची इच्छा असेल त्यांनीं समक्ष अगर पत्रद्वारें खुलासा करून घ्यावा. खामगांव ता. ७।९।१० सही

टोडरमल पुरणमल झुणझुणवाला.

नो० नं० द ४९

## नोटीस

रा. रा. रामजी रोडजी देशमुख राहणार कजबे वाकद तालुके वाशीम जिल्हा आकोला यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आपली नोटीस ता. १९।७।१९१० इ. ची वऱ्हाडसमाचार छापखान्यांत छापलेली आह्मास पावली. लिहीला मजकूर समजला. आपण लिहिलें कीं तुमचें कर्ज रुपये १८०० आह्मी घेऊन त्याची फेड दर वर्षास रुपये २०० देण्याचा करार आहे. त्या दस्ताऐवजांत तुह्मी लिहितां कीं मी मनीऑर्डर पाठविली व तुमचे दुकानावर रक्कम घेऊन आलों तुह्मी घेत नाहीं. असें लिहीलें ही आपली मोठी चूक आहे कीं आपण करारा प्रमाणें रुपये देत असून आह्मी घेणार नाहीं. हें लिहिणें लबाडीचें आहे. व सांगणेवाल्यास व वाचणेवाल्यासही लबाडीचेंच दिसत असेल. मनीऑर्डरी १ तुमचे ता. १८।१।०८ इसवी रुपये १०० चे पाठविले ते पोहोंचलें व ते रुपये तुमचेवर दि० मु० नं० १९० सन १९०१ इसवीचा हुकूमनामा आह्मी मिळविला आहे त्यांत जमा केले आहेत आणि जमा केल्यानंतर आपलेवर दरखास्त देऊन जप्ती आपले घरावर जप्ती आणली असतां आपले घरांत कांहीं माल सांपडला नाहीं. सबब ता. १०।११।०९ इ० रोजीं दरखास्त रद्द केली. व आपण दुसरी मनीऑर्डर ता. १७।८।१०९८ इ. रोजीं रुपये ९८ केले ह्मणून लिहीतात तर त्या तारखेचे मनीऑर्डर मुळींच आह्मीं पाहिलें नाहीं. परंतु रुपये ९८ चे मनिऑडर १ आपले आले होते त्यांत आपण गाहाणाचे किस्तींत जमा करावे असें लिहिलें होतें. सबब आह्मास घेण्यास हरकत आली. कारण गाहाणखत दस्तऐवजाचे शर्ती प्रमाणें तुमचे कडून त्या तारखेस गाहाणाची सर्व रक्कम व व्याज घेण्यास आह्मास हक्क प्राप्त झाला होता. सबब तुमचे मनिऑर्डराचें लिहिले प्रमाणें करण्यास हरकत आली सबब घेतली नाहीं. व आणखी रुपये नगदी घेऊन तुमचे दुकानावर आलों ह्मणून लिहितां तरी आपण नगदी रक्कम घेऊन आजपर्यंत कधींही आले नाहीं. कारण आपणावर आमचे हुकूमनाम्याची रक्कम घेणें असून व त्याच्या जप्त्या तुमचे घरावर येऊन त्याची मुद्धां आपण फेड करीत नाहीं. तर लिहिलेल्या दस्ताऐवजाची रक्कम घेऊन आह्मी दुकानावर आणून देत असतां आह्मी घेणार नाहीं. हें आपले मनांत समजून खोटे मजकूराची नोटीस देणें अयोग्य आहे. आणि आपण नोटीसींत लिहितां कीं ज्या कांहीं माझे कडेस किस्ती पडल्या असतील ती रक्कम मी हरबगस मारवाडी यांचे येथें अनामत ठेविली आहे. ती घेऊन मजला पावती द्यावी. या प्रमाणें लिहिलें परंतु हरबगस मारवाडी या नांवाचे दुकानचा तपास केला असतां कोठेंही सांपडत नाहीं व किस्ती पडीत पडल्या असतील तितकी रक्कम नेणें ह्मणून लिहीलें. तरी आज तारखेस तुमचे दस्ताऐवजाचे शर्ती प्रमाणें तुमचेकडेस आमची रक्कम येणें प्रमाणें निघत आहे त्याचा तपसील.

१८०० गाहाणखताचें मुद्दल रुपये अठराशें. व गाहाणखत लिहिले तारखे पासून आज तारीख १९।९।१० पर्यंत व्याजाचे रुपये १४२६ तुमचे दस्तऐवजांत लिहिले प्रमाणें ३२२६ बत्तीशें सव्विस येणें प्रमाणें रुपये व नोटीसीचा खर्च आपण आमचे दुकानावर १५ दिवसांमध्यें आणून द्यावे. व आपला दस्ताऐवज काढून नेणें अगर ज्या दुकानदाराजवळ आपण वरील रक्कम रुपये ३२२६ व खर्च ठेवसाल त्या दुकानदाराजवळून आह्मास रक्कम देववून आपला दस्तऐवज काढून नेणें. वरील मुदतींत न घडून आल्यास मग आपली कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. व आह्मी वर लिहिलेले रकमेचा आज तारखेपासून व्याजास व्याज घेऊं कळावें. वरील रक्कम आपण अदा न केल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून रक्कम वसूल दाव्याचे खर्चासह व रक्कम अदा होईपर्यंत व्याजासह वसूल केली जाईल कळावें ता. २०।९।१९१० इ०

नो० नं० ढ ६२ सही

लादुराम बोदुलाल दस्तुर हरदेव.

## जाहिर नोटीस.

नोटीस बेशमी भागी मर्द कृष्णा व गंगी मर्द गणपत राहणार सुनगांव ता० जळगांव जि. बुलडाणा यांनाः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझ्या वडील भावांच्या बायका असून माझ्या भावास मरून आज अंदाजा १०।११ वर्षें झालीं. ते मयत झाले त्या वेळेस आपली वडिलोपार्जित शेतें जीं तुह्मी वाहतां तीं व मज जवळ असलेलें शेत हीं माझ्या पुतण्याच्या नांवानें झालीं तो आतां २।२॥ दोन अडीच महिन्यांपूर्वी मयत झाला. त्या वर तुह्मी ३ तीन शेतांपैकीं मला एक शेत दिलें व बाकीचीं दोन शेतें तुह्मी दोघींनीं वांटून घेतलीं. आतां तुमचा शेतें वगैरे विकून दुसरा नवरा करण्याचा विचार दिसत आहे हें तुमच्या कृत्यावरून दिसतें. आपले घरचे तीन बैल भावाचे घरीं नेऊन दिले. व ह्मणतेस कीं त्याचें मला कर्ज आहे अशी लबाडी करून आपल्या भावाचें घर भरतेस. तुला कोणाचें कर्ज वगैरे कांहीं नाहीं. तुमचा शेतांवर मुळींच अधिकार नाहीं. तुह्मी फक्त अन्नवस्त्राच्या मालकीणी आहांत. तें मी तुह्मास देण्यास तयार आहे तरी तुह्मास कळविण्यांत येतें कीं तुह्मास आमच्या कोणत्याही जिनगीची अफरातफर करतां कामा नये. केल्यास तुमचे वर कायद्या प्रमाणें फिर्याद करून आमची नुकसानी भरून घेऊं. तूं आमचे बैल भावाचे घरीं नेले. ते आठ दिवसांत आणून द्यावे. या शिवाय तुह्मांजवळ असलेलीं शेतें कोणाला खरेदी, पट्यानें, अगर गहाण देऊं नये दिल्यास त्याची जबाबदारी तुह्मास घ्यावी लागेल कळावें ता० २२।९।१९१०

सही

बाबु वल्द भिवाजी जात बारी अडनांव भोपळे रा० सुनगांव ता० जळगांव जि० बुलडाणा

नो. नं. ढ ५८. निशाणी खुद आंगठा.

## नोटीस.

रा० ( १ ) नागो कुसन भोई व ( २ ) सुन्या भोई रा० (आकलकोट) आकोला ता० म० यांसः——

संभु वल्द हुसेन भोई रा० आकलकोट आकोलें ता० व जि० मजकूर हा नोटीस देतो कीं मुर्याचे जांवयास देण्यासाठीं म्यां तुह्मांस सोळा रुपये मध्यस्तीनें दिले. सदरचे रुपये आह्मी तुह्मास पंधरा दिवसांनीं परत देतों असें पंचासमक्ष तुह्मी उभयतांनीं कबूल केलें. या गोष्टीस अजमासें ८।९ महिने झाले. परंतु तुह्मी फेड आजपावेतों कांहीं केली नाहीं यामुळें तुमच्या मनांतून रुपये देण्याचें दिसत नाहीं. सबब ही नोटीस प्रसिद्ध होतांच ८ दिवसांत रुपये मला देऊन पावती घ्यावी. असें न केल्यास तुमच्यावर मी फिर्याद करून कोर्टखर्चासह त्याच प्रमाणें या नोटिशीचे खर्चासह रुपये वसूल करीन. जातभाईयांमध्यें वितुष्ट येऊं नये सबब ही नोटीस दिली आहे. कळावें ता० १९।९।१०

सही

संभु वल्द हुसेन भोई नि० खु०

नो. नं. ढ ६० आंगठा.

## विनंती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या सुधारलेल्या **लोखंडी नांगरांचा** खप फारच झपाट्यानें वाढल्यामुळें व विशेषेंकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमचीं आउतें फारच खपल्यामुळें आह्मी आमचा बेळगांव येथील **शेतकीचीं आउतें** करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्यभागीं ह्मणजे सातारा जिल्ह्यांत **कुंडलरोड** रेल्वे स्टेशनानजिक **किर्लोस्कर वाडीस** नेला आहे. सबब आपल्यास एवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं **आउतें** लागतील तीं खालीं लिहिलेल्या **पत्त्यावर** मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,

किर्लोस्कर बंधु,

किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,

नो' नं. ढ ६६ जिल्हा सातारा.


ORIENTAL GOVERNMENT

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

## FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies creat fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापुन प्रसिद्ध केलें.